महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

# हाकारा

जानेवारी - जून २००७





## संस्कृती व समाज

आदिवासी पायाभूत सर्वेक्षण विशेषांक

# हाकारा अंक सूची

१९८० - १. जबरन जोत जंगल जमीन
२. आदिवासी व शिक्षण
३. आदिवासी वनसंवर्धन
४. आदिवासी साहित्य व कला

१९८१ - १. दलितांना सवलती व राखीव जागा
२. आदिवासी व आरोग्य
३. वनशेती व संवर्धन
४. रोजगार हमी योजना

१९८२ - १. धरणे व विकास
२. धरणे व विकास
३-४. जंगल व्यवस्थापन

१९८३ - १. आदिवासी व दारु
२. आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी
३. प्रा. सरदार गौरव अंक
४. आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न

१९८४ - १-२ आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य
३. आदिवासी स्त्री
४. आदिवासी आरोग्य व शिक्षण

१९८५ - १. आदिवासी संघटन
२. जमीन हस्तांतर
३. आदिवासी महिला
४. आदिवासी व सरकार

१९८६ - १. जंगल व धरण
२. आदिवासी कला
३. आदिवासी व वेठबिगारी
४. आदिवासी विषयक ग्रंथ : मानवशास्त्र परिचय

१९८७ - १. भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न
२. आदिवासी आणि सांस्कृतिक बदल
३-४. राष्ट्रीय वननितीचा प्रश्न

१९८८ - १. सवलती अपहरणाची समस्या
२. आदिवासी साहित्य
३.-४. आदिवासी समाज व संस्कृती

१९८९ - १-२. डॉ. वेरिअर एल्विन विशेषांक
३-४. व्यवसाय मार्गदर्शन

१९९० - १-२. मक्षराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती
३. जागतिक अदिवासी
४. गं. बा. सरदार स्मृति विशेषांक

१९९१ - १. आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक
२. आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या
३. आदिवासी जीवन व संस्कृती

१९९२ - १-२. आदिवासी समाज जीवन
३-४. अनुताई वाघ विशेषांक

१९९३ - १-२. आदिवासी धर्म, सण व उत्सव
३-४. धरण - विस्थापन व पुनर्वसन

१९९४ - १. आदिवासी संस्कृती
२. आदिवासी एकता परिषद
३. आदिवासी विकासाची सैध्दांतिक भुमिका
४. आदिवासी जमाती

१९९५ - १-२. राणीपूर अभ्यास विशेषांक
३. कुपोषण विशेषांक
४. पर्यावरण विशेषांक

१९९६ - १. आदिवासी जमाती
२. महाराष्ट्र, ओरिसा अदिवासी अध्ययन
३. आदिवासी जमाती
४. आदिवासी शिक्षण

१९९७ - १-२. वारली लोकगिते व बोलीभाषा
३. पंचायत राज विशेषांक
४. साहित्य संमेलन विशेषांक

१९९८ - १. वृक्ष लागवड व संवर्धन विशेषांक
२. आदिवासी व प्रशासन
३-४. आदिवासी समाज व संस्कृती

१९९९ - १. आदिवासी व आर्थिक धोरण
२. आदिवासी विकास व संस्कृती
३-४. बोर्डी परिसर अभ्यास

२००० - १. आदिवासी जीवन, कला व मराठी साहित्य
२. स्त्रिया आणि आरोग्य
३. पाणी टंचाई आणि पाणलोट विकास
४. आदिवासी जीवन व संस्कृती

२००१ - १-२. अस्मिता व विकास विशेषांक
३. आदिवासी समाज व शासन
४. अस्मिता व विकास : दिशा २००१

२००२ - १. अदिवासी व उपेक्षित समाज : अस्मिता आणि विकास
२-३. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : महाराष्ट्र
४. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : पर्यायी उपाययोजना

२००३ - १-२. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : मध्यप्रदेश
३. आदिवासी समाज
४. आदिवासी संस्कृती

२००४ - १. पुस्तक परिचय
३-४. आदिवासी विकास धोरण

२००५ - १. प्रस्तावित वनकायदा
२. डॉ. बानू कोयाजी स्मृती विशेषांक
३-४. आरोग्य व शिक्षण - नंदूरबार अभ्यास विशेषांक

२००६ - १-२. डॉ. इरावती कर्वे स्मृति विशेषांक
३-४. आदिवासी अस्मिता व साहित्य कला

*कष्टकरी जनता, भूषण भारता । वंदन करितो पददलिता ॥*

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

संपादक
रामचंद्र मुटाटकर

# हाकारा (त्रैमासिक)

अभ्यागत संपादक
पुरुषोत्तम आगाशे

वर्ष : २८ जानेवारी-जून २००७ अंक : पहिला व दुसरा

## अनुक्रमणिका

पायाभूत सर्वेक्षण ........ ८

सर्वेक्षण पध्दती ........ ९

सर्वेक्षणाचे ठळक निष्कर्ष ........ ११

१) लोकसंख्या २) विवाह ३) शिक्षण ४) व्यवसाय ५) घरे

६) घरातील साधन ७) शासकीय योजनांचा लाभ ........ १४-२९

(अ) शासकीय योजनांमध्ये काम

(ब)शासकीय योजनांचा गेल्या तीन वर्षातील लाभ

८) विश्लेषण ........ ३७

तालुका निहाय तक्ते ........ ४३

जमात निहाय तक्ते ........ ६३

कुटुंब सर्वेक्षण प्रश्नावली ........ ९४

**मुखपृष्ठ छायाचित्रे**

**१. महाराष्ट्रातील ९ आदिवासी तालुक्यातील विकासाचे कार्य करणाऱ्या मार्गदर्शिका.**

**२. नंदूरबार जिल्ह्यातील अस्मिता जपणारे आदिवासी जोडपे.**

• **पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे ४११ ००७.
टेलिफॅक्स (०२०)२५८९७२९८

• **अक्षर जुळणी**
नंदू दिघे

• **मुद्रण स्थळ**
असाईन सिस्टिम्,
दत्तवाडी, पुणे ३०.

• **मुद्रक व प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
अध्यक्ष, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

अंक मूल्य ५० रूपये

या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने अनुदान दिले असले तरी अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय ...

भारतीय राज्य घटनेनुसार आदिवासींना **अनुसूचित जमात** म्हणून संबोधण्यात आले आहे. पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य मानल्या गेलेल्या समाजांस किंवा, महात्मा गांधींनी नामकरण केलेल्या हरिजनांस अनुसूचित जाती म्हणून संबोधण्यात आले आहे. **अनुसूचित जाती** गांव पाड्यात पसरलेल्या आहेत. अनुसूचित जमाती मोठ्या प्रमाणात विशिष्ट भौगोलिक परिसरात एकसंधपणे राहतात. त्यांची वस्ती साधारणपणे दऱ्या खोऱ्यात, पर्वतराशींवर, जंगलात असते. अनुसूचित जाती एका तालुक्यात, जिल्ह्यात, राज्यात किंवा देशात बऱ्याच आहेत व त्यांच्यात आर्थिक-सामाजिक उतरंड आहे.

त्याचप्रमाणे अनुसूचित जमातींची संख्या, म्हणजे वेगवेगळ्या अदिवासी समाजांची संख्याही बरीच आहे व त्यांच्यातही आर्थिक - सामाजिक पातळीवर उतरंड आहे. भारतातील मागास गणल्या गेलेल्या अनुसूचित जाती-जमाती, शूद्र वर्णात सेवा करणाऱ्या इतर मागास वर्गातील जाती व भटके-विमुक्त संबोधल्या गेलेल्या जातींना एकत्रितपणे विकासाच्या संधि मिळाव्या म्हणून समाजकल्याण विभाग स्थापण्यात आला. मागासलेले समाज ही संकल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय घटनेच्या मसुदा समितिचे अध्यक्ष म्हणून प्रथम औपचारिकरित्या मांडली. अलिकडे मागासवर्गीय समाजांस दलित म्हणूनही संबोधण्यात येते. परंतु व्यवहारिक पातळीवर दलित म्हणजे अनुसूचित जाती असा वाक्‌प्रचार आहे. हे सगळे समाज आर्थिकदृष्ट्या गरीब असले तरी त्यांच्यात लक्षात येण्यासारखे सामाजिक अंतर आहे. महाराष्ट्रात कसब असलेला, सेवा पुरविणारा सुतार, सोनार, लोहार किंबहुना अलुतेदार-बलुतेदार समाज ओबीसीत आहे, तसा ग्रामीण पातळीवर मराठा समजला जाणारा, शेती करणारा कुणबी समाजही आहे. हे बहुसंख्य समाज धर्माने हिंदू आहेत. मुसलमानांतही या सर्व जाती आहेत. डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारेपर्यंत सर्व अनुसूचित जाती हिंदू धर्माच्या समजल्या जात. ज्या कुटुंबांनी बौद्ध धर्म स्वीकारला त्यांना नवबौध्द म्हणून संज्ञा प्राप्त झाली.

भारतातील आदिवासी समाज हा हिंदू धर्माच्या वर्गव्यवस्थेच्या बाहेर असल्याने त्यांच्या स्थानिक धर्म-देवता, सण-वारा प्रमाणे, त्यांचा धर्म स्थानिक, त्यांच्यापुरता मानला गेला. धर्मांतरामुळे अदिवासी ख्रिश्चन, मुसलमान झाला तरी त्यांचा अनुसूचित जमातीचा दर्जा कायम राहतो. धर्मांतराने कदाचित ओबीसीच्या दर्जातही फरक होत नाही. परंतु अनुसूचित जातीच्या दर्जात धर्मांतरामुळे फरक पडतो. त्याचे कारण हिंदू धर्म समाजा बाहेर इतर धर्म समाजात परंपरेने अस्पृश्य समाज नाही. या बाबतीत बरेच वादविवाद आहेत.

महात्मा गांधीनी आपल्या रचनात्मक कार्यक्रमात हरिजन-गिरीजन किंवा आदिवासी विकासाबाबत मांडणी केली आहे. हरिजन सेवक संघ व आदिमजाती सेवक संघ गांधी स्मारक प्रतिष्ठानच्या अंतर्गत येतात. महाराष्ट्रात, जातीविरोधक, महात्मा ज्योतिबा फुले, विठ्ठल रामजी शिंदे, छत्रपती शाहू महाराज यांनी बरेच संघर्ष केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना भारतीय राज्यघटनेत समतेचे अधिकार मिळवून दिले.

आदिवासींना मुख्य प्रवाहात कसे आणावयाचे, त्यांचा विकास कसा करावयाचा; ते विकासाच्या संधि मिळूनही त्यापासून वंचित राहतात, त्या संधीचा उपयोग त्यांना करता येत नाही, यावर काय मार्ग काढावयाचा याबाबत बऱ्याच चर्चा झाल्या. त्याची परिणती म्हणून महाराष्ट्रात आदिवासी विकास विभाग समाजकल्याण विकासापासून विभक्त करण्यात आला. देशाच्या पातळीवर विकास योजनांच्या अंतर्गत आदिवासी उपयोजना मांडण्यात आली. या उपयोजनेच्या कार्यवाहीसाठी, अदिवासी विभागासाठी, आयुक्त व त्यांच्याबरोबर चार अप्पर आयुक्तांची पदे निर्माण करण्यात आली.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे पहिले अध्यक्ष (१९७६-७८) महाराष्ट्र शासनाचे आदिवासी विकास विभागाचे पहिले सचिव व आयुक्त डॉ. वसंतराव मंडलेकर हे होते. ते या पदांवर कार्यरत असताना परिषदेचे अध्यक्ष होते. दुसरे अध्यक्ष, आदिवासी व दलितांच्या प्रश्नांचे पुरस्कर्ते, संतसाहित्याचे अभ्यासक, गांधी व मार्क्सच्या तत्वज्ञान व व्यवहारिकता समजणारे-पाळणारे, थोर मराठी साहित्यिक प्रा. गं. बा. सरदार हे होते. त्यांच्या प्रेरणेने हाकारा त्रैमासिकाचा शुभारंभ झाला. त्यांनीच हाकारा हे सर्व जनतेस आव्हान करणारे नांव दिले. त्यानंतर नंदुरबार जिल्ह्यात अक्राणी-अक्कलकुवा या डोंगराळ तालुक्यात शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणारे, शिक्षणमहर्षि आदिवासी गांधी, माननीय श्री. जनार्दनमहाराज वळवी यांनी अध्यक्षपद भूषाविले. डॉ. पां. वा. सुखात्मे हे युनोच्या अन्न आणि शेती विषयक संघटनेचे संचालक असताना. त्यांनी दारिद्ररेषा, उपासमार, पोषण, कुपोषण या विषयांवर मौलिक संशोधन केले. मानवविज्ञान परिषदेचे अध्यक्ष होण्यापूर्वी त्यांनी गरिबांकरिता स्वस्त व पोषक अन्न मिळण्यासाठी इंदिरा सामूहिक खाणावळ (इंदिरा कम्युनिटी किचन) स्थापन केले. त्यातील स्वयंपाक करणाऱ्या महिला गरीब समाजाच्याच होत्या. गरिबांनी गरिबांसाठी या तत्वाचा त्यांनी याद्वारे पुरस्कार केला.

मानव विज्ञान शास्त्राची तात्विक बैठक जगातील आदिवासी समाजांच्या अध्ययनातून विकसीत झाली. आदिवासी बरोबर त्यांच्या झोपड्यात दीर्घ काळ राहून त्यांच्या नजरेतून त्यांच्या जीवनाकडे, संस्कृतिकडे, त्यांच्या आशा आकांक्षा समजण्याचा प्रयत्न मानवशास्त्रात केला जातो. सर्व विषय, शाखा, शास्त्र, यांचा मानवाशी संबंध असतो. वनस्पतिशास्त्र, पर्यावरण, शेती, औषधिशास्त्र, आरोग्यशास्त्र, पशुपालन, जमीन-जंगल-पाणी, अर्थशास्त्र, राजनीती, धर्म, कला, शिक्षण इ. सर्वांचा मानवसमाज व संस्कृतिचा संबंध लक्षात घेऊन, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेत, सर्वंकश, सर्वांगीण, असा मानवाचा अभ्यास व त्यांत परिवर्तन घडविण्यासाठीच्या प्रक्रिया सुरु करण्याचे प्रकल्प, कार्यक्रम घेण्यात येतात. आदिवासी उत्थान कार्यक्रम हा असाच एक प्रकल्प आहे.

अशीच, याच विचारांनी व कृतीने भारलेली ग्रामीण भागातील गरीब, दलित, परित्यक्ता, वैधव्याने ग्रासलेल्या, कौटुंबिक जाचास त्रासलेल्या, महिलांचे व्यक्तीमत्व घडवून त्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागात सर्वांगीण आरोग्य व विकास साधणारी डॉ. रजनीकांत आरोळे यांची जामखेड, जिल्हा अहमदनगर येथील सर्वांगीण आरोग्य प्रकल्प ही संस्था आहे. गेल्या ३५-४० वर्षात डॉ. आरोळे यांनी आपल्या दिवंगत पत्नी श्रीमती मेबल व आता त्यांच्या सुविद्य कन्या डॉ. शोभा यांच्या मदतीने हे मानव विकास, आरोग्याचे कार्य चालविलेले आहे.

गेल्या २५-३० वर्षात महाराष्ट्रातील खरे-खोटे तोतया आदिवासी, हलबा-हलबा कोष्टी, गोवारी-गोंड गोवारी, कोळी-महादेव कोळी व तत्सम बजारा-वंजारी इ. प्रश्नांना शासनास मदत करण्याचे कार्य महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेने शासकीय समित्यांचे सभासद, अध्यक्ष म्हणून केलेले आहे.

अदिवासींचा जंगलाशी संबंध शासकीय नियमांमुळे व जंगलातून जास्तीत जास्त उत्पन्न मिळविण्याच्या अभिलाषेमुळे अतिलोभामुळे वाढल्याने, आदिवासी समाजात कुपोषण-उपासमारीचा प्रश्न भेडसावू लागला. जंगलातील अन्नाचा तुटवडा, सावकारीचा प्रकोप स्थलातर इ. अनेक कारणांमुळे बालकुपोषण व बाल मृत्यूचे प्रमाण वाढले. यावर एक तोडगा म्हणून मान्यवर स्वयंसेवी संस्थांना शासकीय आदिवासी विकास योजनांत भागीदारी देण्याचे शासनाने ठरविले.

दिनांक ३ नोव्हेंबर २००३ रोजी तत्कालीन प्रधान सचिव, अदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन, श्री. रमेशकुमार व आयुक्त, आदिवासी विकास, डॉ. पी. एस. मीना यांनी जामखेड येथे भेट देऊन ग्रामीण आरोग्य प्रकल्पातील कार्याविषयी चर्चा केली. तसेच एका गावबैठकीला हजर राहून गावकऱ्यांशी व महिला कार्यकर्त्यांशीही चर्चा केली. जामखेड सोडताना त्यांनी महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद व ग्रामीण आरोग्य प्रकल्प यांना अदिवासी विकास कार्यात शासनाशी भागीदारी करण्याचे आवाहन केले व त्याबाबत प्रस्ताव सादर करण्यास सांगितले. त्याप्रमाणे या दोन संस्थांनी संयुक्तपणे महाराष्ट्र शासनास एक प्रस्ताव सादर केला. त्या प्रस्तावास ताबडतोब मान्यता देऊन शासनाने २७ फेब्रुवारी २००४ रोजी कायर्क्रम मंजूरीचा शासन निर्णय जाहीर केला. याचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी बालमृत्यु व कुपोषणास आळा घालण्याच्या उद्देशाने डॉ. रजनीकांत आरोळे, सर्वांगीण ग्रामीण आरोग्य प्रकल्प, जामखेड व प्रा. रा. के. मुटाटकर, अध्यक्ष महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे यांना संयुक्तपणे आदिवासी उत्थान कार्यक्रम पाच वर्षाकरीता (२००५-२००९) महाराष्ट्रातील आदिवासी बहुल ७ जिल्ह्यात व ९ तालुक्यात मान्य केला. त्या प्रकारचा प्रस्ताव या दोन संस्थांकडून मागविण्यात आला होता. जामखेडच्या आरोग्य विषयक कार्यक्रमाच्या अनुभवाच्या अनुशंगाने हा कार्यक्रम देण्यात आला आहे.

**शासन निर्णय :** (आरोग्यविषयक) आदिवासी उत्थान कार्यक्रम

आदिवासी समुदायाचा (समाजांचा) आरोग्यविषयक आणि पोषणविषयक दर्जा सुधारण्यासाठी शिक्षण, उदरनिर्वाह आणि आर्थिक विकास, समुदाय विकास, अधिकारांविषयी सामुदायिक जाणीव आणि आदिवासींची सांस्कृतिक ओळख, स्वत:विषयी आत्मविश्वास वाढवणे अशा प्रकारचे सात जिल्ह्यात, ९ तालुक्यात कार्यक्रम राबविण्यासाठी प्रशासकीय मान्यता

**सहभागी संस्था**

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाने ग्रामीण आरोग्य प्रकल्प, जामखेड आणि महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे या दोन संस्थांना एकत्रितरित्या हा कार्यक्रम दिला असून आर्थिक वर्ष सन

२००४ पासून या कार्यक्रमाच्या कार्यवाहीची सुरुवात झाली आहे. हा कार्यक्रम मार्च २०१० पर्यंत चालू राहील.

**प्रकल्पाचा मुख्य उद्देश**

बालमृत्यू, कुपोषणाच्या संदर्भात आदिवासी समाजाचा आरोग्यविषयक व पोषणविषयक दर्जा सुधारणे शिक्षण, उदरनिर्वाह, आर्थिक विकास, समुदाय विकास, आदिवासींची सांस्कृतिक ओळख व स्वत: विषयी आत्मविश्वास वाढविणे आदी कार्यक्रमांतून आदिवासींचे जीवनमान उंचावून शाश्वत व सर्वांगीण आदिवासी मनुष्यबळ विकासाचे पर्यायी प्रतिमान (मॉडेल) विकसित करणे.

**प्रकल्पाचे कार्यक्षेत्र**

महाराष्ट्रातील कर्जत (जि. रायगड), जव्हार व मोखाडा (जि. ठाणे), धडगाव व अक्कलकुवा (जि. नंदूरबार), धारणी (जि. अमरावती), एटापल्ली (जि. गडचिरोली), झरी-जामणी (जि. यवतमाळ), अकोले (जि. अहमदनगर) याप्रमाणे ७ जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्या अधिक असलेल्या ९ तालुक्यांचे कार्यक्षेत्र असून साधारणपणे प्रत्येक कार्यक्षेत्रात १५ ते २० हजार लोकसंख्येचा अंतर्भाव आहे. कार्यक्रमाचे युनिट ग्रामपंचायत मानून तेवढ्या ग्रामपंचायतीची व त्यातील गाव-पाड्यांची निवड करण्यात आली आहे. हा कार्यक्रम शाश्वत होण्याच्या दृष्टीने प्रत्येक गावपाड्यांतून एक स्त्री व एक पुरुष स्वयंसेवक निवडण्यात आले आहेत. महाराष्ट्रातील साधारणपणे दीड लाख आदिवासी लोकसंख्येच्या अंतर्गत ८० ग्रामपंचायती व ६०० गावपाड्यांतून हा कार्यक्रम सुरु आहे.

**प्रकल्पांतर्गत राबविण्यात येत असलेले विविध कार्यक्रम :**

हा बालमृत्यू-कुपोषण केंद्रित आरोग्यविषयक कार्यक्रम असल्यामुळे आदिवासी महिला व बालकांचे आरोग्य, आहार व पोषण या अनुषंगाने खालील काही उपक्रम घेण्यात आले आहेत.

१) **नोंदणी :** गाव-पाडा पातळीवरील गर्भवती महिला, बालकांचे जन्म-मृत्यू, स्तनदा माता यांची १००% नोंदणी स्थानिक स्वयंसेवकांमार्फत करण्यात येते.

२) **वजन नोंदी :** गरोदर माता व ० ते ३ वर्षेवयोगटातील मुलांची वजने दरमहा स्वयंसेवक घेतात व वजन तक्त्यांवर त्यांची नोंद केली जाते.

३) **अति जोखमीच्या माता व मुलांची काळजी**

अ) आदिवासी समाजातील विशेषत: गरोदर माता व लहान बालके यांची नियमित आरोग्य तपासणी होण्याच्यादृष्टीने दर तीन-चार महिन्यांनी तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य शिबिरांचे आयोजन केले जाते. यात त्यांना मोफत औषधोपचारही देण्यात येतात.

ब) नवजात बालकांचे न्यूमोनियासारखे आजार व थंडी वाऱ्यातून संरक्षण व्हावे, तसेच त्यानिमित्ताने त्यांची जन्मनोंद व्हावी याकरिता अशा बालकांसाठी झबले, टोपडे व दुपटे संच पुरविले जातात.

क) ३ व ४ श्रेणीतील कुपोषित बालकांना प्राथमिक आरोग्य केंद्राशी समन्वय साधून पोषण गृहात दाखल केले जाते.

ड) आदिवासी भागात गरोदर मातांची ९० टक्क्यांच्यावर बाळंतपणे घरीच होतात. याला दळणवळणाच्या साधनांचा अभाव, आरोग्य केंद्रातील सोयी-सुविधांचा अभाव, त्यांच्याकडे केले जाणारे दुर्लक्ष, तज्ज्ञ डॉक्टरांचा अभाव आदी कारणे आहेत. त्यामुळे घरी होणारी बाळंतपणे सुरक्षित होण्याकरिता अनुभवी व माहितगार दाईकडून/सुईणींकडून व्हावीत यासाठी दरवर्षी कार्यक्षेत्रातील दायांना प्रशिक्षण देण्यात येते. काही गाव-पाड्यांमध्ये सुरक्षित बाळंतपणासाठी दाईकुटी बांधण्यात आल्या आहेत. आदिवासी उत्थान कार्यक्रमातील महिला स्वयंसेवकांनाही दाई प्रशिक्षण देण्यात येते.

इ) वैदूंना औषधी वनस्पतींवर प्रक्रिया करुन आयुर्वेदिक औषधी निर्मितीचे प्रशिक्षण दिले आहे.

४) **पोषण आहार**

अ) कुपोषणाच्या समस्येवर उपाय म्हणून ६ महिने ते ३ वर्षेवयाच्या बालकांना त्यांच्या नियमित आहाराशिवाय गहू व डाळं यापासून तयार केलेला, न शिजवता लगेच खाता येईल, असा पूरक आहार सकस खाऊ नावाने जुलै २००६ पासून देणे सुरु केले आहे ३ वर्षांवरील.

ब) गरोदर, स्तनदा माता व कुपोषित बालके असलेल्या कुटुंबांना प्राधान्याने दरवर्षी पावसाळा हंगाम सुरु होण्यापूर्वी परसबागेसाठी भाजीपाल्यांचे बियाणे मोफत देण्यात येते.

५) **किरकोळ आजारांवर गाव-पाड्यात औषधोपचार**

आदिवासींना किरकोळ स्वरुपांच्या आजारांवर उपचार घेण्यासाठी दैनंदिन मजुरी बुडवून, वेळ व पैसा खर्च करुन तालुक्याच्या अथवा अन्य दूरच्या आरोग्य केंद्रात जावे लागू नये, यासाठी आमच्या प्रत्येक गाव-पाड्यातील स्वयंसेवकांकडे १०-१२ ॲलोपथी व आयुर्वेदिक औषधांची पेटी देण्यात आली आहे. ही औषधे लोकांना मोफत दिली जातात.

६) **अंगणवाडी सदृश खेळवाड्या (बाल संगोपन केंद्र)**

वाड्यांवरील कातकरी व कोलाम या आदिम जमातींतील बहुतांशी बालकांना गावठाणांतील अंगणवाड्यांचा लाभ मिळत नाही. जिथे या सुविधेचा लाभ मिळत नाही अशा ठिकाणी गावकऱ्यांच्या सहकार्याने खेळवाड्या (बाल संगोपन केंद्र) सुरु करण्यात आल्या आहेत.

७) **शासकीय योजनांचा लाभ**

आदिवासी उत्थान कार्यक्रमाच्या स्वयंसेवकांमार्फत शासकीय योजनांचे योग्य लाभार्थी शोधले जातात व त्यांना घरकुले, विविध वस्तू, सामुदायिक विवाह, अंत्योदय रेशन कार्ड, आदी योजनांचे लाभ मिळवून देण्यासाठी सहकार्य व प्रयत्न केले जातात.

याशिवाय बचत गटांची स्थापना, वाचनालय व माहिती केंद्रांची स्थापना, आश्रमशाळांतील किशोरवयीन मुला-मुलींना आरोग्य शिक्षण, स्वयंरोजगार प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन, श्रमदानातून वनराई बंधारे, औषधी वनस्पतींच्या घरगुती वापरासाठी भगत-वैदूंचे प्रशिक्षण, पंचायत सदस्यांचे प्रशिक्षण, आदी उपक्रमांचे या कार्यक्रमातून आयोजन करण्यात आलेले आहे.

आदिवासी उत्थान कार्यक्रम हा आदिवासी लोकांचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास करण्याचा कार्यक्रम आहे. त्याचे अंतिम ध्येय आत्मविश्वास, आत्मसन्मान व अस्मिता असले तरी हे ध्येय गाठण्यासाठी आदिवासींच्या दैनंदिन गरजांची पूर्ती होणे आवश्यक आहे. शासनाने आपल्या कार्यक्रमाचा केंद्रबिंदू आरोग्य मानला आहे; परंतु आरोग्य आणि विकास, संस्कृती आणि समाज यांचा अलगपणे विचार होऊ शकत नाही. सर्वसाधारणत: जागतिक पातळीवर आरोग्य आणि शिक्षण हे विकासाचे गणक मानले आहे. या कार्यक्रमात आश्रमशाळा आणि अंगणवाडी ह्या संस्था विकासाचे माध्यम म्हणून केंद्रीभूत मानल्या आहेत.

जगाची, देशाची, आदिवासी समाजाची जर प्रगती आणि विकास व्हायचा असेल तर आदिवासींच्या अंतर्गत वेगवेगळ्या समाजामधील असमानता दूर व्हावयास हवी, या भावनेने शासनाने पी.टी.जी. हे वेगळे मानले आहेत. ते इतरांपेक्षा का व किती मागासलेले आहेत हे आपणास सर्वेक्षणातून काढावयाचे आहे, तसेच वेगवेगळ्या समाजातील विकासांच्या टप्प्यांवर काय फरक आहे हेही ओळखायचे आहे. काही समाजातीलच मुले आश्रमशाळेत का जातात, काही समाजातील मुलांचे वजन कमी-जास्त का असते, हे ओळखून त्याबाबतची उपाययोजना करावयाची आहे. कार्यक्षेत्रात कार्यक्रमातील घटकांच्या बाबतीत विचारपूर्वक नवीन कार्यक्रम मांडून आणि शासनाच्या कार्यक्रमाची कार्यक्षम अंमलबजावणी करुन त्याचा अनुभव शासनास, देशास आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर दाखवून दिल्यास सर्वांगीण व शाश्वत विकासाचे निराळे प्रतिमान विकसित होईल.

सारांश रुपाने आदिवासी उत्थान कार्यक्रमाचा मूळ गाभा हा लोकांचा विकास आहे आणि त्यासाठी कार्यक्रम आणि कार्यक्रमातील घटक यांची मांडणी केलेली आहे. ही बाब प्रत्येक सभेत आणि प्रत्येक प्रशिक्षण शिबिरात थोडक्यात मांडली जाते. कार्यक्रम शाश्वत होण्यासाठी समाजाने निवडलेल्या स्वयंसेवक व मार्गदर्शकांमार्फत सगळे कार्यक्रम घेण्यात येतात.

**कार्यक्रमाचा आत्मा :** कार्यकर्त्यांचा जनतेबरोबर जास्तीत जास्त थेट संवाद व्हावयास हवा.

एखाद्या भौगोलिक क्षेत्रात किवा समाजात, परिवर्तनाच्या प्रक्रिया सुरु करण्याअगोदर सद्यस्थिती समजण्यासाठी पायाभूत सर्वेक्षण करण्याची पध्दत असते, जेणेकरुन कार्यक्रम संपताना पुन्हा सर्वेक्षण केल्याने परिवर्तनाचे मोजमाप करता येते. परंतु अदिवासी उत्थान कार्यक्रमाची सुरवात सर्वेक्षणाने केली नाही. आजकाल योजनाबद्ध विकास, त्याचा पाठपुरावा व मूल्यमापन करण्याच्या प्रक्रियेत वारंवार वेगवेगळ्या विभागामार्फत सर्वेक्षण केले जाते. तसेच राष्ट्रीय पातळीवर, जनगणना, आरोग्य सर्वेक्षण वगैरे केले जाते. सर्वेक्षणामुळे लोकांच्या अपेक्षा वाढतात. त्यांना सर्वेक्षणाचे परिणाम, निकाल सुध्दा सांगितले जात नाहीत. म्हणून बऱ्याचदा सर्वेक्षणात लोकांचा सहभाग तोकडा पडतो. आदिवासी उत्थान कार्यक्रम सर्वेक्षणाचा कार्यक्रम नसून कृति कार्यक्रम आहे. हे लोकांना पटवून देण्यासाठी, कार्यक्रमाची सुरवात कृतिने झाली, सर्वेक्षणाने नव्हे. साधारण एक वर्षाच्या कृति-कार्यक्रमानंतर स्थानिक युवकांच्या मदतीने व

स्वयंसेवक- समन्वयकांच्या मदतीनें सर्वेक्षण करण्यात आले. त्यासाठी त्यांचे प्रशिक्षण करण्यात आले. त्यामुळे मिळालेली माहिती ही जास्त विश्वासार्ह आहे.

माहितीचे विश्लेषण तालुकानिहाय व समाज (जमात) निहाय करण्यात आले आहे. आदिम समाज कातकरी, माडिया व कोलाम यांच्या समस्या त्यामुळे समजण्यास मदत होते. सगळा आदिवासी समाज एकसंघ किवा एकाच सामाजिक - आर्थिक दर्जाचा नाही. त्यांच्यातही उच्च-नीच प्रकार आहेत व भेदभाव आहेत. सगळ्या आदिवासी समाजांचा (जमातींचा) विकास होण्यासाठी, त्याचे नियोजन व अंमलबजावणी करण्यासाठी, समाजनिहाय माहितीचा उपयोग होतो. सर्वसाधारणत: सगळ्या आदिवासी क्षेत्रात, समाजात ५०% विवाह हे १० किलोमीटरच्या आत झाले आहेत व इतर २५% विवाह २० किलोमिटरच्या आत झाले आहेत. यावरुन स्त्रीयांचा प्रवास-संबंध ५-२० किलोमीटरच्या परिघातच होतो हे उघड आहे. त्यांचे ज्ञान, अनुभव व विकास दृष्टीवर याचा निश्चितच परिणाम होत असणार. तसेच घरगुती साधने बघितल्यास किंवा शासकीय योजनांचा लाभ घेणाऱ्यांचे विश्लेषण केल्यास, आदिवासी समाजातील विविधता व त्यांची क्षमता यावर प्रकाश पडतो. सगळ्याच भारतीय समाजात विकासाच्या संधींचा फायदा घेण्याची क्षमता व इच्छा काही विशिष्ट समाजातच पाहावयास सापडते. **ज्या समाजात विकासाच्या संधि उपलब्ध असूनही त्यांचा फायदा करून घेण्याची प्रवृत्ति किंवा क्षमता नसते, त्या समाजांना मागासलेले समजण्यात येते.** त्यांना पुढे आणण्यास विशेष प्रयत्न करावे लागतात. आदिवासी समाज हा मागासलेला समाज आहे. आदिवासींत, आदिम समाज जास्त मागासलेले आहेत. महाराष्ट्रात कातकरी, कोलाम व माडिया हे शासनाच्या वर्गीकरणात आदिम समाज आहेत. त्यांना पुढे आणण्यास शासन व स्वयंसेवी संस्थांची भागीदारी महत्त्वाची आहे.

रामचंद्र मुटाटकर
संपादक

# पायाभूत सर्वेक्षण

आदिवासी उत्थान कार्यक्रम सप्टेंबर २००४ मध्ये सुरु झाला. मात्र स्वयंसेवकांची निवड होऊन जानेवारी २००५ पासून खऱ्या अर्थाने कार्यक्रमाला गती प्राप्त झाली. स्वयंसेवकांचे काम गाव-पाड्यातून सुरु झाल्यानंतर आणि पावसाळा संपल्यानंतर आदिवासी उत्थान कार्यक्रमाच्या कार्यक्षेत्रातील सर्व गावांमधून पायाभूत सर्वेक्षण करण्यात आले. हे सर्वेक्षण नोव्हेंबर २००५ ते जानेवारी २००६ या कालावधीत टप्प्याटप्याने करण्यात आले.

या पायाभूत सर्वेक्षणातून सुमारे दीड लाख आदिवासी लोकसंख्येची माहिती गोळा करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील एकूण आदिवासी लोकसंख्येपैकी १.७५% लोकसंख्या तर आदिवासी उपयोजने अंतर्गत क्षेत्रातील (अनुसूचित क्षेत्रातील) सुमारे ३.७५% लोकसंख्या या सर्वेक्षणाद्वारे सर्वेक्षित करण्यात आली असून महाराष्ट्रातील सर्व प्रमुख आदिवासी जमातींचा समावेश त्यामध्ये आहे. त्यामुळे या सर्वेक्षणातून पुढे आलेले निष्कर्ष हे महाराष्ट्रातील आदिवासी समाजाचे प्रातिनिधिक चित्र आहे असे म्हणता येईल.

सर्वेक्षणातील आकडेवारीचा उपयोग आदिवासी उत्थान कार्यक्रमासाठी तर होतच आहे, त्याचबरोबर ही आकडेवारी आदिवासी विकास विभाग तसेच इतर शासकीय विभागांच्या नियोजनासाठी देखील उपयोगी आहे. आदिवासी भागात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, कार्यकर्ते तसेच अभ्यासकांना देखील पायाभूत सर्वेक्षणातील माहिती उपयुक्त ठरेल. सर्वेक्षणातून पुढे आलेली आकडेवारी तपशीलवार पणे देण्यात आली आहे.

सर्वेक्षणातून गोळा झालेली माहिती मोठ्या प्रमाणात असल्याने हाकाराच्या तीन अंकामधून त्याची विभागणी करण्यात आली आहे.

भाग १ : लोकसंख्या, शिक्षण, रहाणी

भाग २ : आरोग्य

भाग ३ : शेती, अन्न सुरक्षितता, स्थलांतर

सर्वेक्षणातील आकडेवारीचे तालुकानिहाय तसेच आदिवासी जमातींनुसार देखील विश्लेषण करुन तक्ते बनवण्यात आले. वाचकांना तुलनात्मक आकडेवारी बघून निरनिराळ्या आदिवासी जमातींची तसेच तालुक्यांची परिस्थिति काय आहे हे लक्षात यावे यासाठी तालुकानिहाय आणि जमातनिहाय तक्ते प्रत्येक भागात देण्यात आले आहेत.

# सर्वेक्षण पध्दती

१. **सर्वेक्षण साधने** - सर्वेक्षणासाठी कुटुंब प्रश्नावली, गरोदर आणि स्तनदा मातांसाठी प्रश्नावली, ०-६ वयोगटातील मुलांची शारीरिक मोजमापांसाठी नोंद तक्ता यासारख्या साधनांचा वापर करण्यात आला.

२. **प्रशिक्षकांसाठी कार्यशाळा** - ऑक्टोबर २००५ मध्ये शेवटच्या आठवड्यात कर्जत (जि. रायगड) तालुक्यात सर्व तालुक्यातील प्रशिक्षकांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये सर्वेक्षकांना प्रशिक्षण कसे द्यायचे, सर्वेक्षणाचे नियोजन कसे करायचे, सर्वेक्षण साधने कशी वापरावयाची याबद्दल तीन दिवस सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले.

३. **सर्वेक्षक** - प्रत्येक तालुक्यामध्ये २०-३५ वर्ष वयोगटातील स्थानिक अदिवासी युवक-युवतींची सर्वेक्षक म्हणून निवड करण्यात आली. त्यापैकी बहुतांशी युवक कार्यक्षेत्रातील गावांमधील रहिवासी होते आणि त्यांना स्थानिक परिस्थिती तसेच बोलीभाषेचे ज्ञान होते. प्रत्येक तालुक्यामध्ये २० सर्वेक्षक सर्वेक्षणासाठी निवडण्यात आले त्यापैकी अनेकजण पदवीधर अथवा महाविद्यालयीन विद्यार्थी होते. काही तालुक्यांमध्ये आदिवासी उत्थान कार्यक्रमाच्या स्वयंसेवकांनी सर्वेक्षक म्हणून काम केले. सर्व तालुक्यांमध्ये आदिवासी उत्थान कार्यक्रमाच्या स्वयंसेवकांना सर्वेक्षक प्रशिक्षणात सहभागी करुन घेण्यात आले. ज्यामुळे त्यांना सर्वेक्षण प्रक्रिया समजून घेण्यात मदत तर झालीच तसेच सर्वेक्षकांना देखील स्वयंसेवकांची ओळख झाल्याने गाव-पाड्यात काम करताना अडचण आली नाही.

४. **सर्वेक्षकांचे प्रशिक्षण** - सर्वेक्षकांच्या प्रशिक्षणासाठी तीन दिवसाच्या कार्यशाळेचे आयोजन प्रत्येक तालुक्यातील कार्यक्षेत्रामध्ये करण्यात आले होते. प्रशिक्षणामध्ये कुटुंब प्रश्नावली तसेच इतर सर्वेक्षण साधनांवर तपशीलवार चर्चा करण्यात आली. सर्वेक्षकांनी स्थानिक बोलीभाषेत प्रश्न कशा प्रकारे विचारायचे याची नोंद करुन घेतली. सर्वेक्षकांची पूर्व चाचणी घेण्यात आली. त्यांच्याकडून कुटुंब प्रश्नावली भरुन घेण्यात आल्या. भरलेल्या प्रश्नावली तपासून त्यातील त्रुटींवर चर्चा करण्यात आली. पूर्व-चाचणी मध्ये असमाधानकारक कामगिरी केलेल्या सर्वेक्षकांना वगळण्यात आले.

५. **सर्वेक्षण** - नियोजित आराखड्यानुसार कार्यक्षेत्रामध्ये सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणाच्या कामाला नोव्हेंबर २००५ मध्ये कर्जत आणि अकोले तालुक्यापासून सुरुवात करण्यात आली. सर्वेक्षक गावामध्ये जाऊन सर्व कुटुंबांची प्रश्नावली भरून घेत आणि मग पुढच्या गावामध्ये जात. गावातील आदिवासी उत्थान कार्यक्रमाचा स्वयंसेवक सर्वेक्षकांना मदत करत असे. पूर्ण झालेल्या कुटुंब प्रश्नावली पर्यवेक्षकांकडून तपासल्या जात असत. सुरुवातीला अपूर्ण असलेल्या प्रश्नावलींची संख्या जास्त होती. अशा प्रश्नावली सर्वेक्षकांकडून पूर्ण करुन घेतल्या जात असत. पुन्हा माहिती गोळा करुन सर्वेक्षकांना जसजसा अनुभव येत गेला

तसतशी प्रश्नावली भरण्याचा दर्जा सुधारला. एक सर्वेक्षक दररोज सरासरी १० कुटुंबांची प्रश्नावली भरत असे. प्रत्येक तालुक्यातील कार्यक्षेत्रातून १०-१५ दिवसांमध्ये कुटुंब सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्यात आले.

एटापल्ली (जि. गडचिरोली) तालुक्यातील स्थानिक परिस्थितीमुळे वेगळ्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात आला. या तालुक्यात सर्वेक्षकांच्या संघाला एकत्रितपणे जाऊन गावातील कुटुंबांची माहिती घेणे शक्य नव्हते म्हणून २-३ सर्वेक्षकांचा एक गट असे ६ गट तयार करण्यात आले. प्रत्येक गटावर २ ते ३ गावांच्या सर्वेक्षणाची जबाबदारी सोपविण्यात आली. या कारणामुळे एटापल्ली तालुक्यातील सर्वेक्षणाचे काम ५ आठवडे चालले.

आदिवासी उत्थान कार्यक्रमाचे स्वयंसेवक आणि काही ठिकाणी सर्वेक्षकांनी मिमळून ०-५ वर्ष वयोगटातील मुलांची शारीरिक मोजमापे घेतली. त्यांना त्यासाठी वजन काटे तसेच उंची मोजण्यासाठी टेप देण्यात आले होते. शारीरिक मोजमापे कशी घ्यावीत यासाठी सर्वांना एक दिवसाचे प्रशिक्षण देण्यात आले. शारीरिक मोजमापे घेण्याचे काम डिसेंबर २००५ आणि जानेवारी २००६ या दोन महिन्यात पूर्ण करण्यात आले.

## ६. माहिती विश्लेषण

सर्वेक्षण प्रश्नावली भरुन झाल्यानंतर सर्व प्रश्नावली पुणे येथील मध्यवर्ती कार्यालयात पाठवण्यात आल्या. प्रश्नावलीमधील माहिती विशिष्ट प्रणालीद्वारे संगणकामध्ये साठवून माहितीसाठा तयार करण्यात आला. या कामासाठी सेंटर ऑफ स्टडिज इन सोशल सायन्सेस या संस्थेची मदत घेण्यात आली. माहितीसाठा तयार करण्याचे काम ऑक्टोबर २००६ मध्ये पूर्ण करण्यात आले.

त्यानंतर जानेवारी २००७ पर्यंत माहिती साठ्यामध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्यात आल्या. अपूर्ण असलेली माहिती भरलेल्या प्रश्नावलींच्या मदतीने पूर्ण करण्यात आली. परिपूर्ण झालेल्या माहिती साठ्याचे संगणकांच्या सहाय्याने विश्लेषण करण्यात आले. त्यातूनच तालुकावार आणि जमातनिहाय तक्ते तयार करण्यात आले.

## ७. सर्वेक्षणासातील अडचणी -

- कर्जत तालुक्यामध्ये शिकलेल्या आदिवासींचे प्रमाण अत्यल्प असल्याने सर्वेक्षक मिळवण्यात अडचणी आल्या. तसेच निवडलेल्या सर्वेक्षकांची गळती झाल्याने नविन सर्वेक्षक निवडून त्यांचे प्रशिक्षण घेऊन सर्वेक्षण करावे लागल्याने या तालुक्यात सर्वेक्षण प्रक्रिया एक महिन्यापर्यंत लांबली.
- आदिवासी लोकांचे वय काढणे अतिशय अवघड असते. माहिती देणाऱ्या व्यक्तींना वयस्कर व्यक्तींचे तसेच लहान मुलांचे (खासकरुन ३ वर्षाखालील) वय सांगता आले नाही. त्यामुळे १ वर्षाखालील मुलांचा आकडा नक्की काढता येऊ शकला नाही.
- पुणे शहरातील वीज भारनियमनामुळे सर्वेक्षणाचा संगणकीकृत माहितीसाठा तयार करण्यास एक महिना उशीर झाला.

# भाग १ : लोकसंख्या, शिक्षण, रहाणी व विकास योजना

## सर्वेक्षणाचे ठळक निष्कर्ष

आदिवासी उत्थान कार्यक्रमाच्या अंतर्गत येणाऱ्या सात जिल्ह्यातील नऊ तालुक्यामंधील कार्यक्षेत्रातील गावांमधून नोव्हेंबर २००५ ते जानेवारी २००६ या कालावधीमध्ये पायाभूत सर्वेक्षण करण्यात आले. त्यातील ठळक निष्कर्ष पुढीलप्रमाणे -

**लोकसंख्या :**

- सर्वेक्षणातून आदिवासी उत्थान कार्यक्रमाच्या कार्यक्षेत्रातील सुमारे २५० गावांमधून २८,६०८ आदिवासी कुटुंबे आणि त्यामधील १,४८,४२७ व्यक्तींचे सर्वेक्षण करण्यात आले.
- सर्वेक्षित करण्यात आलेल्या कुटुंबांचा सरासरी आकार ५.२ व्यक्ती एवढा होता. धडगाव तालुक्यात कुटुंबाचा सरासरी आकार सर्वात जास्त म्हणजे ५.९ होता तर झरीजामणी तालुक्यात सर्वात कमी म्हणजे एका कुटुंबातून सरासरी चारच व्यक्ती होत्या.
- सर्वेक्षित जमातींमध्ये सर्वात मोठा कुटुंब आकार भिल्लांमध्ये सरातरी ५.८ व्यक्ती तर सर्वात लहान कुटुंब आकार कोलाम जमातीत केवळ ४ एवढा होता.
- सर्वेक्षित लोकसंख्येमध्ये दर हजार पुरुषांमागे ९५७ स्त्रिया असल्याचे दिसून आले. झरीजामणी तालुक्यात हेच प्रमाण सर्वाधिक म्हणजे ९९६ तर मध्य प्रदेशाच्या सीमेला लागून असलेल्या धारणी तालुक्यात दर हजार पुरुषांमागे ९१५ स्त्रिया एवढे कमी होते.
- पावरा आणि कोलाम जमातीतील दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे अनुक्रमे १०३० आणि १०१२ एवढे होते. कोरकू जमातीतील दर हजार पुरुषांमागे केवळ ९११ स्त्रिया होत्या.

**विवाह :**

- एकूण विवाहित व्यक्तींपैकी (७४%) स्त्रिया आणि (८०%) पुरुषांचा विवाह कायदेशीर विवाहाचे वय पूर्ण होण्याआधी म्हणजे १८ किंवा २१ वर्षापूर्वी झाला. एटापल्ली आणि झरीजामणी तालुक्यातील सुमारे ४० टक्क्यांपेक्षा जास्त स्त्री-पुरुषांचे विवाह कायदेशीर विवाह वयानंतर झाले. यापैकी बहुतांश व्यक्ती माडिया, गोंड आणि कोलाम जमातीतील होत्या.
- उपलब्ध आकडेवारीनुसार जवळजवळ ४८% म्हणजे निम्म्या व्यक्तींचे लग्न १० किलोमीटरच्या परिघातच झाले होते.

**शिक्षण :**

- सर्व तालुक्यात मिळून (४२.५%) एवढी साक्षरता असल्याचे दिसून आले तर पुरुष आणि स्त्रियांमध्ये साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे (५०%) आणि (३५%) एवढे होते. धारणी तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण सर्वाधिक होते. तेथे पुरुष (७०%), स्त्रिया (५३%) तर एकूण साक्षरता (६२%) एवढी होती. धडगाव आणि अक्कलकुवा तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण सर्वात कमी होते-पुरुष (३५%), स्त्रिया (२५%).
- जमातींमध्ये, कोरकू आणि महादेव कोळी या जमातींमध्ये सर्वाधिक साक्षरता होती. कातकरी जमातीत साक्षरतेचे प्रमाण सर्वात कमी होते. एकूण (२४%), पुरुष (३१%), स्त्रिया (१६%).
- केवळ (४%) व्यक्ती दहावी उत्तीर्ण झाल्या होत्या तर (१%) व्यक्तींनी पदवीपर्यंत शिक्षण पूर्ण केले होते. धडगाव तालुक्यात पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करणाऱ्यांची संख्या सर्वाधिक होती.
- सर्वेक्षण काळात ६-१४ वर्ष वयोगटातील (६०%) मुलेच शाळेत जात होती, उर्वरित (४०%) मुले शालाबाह्य होती. या वयोगटामध्ये शाळेत न जाणाऱ्या मुलामुलींचे प्रमाण धडगाव आणि अक्कलकुवा तालुक्यात सर्वाधिक होते.
- कातकरी आणि भिल्ल जमातीतील ६-१४ वर्ष वयोगटातील सुमारे (६०%) मुले शालाबाह्य होती.

**व्यवसाय :**

- दहा वर्षावरील (७६%) व्यक्तींचा शेती हाच मुख्य व्यवसाय होता. कर्जत तालुक्यामध्ये (६०%) व्यक्तींचा मजुरी हा मुख्य व्यवसाय असल्याचे दिसून आले. (८३%) व्यक्तींनी मजुरी हा दुय्यम व्यवसाय असल्याचे सांगितले.
- बहुसंख्येने भूमीहीन असलेल्या कातकरी जमातीत (८४%) व्यक्तींनी मजूरकाम हाच मुख्य व्यवसाय असल्याचे सांगितले.

**घर :**

- एकूण सर्वेक्षित कुटुंबांपैकी बहुतांश कुटुंबांनी स्वत: घरे बांधली होती तर (११%) कुटुंबांना शासकीय योजनेमधून घरकुल बांधून मिळाले होते.
- सुमारे (११%) आदिवासी घरांवर अजूनही गवताचेच छप्पर असल्याचे दिसून आले.
- सर्वेक्षित करण्यात आलेल्या (१६%) घरांमधून वीज होती मात्र त्यापैकी केवळ निम्म्या घरातुनच मीटरसहित वीजजोड घेण्यात आला होता.

- केवळ (१०%) घरातून शौचालये बांधलेली होती आणि त्यापैकी फक्त (२८%) कुटुंबांमधूनच त्यांचा वापर केला जात होता.

**शासकीय योजनांमध्ये काम :**

- सर्वेक्षित केलेल्या एकूण कुटुंबांपैकी (३७%) कुटुंबातील व्यक्तींनी सर्वेक्षणापूर्वीच्या तीन वर्षाच्या काळात शासकीय योजनेमध्ये अल्प कालावधीसाठी (५ ते १५ दिवस) काम केले. मोखाडा आणि जव्हार तालुक्यातील सुमारे (७०%) कुटुंबातील किमान एका व्यक्तीने तरी शासकीय योजनेत मजुरी केली तर कर्जत तालुक्यात केवळ (६%) कुटुंबातील लोकांना शासकीय योजनेत काम मिळू शकले.
- वारली, ढोर कोळी आणि कोकणा जमातीतील सुमारे (६५%) कुटुंबातील लोकांना तर कोलाम समाजातील केवळ (१०%) लोकांना शासकीय योजनेवर काम करण्याची संधी मिळू शकली.
- शासकीय योजनेमधून प्रत्येक कुटुंबाला सरासरी ८२१/- रुपये मजुरी म्हणून मिळाले तर धान्यरुपी मजुरी मिळालेल्या कुटुंबांना सरासरी १२१ किलो धान्य मिळाले.

**शासकीय योजनांचा लाभ :**

- सर्वेक्षणापूर्वीच्या तीन वर्षांमध्ये मिळून सुमारे (६१%) कुटुंबांना किमान एका तरी शासकीय योजनेचा लाभ मिळाला. झरीजामणी आणि धारणी तालुक्यामध्ये प्रत्येकी (७७%) कुटुंबांना शासकीय योजनेचा फायदा मिळाला तर अकोले तालुक्यामध्ये तीन वर्षात केवळ (३२%) कुटुंबांनाच योजनांचा लाभ होऊ शकला.
- आदिवासी जमातींमध्ये कोलाम (८६%) आणि कोरकू (७७%) जमातीतील सर्वाधिक कुटुंबांना तर महादेव कोळी जमातीतील केवळ (४१%) कुटुंबांना किमान एक तरी शासकीय योजनेचा लाभ मिळला.
- खावटी कर्ज घरकुल योजना आणि मातृत्व अनुदान योजना या तीन योजनांचाच लाभ सर्वात जास्त कुटुंबांना मिळू शकला. जनश्री विमा योजना धान्य कोष, विहिर, डिझेल इंजिन, शेततळे, शेळीपालन, दुभती जनावरे, व्यवसाय प्रशिक्षण, किरकोळ व्यवसायासाठी कर्ज या योजनांचा लाभ केवळ काही कुटुंबांनाच मिळू शकला. खाचरे तयार करणे आणि फळबाग लागवड या कृषी विभागाच्या दोन योजनांचा लाभ केवळ जव्हार आणि मोखाडा तालुक्यातील आदिवासी कुटुंबांनाच झाला असल्याचे दिसून आले.

# १. लोकसंख्या

आदिवासी उत्थान कार्यक्रम महाराष्ट्रातील ७ जिल्ह्यातील ९ तालुक्यातून २००४ पासून सुरु झाला असून त्याअंतर्गत येणाऱ्या सर्व गावपाड्यांचे पायाभूत सर्वेक्षण नोव्हेंबर - डिसेंबर २००५ या कालावधीत करण्यात आले.

आदिवासी उत्थान कार्यक्रमाच्या कार्यक्षेत्रातील लोकसंख्या व तिची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे-

## १.१ एकूण लोकसंख्या

आदिवासी उत्थान कार्यक्रमाच्या कार्यक्षेत्रांतर्गत येणाऱ्या सुमारे २५० गावांमधून रहाणाऱ्या २८६०८ आदिवासी कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. एकूण १,४८,४२७ लोकसंख्येपैकी ७५,८३८ (५१%) पुरुष आणि ७४,५८९ (४९%) स्त्रिया होत्या.

एकूण ९ तालुक्यातील कार्यक्षेत्रांपैकी धडगाव तालुक्यात सर्वात जास्त म्हणजे २५,२६१ व त्याखालोखाल मोखाडा कार्यक्षेत्रात १९,२६६ लोकसंख्या होती. एटापल्ली आणि झरीजामणी कार्यक्षेत्रात सर्वात कमी म्हणजे अनुक्रमे ११,२९० आणि १०,८७४ एवढी लोकसंख्या होती.

नऊ कार्यक्षेत्रातील जमातनिहाय लोकसंख्या पुढीलप्रमाणे :- भिल्ल - ३५,२६४, महादेव कोळी - २२,७३०, कोरकू - १४,८४३, ठाकर - १४,६८८ आणि कोकणा - ११,४७८; महाराष्ट्रातील तीन अतिमागास असलेल्या जमातींची कार्यक्षेत्रातील लोकसंख्या याप्रमाणे - कातकरी - ९,०५२, माडिया - ८,६५१ आणि कोलाम - ५,७४४.

## १.२ कुटुंबाचा आकार (कुटुंबातील सरासरी व्यक्तींची संख्या)

सर्व नऊ कार्यक्षेत्रात मिळून कुटुंबाचा सरासरी आकार ५.२ व्यक्ती एवढा होता. झरीजामणी तालुक्यात कुटुंबाचा आकार सर्वात कमी म्हणजे दर कुटुंबामध्ये ४ व्यक्ती तर कर्जत तालुक्यात (४.७) एवढा होता. विदर्भातील धारणी आणि एटापल्ली तालुक्यात कुटुंबाचा आकार (५.४) असा होता. सर्वात मोठे कुटुंब सातपुड्यातील धडगाव व अक्कलकुवा या तालुक्यात पहायला मिळाले. या दोन तालुक्यात कुटुंबाचा आकार अनुक्रमे (५.९) आणि (५.८) एवढा होता.

जमातवार विश्लेषण केले असता परधान (३.७), कोलाम (४.१) आणि गोंड (४.७) या विदर्भातील जमातींचा कुटुंब आकार सर्वात लहान असल्याचे दिसून आले. याचबरोबर कातकरी कुटुंबाचाही आकार (४.३) छोटा होता. उत्तर महाराष्ट्रातील पावरा (६.१) आणि भिल्ल (५.९) या जमातींमध्ये कुटुंबाचा आकार सर्वात मोठा होता.

## १.३ स्त्री-पुरुषांचे प्रमाण

सर्वेक्षित लोकसंख्येमध्ये स्त्रियांचे प्रमाण दर हजार पुरुषांमागे ९५७ एवढे होते. मध्य प्रदेशाच्या सीमेलगतच्या धारणी तालुक्यात हेच प्रमाण सर्वात कमी म्हणजे ९१५ एवढे होते त्यापाठोपाठ अकोले ९४८, एटापल्ली ९५३ आणि कर्जत ९५५ असे स्त्रियांचे प्रमाण होते. स्त्रियांचे सर्वाधिक प्रमाण झरीजामणी तालुक्यात दर हजार पुरुषांमागे ९९६ स्त्रिया एवढे आढळून आले.

स्त्री-पुरुष प्रमाणाचा जमातवार तक्ता बघितला असता, दर हजार पुरुषांमागे सर्वात जास्त स्त्रियांचे प्रमाण - पावरा १०३०, कोलाम १०१२, ढोरकोळी ९८२ या जमातींमध्ये दिसून आले तर कोरकू ९११, कोकणा ९४७ आणि महादेव कोळी ९४९ या जमातींमध्ये त्यामानाने दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण कमी होते.

## १.४ वयोगटानुसार लोकसंख्या

एकूण लोकसंख्येपैकी (४०%) लोकसंख्या ०-१५ वर्ष या वयोगटातील होती. धडगाव आणि अक्कलकुवा तालुक्यात ०-१५ वर्ष वयोगटात प्रत्येकी (४७%) लोकसंख्या होती. याचाच अर्थ या दोन तालुक्यात जननदर जास्त असून येथे तरुण मुले अधिक आहेत. याउलट झरीजामणी तालुक्यात केवळ (३४%) लोकसंख्या ०-१५ वर्ष वयोगटात होती. जननदर कमी असल्याचेच ही आकडेवारी दर्शवते. १५-६० वर्ष या उत्पादक गटामध्ये सुमारे (५५%) लोकसंख्या होती तर सुमारे (५%) लोकांचे वय साठ वर्षापेक्षा जास्त होते. अकोले तालुक्यात (८%) लोकांचे वय साठ वर्षापेक्षा अधिक होते. धडगाव तालुक्यात साठी पार केलेल्यांची संख्या केवळ (३%) होती.

भिल्ल जमातीत ०-१५ वर्ष वयोगटातील सुमारे (४८%) लोकसंख्या तर कोलामांमध्ये हेच प्रमाण (३६%) एवढे होते. भिल्लांमध्ये जननदर जास्त असल्याचे तसेच लोकसंख्या देखील तरुण असल्याचे आकडेवारी सूचित करते. महादेव कोळी जमातीत म्हाताऱ्या लोकांची संख्या (वय वर्ष साठ पेक्षा अधिक) सर्वात जास्त (७.५%) तर भिल्ल जमातीत सर्वात कमी म्हणजे केवळ (३%) होती.

## १.५ ०-६ वर्ष वयोगटातील लोकसंख्या

सर्व कार्यक्षेत्रात मिळून ०-६ वर्ष वयोगटातील लोकसंख्या २१,५८५ (१४.५%) एवढी होती. झरीजामणी तालुक्यात या वयोगटातील मुलांची संख्या एकूण लोकसंख्येच्या केवळ (१०%) तर अक्कलकुवा तालुक्यात (१८%) एवढी होती.

जमातनिहाय विश्लेषण केले असता, भिल्ल आणि ढोरकोळी (प्रत्येकी १७%) आणि पावरा (१६%) या जमातीत ०-६ वयोगटात सर्वाधिक मुले व सर्वात जास्त जननदर असल्याचे दिसते तर गोंड आणि कोलाम (प्रत्येकी ११%) आणि परधान (९%) या विदर्भात राहणाऱ्या जमातीमंध्ये ०-६ वर्ष वयोगटात सर्वात कमी मुले असल्याचे आढळून आले.

### लेखकांसाठी

*हाकारा त्रैमासिकाने गेली २७ वर्ष अखंडपणे आदिवासी जीवन, संस्कृती, समस्या, कला, साहित्य आदी गोष्टींची ओळख इतर पांढरपेशी-नागर समाजाला करुन दिलेली आहेच, परंतु त्याचबरोबर आदिवासी नवसाहित्यिकांना एक हक्काचे व्यासपीठ हाकाराच्या रुपाने मिळाले आहे.*

*अशा या नियतकालिकात आणखीही काही कार्यकर्त्यांना आपले विचार मांडायचे असतील, लेखक-कवींना आपले साहित्य प्रसिध्द व्हावे असे वाटत असेल, तर जरुर लिहावे व आमच्याकडे पाठवावे. पत्ता अंकात दिलेला आहेच.*

# २. विवाह

## २.१ वैवाहिक स्थिती

सर्वेक्षित करण्यात आलेल्या १० वर्षावरील लोकसंख्येपैकी ६४,४१९ (६२%) व्यक्ती सर्वेक्षणाच्या वेळेस विवाहित असल्याचे दिसून आले. ४६१६ (४%) व्यक्ती विधवा/विधूर होत्या तर २२८ व्यक्ती आपल्या जोडीदारापासून विभक्त झालेल्या होत्या. केवळ १६५ जणांनी आपल्या जोडीदारापासून घटस्फोट घेतला होता. ३४६६४ (३३%) व्यक्ती अविवाहित होत्या.

## २.२ स्त्री-पुरुषांची वैवाहिक स्थिती

दहा वर्षावरील एकूण ५३,२१८ पुरुषांपैकी (६०%) पुरुष विवाहित होते तर (३७%) अविवाहित आणि १४३३ (३%) विधूर होते. केवळ ८४ पुरुष घटस्फोटित आणि ५५ पुरुष विभक्त झालेले होते.

दहा वर्ष वयावरील एकूण ५०,८६६ स्त्रियांपैकी (६४%) विवाहित तर (३३%) अविवाहित आणि ३१८३ (६%) स्त्रिया विधवा होत्या. केवळ १०१ स्त्रिया घटस्फोटित आणि १४४ स्त्रिया विभक्त झालेल्या होत्या.

## २.३ पुरुषांचे विवाह वय

एकूण ३२,३९५ विवाहित पुरुषांपैकी (२४%) पुरुषांचे लग्न वयाच्या १५-१८ वर्षादरम्यान तर (५२%) पुरुषांचे लग्न १८-२१ वर्षादरम्यान झाले होते. अशा प्रकारे सुमारे (८०%) पुरुषांचे लग्न २१ वर्षाच्या आधीच म्हणजे कायदेशीर विवाह वयाच्या आधीच झालेले होते. २१ ते २५ वर्षादरम्यान लग्न झालेल्या पुरुषांचे प्रमाण केवळ (१७%) होते.

अकोले आणि धडगाव तालुक्यात अनुक्रमे (११%) व (७%) पुरुषांचे लग्न १५ वर्षाच्या आधीच झाले. कर्जत, धडगाव आणि अक्कलकुवा तालुक्यात (प्रत्येकी ८९%) पुरुषांचे लग्न २१ वर्षाच्या आतच झाल्याचे दिसून आले. तर धारणी आणि अकोले तालुक्यात हेच प्रमाण अनुक्रमे (८७%) आणि (८५%) होते. याउलट एटापल्ली आणि झरीजामणी तालुक्यातील केवळ (४४%) आणि (४१%) पुरुषांनी २१ वर्षाच्या आत लग्न केले असल्याचे दिसून आले. विदर्भातील या दोन तालुक्यातील विवाह वयाचा कल इतर तालुक्यांपेक्षा पूर्णपणे भिन्न असल्याचेच आकडेवारीतून ध्वनीत होते. धारणी तालुका जरी विदर्भात येत असला तरी हा तालुका मध्यप्रदेशाच्या सीमेला लागूनच आहे. मध्य भारतात पाळल्या जाणाऱ्या विवाहप्रथा परंपरांचा प्रभाव असल्याने विवाह वय या तालुक्यात कमी असल्याचे दिसून येते.

सर्व कार्यक्षेत्रातील पुरुषांचे सरासरी विवाह वय १८.८ वर्ष असल्याचे दिसले. अकोले आणि धडगाव तालुक्यात सरासरी विवाह वय सर्वात कमी म्हणजे अनुक्रमे १७.६ आणि १७.५ वर्ष एवढे होते. तर सर्वात जास्त विवाह वय झरीजामणी (२०.७ वर्ष)आणि एटापल्ली (२०.६वर्ष) या तालुक्यात पहायला मिळाले.

जमातनिहाय विश्लेषणातून असे दिसून येते की, कातकरी (९१%), भिल्ल (८७%), कोरकू आणि पावरा (प्रत्येकी ८४%) पुरुषांचे लग्न वयाच्या

एकविसाव्या वर्षाच्या आधीच झाले. आदिवासींमध्ये प्रगत समजल्या जाणाऱ्या कोकणा आणि महादेव कोळी जमातींमध्ये देखील अनुक्रमे (८०%) आणि (८२%) पुरुषांचे लग्न कायदेशीर विवाह वयाच्या आधीच झाले होते. याउलट विदर्भातील परधान (५६%), माडिया आणि गोंड (प्रत्येकी ४३%) आणि कोलाम (३६%) या जमातींमध्ये पुरुषांनी वयाच्या एकविसाव्या वर्षानंतर लग्न केले.

भिल्ल आणि पावरा जमातीत पुरुषांचे सरासरी विवाह वय १७.७ वर्ष इतके कमी आढळून आले तर कोकणा, कातकरी, ठाकर आणि वारली या सह्याद्री विभागात राहणाऱ्या जमातींमध्ये पुरुष विवाह वयाची सरासरी १९ वर्ष एवढी होती. विदर्भातील कोलाम (२०.५ वर्ष), माडिया (२०.६ वर्ष) आणि गोंड (२०.९वर्ष) या जमातीत सरासरी विवाह वय सर्वाधिक होते

## २.४ स्त्रियांचे विवाह वय

एकूण ३४,६०४ विवाहित स्त्रियांपैकी (१५%) स्त्रियांचे लग्न १५ वर्षाच्या आत झाले होते तर (५९%) स्त्रियांचे लग्न १५-१८ वर्षादरम्यान झाले होते. अशा प्रकारे सुमारे (७४%) स्त्रियांचे लग्न १८ वर्षाच्या आधी म्हणजेच कायदेशीर विवाह वयाच्या आधीच झाले होते. केवळ (२६%) स्त्रियांचे लग्न १८ वर्षानंतर करण्यात आले.

अकोले आणि धडगाव तालुक्यात पंधरा वर्षाच्या आत लग्न होणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे अनुक्रमे (३१%) व (२३%) होते. धारणी (८६%), अकोले (८४%), कर्जत (७९%) आणि धडगाव (७७%) या तालुक्यात बहुतांश स्त्रियांचे लग्न १८ वर्ष वयाच्या आतच झाल्याचे आकडेवारी सांगते. झरीजामणी आणि एटापल्ली तालुक्यात यापेक्षा वेगळा कल पहायला मिळतो. या दोन तालुक्यांमध्ये १८ वर्ष वयाच्या आधी लग्न करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण अनुक्रमे (५९%) आणि (४८%) इतके कमी असल्याचे दिसून आले. याचाच अर्थ असा की झरीजामणी तालुक्यात (४१%) स्त्रियांचे आणि एटापल्ली तालुक्यात (५२%) स्त्रियांचे लग्न कायदेशीर विवाह वय पूर्ण झाल्यावरच करण्यात आले.

सर्व कार्यक्षेत्रांसाठी स्त्रियांच्या लग्नाच्या वयाची सरासरी १६.७ वर्ष एवढी होती. विवाहासाठीच्या वयाची सर्वात कमी सरासरी अकोले आणि धडगाव तालुक्यात अनुक्रमे १५.५ वर्ष आणि १६ वर्ष एवढी कमी होती. सर्वात जास्त विवाह वयाची सरासरी झरीजामणी (१७.७ वर्ष) आणि एटापल्ली (१८.६ वर्ष) या तालुक्यांमध्ये बघायला मिळाली.

जमातनिहाय विश्लेषणातून असे दिसून येते की कोरकू (८६%), कातकरी (८१%), भिल्ल (७५%) आणि पावरा (७३%) समाजातील बहुतांश स्त्रियांचे लग्न १८ वर्ष वयाच्या आतच झाले होते. महादेव कोळी आणि कोकणा यासारख्या प्रगत जमातींमध्ये देखील अनुक्रमे (८०%) आणि (७४%) स्त्रियांचे लग्न कायदेशीर विवाह वय पूर्ण करण्याच्या आतच झालेले होते. याउलट विदर्भातील परधान आणि माडिया (प्रत्येकी ५१%), गोंड (४३%) आणि कोलाम (३८%) या जमातींमध्ये मोठ्या प्रमाणावर अठरा वर्षानंतरच स्त्रियांचे लग्न झाले.

महादेव कोळी जमातीमध्ये विवाह वयाची सरासरी सर्वात कमी म्हणजे १५.९ वर्ष एवढीच होती.

भिल्ल आणि पावरा जमातीत स्त्री विवाहाचे सरासरी वय केवळ १६.१ वर्ष होते. तर सह्याद्री विभागात राहणाऱ्या कोकणा, कातकरी, ठाकर आणि वारली जमातींमध्ये स्त्रियांचे सरासरी लग्नाचे वय १६.७ वर्ष इतके होते. विदर्भातील जमातींमध्ये लग्नाचे सरासरी वय कायदेशीर विवाह वयापेक्षा जास्त होते. गोंड (१८.१ वर्ष), माडिया (१८.५ वर्ष) आणि कोलाम (२०.५ वर्ष).

### २.५ विवाहाचे अंतर

सर्वेक्षित लोकसंख्येपैकी २५,४४० व्यक्तींसाठी विवाहाच्या अंतराची माहिती उपलब्ध झाली. (२७%) व्यक्तींचा विवाह आपल्या गावापासून ५ किलोमीटर परिघातील घरात झाला तर आणखी (२१%) व्यक्तींचा विवाह ५ ते १० किलोमीटर अंतरावर झाला. १० ते २० किलोमीटर अंतरावर लग्न करणाऱ्यांचे प्रमाण (२६%) एवढे होते. तर (२२%) जणांनी २०-५० किलोमीटर अंतरावरील जोडीदार निवडला. पन्नास किलोमीटरच्या पलिकडे लग्न करणाऱ्या केवळ (३.५%) व्यक्ती होत्या.

जमातनिहाय विश्लेषणातून असे दिसून येते की, भिल्ल (३९%) आणि पावरा (३६%) व्यक्तींनी केवळ ५ किलोमीटर परिघातील घरामध्ये आपली सोयरीक जमवली तर परधान (१०%) आणि गोंड (६%) समाजातील व्यक्तींनी ५० किलोमीटरपेक्षा जास्त अंतरावर आपला विवाह केला.

अशा प्रकारे सुमारे (९६%) व्यक्तींचे लग्न केवळ ५० किलोमीटरच्या परिघातच झाल्याचे दिसून येते. विवाहाच्या अंतरावरुन आदिवासी जमातींमध्ये अत्यंत जवळच्या अंतरावरचीच (पायी चालण्याच्या टप्प्यातील) सोयरीक केले जाते आणि त्यांचे समाज वर्तुळ खूपच लहान आहे हे दिसून येते.

# ३. शिक्षण

### ३.१ साक्षरता

सर्वेक्षित केलेल्या एकूण लोकसंख्येपैकी सहा वर्षावरील ४२.५% व्यक्ती साक्षर असल्याचे दिसून आले. पुरुषांमध्ये (५०%) स्त्रियांपेक्षा (३५%) साक्षरतेचे प्रमाण अधिक होते.

धारणी तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण सर्वात जास्त (६२%) होते. सर्व तालुक्यांमध्ये पुरुष (७०%) व स्त्रियांच्या (५३%) साक्षरतेमध्ये देखील हा तालुका पुढारलेला असल्याचे आढळले. याउलट सातपुड्याच्या डोंगरकुशीत वसलेल्या धडगाव व अक्कलकुवा या तालुक्यातील परिस्थिती. दुर्गमता, सोयीसुविधांचा अभाव, अविकसित प्रदेश यामुळे धडगाव (२७%) व अक्कलकुवा (२९%) तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण अत्यंत कमी होते. धडगाव तालुक्यात केवळ (२१%) स्त्रिया व (३३%) पुरुष साक्षर होते.

जमातवार साक्षरतेचा विचार करता विदर्भातील परधान (७३%) कोरकू (६२%) तसेच पश्चिम महाराष्ट्रातील महादेव कोळी (६०%) या जमाती पुढारलेल्या असल्याचे दिसून येते. याउलट सह्याद्रीमधील कातकरी (२४%) ही अतिमागास

जमात, सातपुड्यातील भिल्ल (२७%) तसेच एटापल्ली मधील माडिया (३१%) या जमाती साक्षरतेच्या बाबतीत अत्यंत मागासलेल्या आहेत असे म्हणता येईल.

सहा वर्षाखालील मुले व निरक्षर व्यक्ती वगळता एकूण ५३७०० लोकांनी कोणत्या ना कोणत्या प्रकारचे शिक्षण घेतले होते. सुमारे (२९.५%) व्यक्तींनी पहिली ते तिसरी पर्यंतचे शिक्षण तर (२९%) व्यक्तींनी चौथी ते सहावी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले होते. याचाच अर्थ असा की एकूण साक्षर व्यक्तींपैकी (५८%) केवळ व्यक्तींनी सहावी पर्यंतचे शिक्षण घेतले होते. सुमारे (२४.६%) व्यक्तींनी सातवी ते नववी पर्यंत शिक्षणाची पूर्तता केली. दहावी उत्तीर्ण झालेले केवळ (१०%) तर बारावीची परीक्षा उत्तीर्ण झालेले फक्त (५%) लोक होते. पदवी अथवा पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्यांचे प्रमाण केवळ (१%) एवढेच होते.

तालुकानिहाय पदवीधरांची तुलना केल्यास धडगाव तालुक्यात सर्वाधिक (१०९) पदवीधर असल्याचे दिसून येते. त्यापाठोपाठ अकोले (९९) तसेच जव्हार (८४) या तालुक्यांचा क्रमांक लागतो. एटापल्ली व कर्जत तालुक्यांमध्ये केवळ १० पदवीधर असल्याचे आढळले. धडगाव तालुक्यामध्ये पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेल्यांची संख्यादेखील सर्वात जास्त (४४) होती. त्यापाठोपाठ अकोले तालुक्यात ४० जणांनी पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले होते. एटापल्ली तालुक्यात केवळ दोन व्यक्तींनी पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्याचे आढळून आले.

महादेव कोळी (१३०), भिल्ल (१२९) आणि कोकणा (१०१) या जमातींमध्ये पदवीधरांची संख्या सर्वाधिक होती. भिल्ल (५७) व महादेव कोळी (४५) या जमातींमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या सर्वाधिक व्यक्ती दिसून आल्या.

अतिमागास जमातींमध्ये केवळ १८ व्यक्ती पदवी पर्यंत शिकल्या होत्या. कातकरी (३), कोलाम (७), माडिया (८) तर या जमातींपैकी केवळ माडिया जमातीत दोन पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या व्यक्ती होत्या.

### ३.२ स्त्री-पुरुष शिक्षण

पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांच्या शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याचे पहायला मिळाले. कोरकू आणि महादेव कोळी या जमातींमध्ये पुरुष साक्षरतेचे प्रमाण प्रत्येकी (७०%) होते तर स्त्रियांमध्ये हेच प्रमाण अनुक्रमे (५३%) आणि (५०%) आढळले. सर्वेक्षित केलेल्या जमातींपैकी माडिया (३७%), भिल्ल (३३%) व कातकरी (३१%) या जमातींमध्ये पुरुषांमध्ये इतकी कमी साक्षरता होती. तर स्त्रियांमध्ये साक्षरतेचे प्रमाण या पेक्षाही कमी म्हणजे अनुक्रमे (२३%), (२१%) व (१६%) होते.

अति मागास अशा तीन आदिवासी जमातींमध्ये साक्षरता तसेच शिक्षणाचे प्रमाण अत्युल्प आहे. कातकरी व माडिया जमातींमध्ये प्रत्येकी केवळ एक महिला पदवीधर झाली होती तर कोलाम समाजात दोन महिला पदवीधर होत्या. या तीनही जमातींपैकी कोणत्याही जमातीतून महिलेने पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले नव्हते.

सर्वेक्षित केलेल्या लोकसंख्येमध्ये ४२० पुरुष आणि ७६ महिलांनी पदवीपर्यंतचे शिक्षण घेतले होते तर ११९ पुरुष आणि केवळ ९ महिलांनी पदव्युत्तर

शिक्षणाचा टप्पा ओलांडला होता. धडगाव (१९) आणि अकोले (१३) या तालुक्यातून पदवी शिक्षण घेणाऱ्या महिलांचे प्रमाण सर्वाधिक होते.

### ३.३ ६ ते १४ वर्ष वयोगटातील मुलांचे शिक्षण

एकूण लोकसंख्येपैकी ३७३०३ मुले ६-१४ वर्ष वयोगटातील होती. त्यापैकी २२४५० (६०%) मुले शाळेत जात असल्याचे तर (४०%) मुले शाळा शिकत नसल्याचे दिसून आले.

६-१४ वर्ष वयोगटातील शाळेत शिकणाऱ्या मुलांचे तालुकानिहाय चित्र असे होते - अकोले (८३%), धारणी (८०%) झरी जामणी (७८%). अक्कलकुवा आणि धडगाव तालुक्यात अनुक्रमे केवळ (४५%) व (३७%) मुले शाळेत जात होती. या वयोगटातील जमातनिहाय शिक्षणाची आकडेवारी बघितली असता महादेव कोळी ८३%), कोरकू आणि गोंड (प्रत्येकी ८०%), कोकणा (७७%) या जमाती पुढे असल्याचे दिसते. याउलट ढोर कोळी (४७%), कातकरी (४१%) आणि भिल्ल (३९%) या जमातींमध्ये शिक्षणाचे प्रमाण आजही अत्यल्प असल्याचे दिसते.

### ३.४ सहा ते चौदा वर्ष वयोगट : मुला-मुलींचे शिक्षणाचे प्रमाण

सर्वेक्षण काळात ६-१४ वर्ष वयोगटातील (६४%) मुले आणि (५७%) मुली शालेय शिक्षण घेत होत्या. याचाच अर्थ असा की उर्वरित ३६% मुले आणि ४३% मुली शालाबाह्य होती - त्यांनी शिक्षण अर्ध्यावरच सोडले होते अथवा अजिबातच घेत नव्हते.

धडगाव तालुक्यात शालाबाह्य मुला-मुलींचे प्रमाण सर्वात जास्त होते अनुक्रमे (५८%) आणि (६७%) तर याउलट अकोले तालुक्यातील केवळ (१५%) मुले आणि (२०%) मुली शाळेत जात नव्हत्या.

जमातनिहाय विश्लेषणातून असे दिसून येते की महादेव कोळी मुले (८५%) व त्याखालोखाल गोंड व कोरकू (८१% प्रत्येकी) सर्वात जास्त प्रमाणात शाळेत जात होती. ६-१४ वर्ष वयोगटातील अत्यंत कमी प्रमाणात शालेय शिक्षण घेणाऱ्या मुलांमध्ये ढोर कोळी (४८%) भिल्ल व कातकरी (प्रत्येकी ४४%) या जमाती होत. या तुलनेत कोलाम आणि माडिया जमातीतील मुलांचे शिक्षण घेण्याचे प्रमाण चांगले होते अनुक्रमे (७५%) आणि (६०%).

महादेव कोळी (८१%) गोंड आणि कोरकू (७९%) या जमातीत शिक्षण घेणाऱ्या मुलींचे प्रमाण सर्वाधिक होते तर माडिया (४५%), कातकरी (३९%) आणि भिल्ल (३३%) मुली शिक्षण घेत होत्या. या तुलनेत अतिमागास जमात असलेल्या कोलामांमध्ये (७२%) मुली शाळेमध्ये शिकत होत्या.

# ४. व्यवसाय

## ४.१ मुख्य व्यवसाय

दहा वर्षावरील एकूण ६४५३० व्यक्तींनी आपण अर्थार्जनात गुंतले असल्याचे सांगितले . (७६%) लोकांनी शेती हाच आपला मुख्य व्यवसाय असल्याचे सांगितले तर (१८%) लोकांनी मजुरी आणि (४%) लोकांनी शेतमजुरी हाच मुख्य व्यवसाय सांगितला.

धडगाव (९८%), अकोले व एटापल्ली (प्रत्येकी ९७%), अक्कलकुवा (९६%) या तालुक्यातील लोक बहुसंख्य शेती व्यवसायात गुंतले होते तर झरीजामणी आणि कर्जत तालुक्यात हेच प्रमाण अनुक्रमे (४५%) आणि (३९%) इतके होते. कर्जत तालुक्यात (६०%) आणि झरीजामणी तालुक्यात (४०%) एवढ्या मोठ्या प्रमाणावर लोकांचा मजुरी हाच मुख्य व्यवसाय होता.

जमातवार विश्लेषणातून असे दिसून आले की पावरा (९९%), भिल्ल (९८%), माडिया (९७%), महादेव कोळी (९२%) या जमातींमध्ये शेती हाच मुख्य व्यवसाय आहे. कातकरी जमातीत बहुतांश कुटुंबे भूमीहीन असल्याने केवळ (१५%) लोकांनी शेती हा मुख्य व्यवसाय असल्याचे सांगितले तर (८४%) व्यक्तींनी आपण मजुरी करुन पोट भरत असल्याचे सांगितले. कोलाम समाजामध्ये (५१%) व्यक्ती शेती व्यवसायात तर (१५%) व्यक्ती शेतमजुरी करत होत्या. त्याचबरोबर (३४%) व्यक्तींचा मजुरी हाच मुख्य व्यवसाय होता.

मुख्य व्यवसाय म्हणून नोकरी वा अन्य उद्योग वा व्यवसाय करणाऱ्यांचे प्रमाण अत्यल्प होते.

## ४.२ दुय्यम व्यवसाय

दहा वर्षावरील एकूण ११२७० व्यक्तींनी आपण दुय्यम व्यवसाय करत असल्याचे सांगितले त्यापैकी ६४८३ पुरुष व ४७८३ स्त्रिया होत्या.

मजुरी हा (८३%) लोकांचा दुय्यम व्यवसाय होता, (९%) लोक शेतमजुरी तर (४%) लोक किरकोळ व्यवसायात गुंतले होते. केवळ (१%) लोक नोकरी करत होते. अकोले तालुक्यात (२४%) व्यक्ती किरकोळ व्यवसायात गुंतलेल्या होत्या तर जव्हार तालुक्यात (९%) लोक नोकरी करत होते. सुमारे (१५%) महादेव कोळी आणि (११%) कोकणा व्यक्तींनी दुय्यम व्यवसाय करत असल्याचे सांगितले.

# ५. घर

### ५.१ घराची मालकी

कार्यक्षेत्रातील बहुतांश गावांमधून आदिवासी कुटुंबे आपल्या स्वत:च्या मालकीच्या घरातून रहात होती. जव्हार तालुक्यात (७९%) तर धडगाव तालुक्यात (९७%) कुटुंबांनी स्वत: बांधलेल्या घरातून रहात असल्याचे सांगितले. एकूण सर्वेक्षित कुटुंबांपैकी (८८%) कुटुंबे स्वत: बांधलेल्या घरातून राहात होती तर (११%) कुटुंबांना शासनाच्या इंदिरा आवास योजनेतून घर बांधून मिळाले होते. शासनाच्या योजनेचा फायदा मात्र सर्व तालुक्यातून सारख्या प्रमाणात मिळाला नसल्याचे आकडेवारीतून दिसून आले. अकोले, धडगाव, अक्कलकुवा आणि धारणी तालुक्यातून केवळ ३ ते ६% कुटुंबांनाच शासनाच्या घरकुल योजनेचा फायदा मिळाला होता. याउलट जव्हार तालुक्यात सर्वाधिक म्हणजे (१९%) कुटुंबांना तसेच एटापल्ली (१७%) आणि कर्जत (१६%) तालुक्यातील कुटुंबांना शासनाच्या योजनेतून मदत मिळाली होती.

जमातनिहाय विश्लेषणातून असे दिसून आले की भिल्ल (९५%) कोरकू आणि महादेव कोळी (प्रत्येकी ९३%) आणि पावरा (९२%) स्वत: बांधलेल्या घरात रहात होते. ढोर कोळी (१८%), वारली (१७%) आणि गोंड (१३%) जमातीतील कुटुंबे शासकीय योजनेतून बांधलेल्या घरकुलांमधून रहात होती. शासनाच्या इंदिरा आवास योजनेचा लाभ भिल्ल आणि महादेव कोळी जमातीतील केवळ प्रत्येकी (५%) कुटुंबांनाच मिळाला असल्याचे दिसून आले.

तीन अतिमागास जमातींपैकी (७५%) कातकरी, (८६%) कोलाम आणि (८२%) माडिया कुटुंबे स्वत: बांधलेल्या घरातून रहात होती. शासनाच्या घरकुल योजनेचा सर्वाधिक लाभ कातकरी (२२%) कुटुंबांना मिळाला असल्याचे सर्वेक्षणातून दिसून आले. माडिया आणि कोलाम जमातीतील अनुक्रमे (१८%) आणि (१२%) कुटुंबांना इंदिरा आवास योजनेतून घरे बांधून मिळाली.

### ५.२ घराच्या भिंती

आदिवासी जंगल, दऱ्याखोऱ्या, डोंगरातून रहात असल्याने घर बांधण्यासाठी स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या साहित्याचाच वापर केला जातो. एकूण २८६०८ कुटुंबांपैकी (५२%) कुटुंबांनी बांबू / कारवी यासारख्या जंगलातील साहित्याचा वापर करुन घराच्या भिंती बांधल्या तर (१४%) घरांना मातीच्या आणि (८%) घरांना दगडाच्या भिंती होत्या. (२४%) घरांच्या भिंती विटांनी बांधलेल्या होत्या.

### ५.३ घराचे छप्पर

एकूण सर्वेक्षित कुटुंबांपैकी (५२%) कुटुंबांच्या घरावर मंगलोरी कौले होती तर (३०%) कुटुंबांनी पारंपारिक कौलांचा वापर केला होता. (११%) घरांची छपरे गवताने आच्छादलेली होती तर केवळ (६%) कुटुंबांनी आपल्या घरावर पत्र्याचे छप्पर घातले होते.

एटापल्ली (९२%), झरीजामणी (८३%), जव्हार (८१%), अकोले (७६%) आणि मोखाडा

(७४%) तालुक्यातील बहुसंख्य घरांवर मंगलोरी कौले घातलेली होती. धडगाव (९३%) आणि अक्कलकुवा (८७%) तालुक्यात बहुतांश घरांवर पारंपारिक कौलांचा वापर छपरासाठी करण्यात आला होता. धारणी तालुक्यात घराच्या छपरासाठी एकच असे साहित्य वापरल्याचे दिसून आले नाही. या तालुक्यातील (३५%) घरांवर पत्रा (२८%) घरांवर पारंपारिक कौले घालण्यात आली होती. याच तालुक्यात सर्वाधिक म्हणजे (२४%) घरांवर गवताचे छप्पर घालण्यात आले होते. कर्जत तालुक्यात देखील सुमारे (१९%) घरांना गवताचेच छप्पर होते.

जमातनिहाय विश्लेषण केले असता भिल्ल, पावरा आणि कोरकू जमाती वगळता इतर सर्व जमातीतील सुमारे (७५%) पेक्षा जास्त घरांवर मंगलोरी कौले घातली असल्याचे सर्वेक्षणातून आढळून आले. भिल्ल आणि पावरा जमातीच्या घरांवर स्थानिकरित्या बनवण्यात आलेली पारंपारिक कौले सुमारे नव्वद टक्यांपेक्षा अधिक कुटुंबांतून दिसून आली. कोरकू जमातीमध्ये छपरासाठी निरनिराळ्या साधनांचा वापर केला गेला होता. पत्रा (३५%), पारंपारिक कौले (२८%) तसेच (२५%) घरांवर गवताचे छप्परदेखील आढळले.

याचबरोबर कातकरी (२८%), ढोरकोळी (२२%) आणि ठाकर (११%) कुटुंबांनी देखील आपले घर गवतानेच शाकारलेले होते. यावरुन या जमातीमध्ये असलेल्या दारिद्र्याची कल्पना यावी. शासकीय कौले पुरवण्याच्या योजनेचा लाभ या कुटुंबांना प्राधान्याने मिळण्याची गरज आहे.

### ५.४ घराची जमीन

भारतातील कोणत्याही खेड्याप्रमाणे कार्यक्षेत्रातील बहुतांश घरांमधून माती व शेणानेच सारवलेली जमीन असल्याचे दिसून आले. अक्कलकुवा तालुक्यात जवळजवळ सर्वच घरांमधून हे चित्र होते. झरीजामणी तालुक्यात (९०%) घरांमधून जमीन शेणाने सारवलेली (७%) घरातून शहाबादी फरशी तर (३%) घरांमधून कोबा असल्याचे पहायला मिळाले.

जमातनिहाय विश्लेषणात देखील सर्वसामान्यपणे हेच चित्र होते. शहाबादी फरशीचा वापर गोंड (७%), कोकणा (३%), महादेव कोळी आणि ठाकर (प्रत्येकी २%) कुटुंबांमधून करण्यात आला होता. सिमेंटचा कोबा गोंड (३%) कातकरी आणि महादेव कोळी (प्रत्येकी २%) कोकणा आणि ठाकर (प्रत्येकी १%) घरांमधून बसवण्यात आला होता.

### ५.५ घरासाठी वीज

आदिवासी गाव पाड्यात वीज पोहोचली असली तरी प्रत्यक्ष आदिवासींच्या घराघरातून वीज पोहोचल्याचे म्हणता येणार नाही. सर्वेक्षण केलेल्या एकूण २८६०८ घरांपैकी केवळ ४५५८ म्हणजेच (१६%) घरातून विजेचा वापर होत असल्याचे सांगण्यात आले. उर्वरित (८६%) घरांमधून चिमणी, मेणबत्ती, रॉकेलचा दिवा यासारख्या पारंपारिक साधनांचा वापर होत होता. कर्जत तालुक्यात सर्वाधिक म्हणजे (४१%) घरातून वीज वापर होत होता.

### ५.६ घरातील विजेसाठी मीटर

ज्या ४५५८ कुटुंबांमधून विजेचा वापर होत असल्याचे सांगण्यात आले त्यापैकी केवळ २०६८ (४५%) कुटुंबांकडेच मीटरसहित अधिकृत वीजजोड

घेण्यात आला होता. याचाच अर्थ असा की उर्वरित (५५%) कुटुंबांनी एक तर शेजाऱ्याकडून वीज जोड घेतला होता किंवा अनधिकृतपणे वीज वापरत होते.

अकोले तालुक्यात (९०%) घरांमधून वीज मीटर घेण्यात आले होते. त्याखालोखाल एटापल्ली (८३%), धारणी आणि झरीजामणी (७८% प्रत्येकी) जव्हार (७५%) आणि मोखाडा (७०%) तालुक्यांमध्ये अधिकृत वीज जोड घेण्यात आले होते. कर्जत तालुक्यात (१५%) घरांमधून तर धडगाव आणि अक्कलकुवा तालुक्यात अनुक्रमे (११%) आणि (८%) घरांमधूनच मीटर घेण्यात आले होते.

जमातनिहाय मीटरसहित अधिकृत वीज जोडाची आकडेवारी बघितली असता असे दिसते की अधिकृत मीटर घेणाऱ्या कुटुंबांची संख्या माडिया (८४%), गोंड (८०%) महादेव कोळी आणि कोरकू (प्रत्येकी ७८%) कोकणा आणि ढोरकोळी (प्रत्येकी ७४%), कोलाम (६७%) जमातींमध्ये होती. तर याउलट केवळ (१३%) कातकरी आणि पावरा आणि (९%) भिल्ल कुटुंबांनीच मीटरसहित वीज जोड घेतला होता.

### ५.७ स्वयंपाकासाठी जळण

सर्वेक्षण करण्यात आलेल्या बहुतांश कुटुंबामधून (९८-९९%) स्वयंपाकासाठी जळण म्हणून लाकूडफाट्याचाच वापर केला जात होता. केरोसिन, बायोगॅस, स्वयंपाकाचा गॅस यासारख्या इतर खार्चिक इंधनाचा वापर आदिवासी घरातून केलाच जात नाही.

### ५.८ आंघोळीसाठीची सोय

सर्व कार्यक्षेत्रातील मिळून २८६०८ कुटुंबांपैकी, (५१%) कुटुंबांनी आंघोळीसाठी तात्पुरता आडोसा तयार केला होता. (२९%) घरातील स्त्री-पुरुष नदीवरच आंघोळ करत होते तर (१९%) कुटुंबांमधून घरातच आंघोळीसाठी सोय उपलब्ध होती.

अकोले (५४%) आणि मोखाडा (४७%) तालुक्यातील सर्वाधिक घरातून आंघोळीसाठी घरातच सोय केली असल्याचे दिसून आले. कर्जत, धारणी, झरीजामणी आणि एटापल्ली तालुक्यातून बहुतांश घरांमध्ये आंघोळीसाठी घराबाहेर तात्पुरता आडोसा उभा केला असल्याचे दिसून आले. धडगाव आणि अक्कलकुवा तालुक्यांमध्ये यापैकी कोणतीच सोय उपलब्ध नव्हती. या तालुक्यातील स्त्री-पुरुष नदी किंवा विहिरीवरच आंघोळ करत होते. जव्हार तालुक्यामध्येदेखील हेच चित्र पहायला मिळाले.

महादेव कोळी आणि कोकणा या त्यामानाने प्रगत असलेल्या जमातींमध्ये अनुक्रमे (५३%) आणि (४७%) कुटुंबांनी घरातच आंघोळीची सोय केली होती. घराबाहेर आडोसा उभारुन आंघोळीची सोय करणाऱ्या जमातींमध्ये कोरकू (९८%), कोलाम (९६%), गोंड आणि परधान (प्रत्येकी ९३%) या विदर्भातील जमाती तसेच सह्याद्री विभागातील कातकरी (८०%) या जमातीतील कुटुंबांचा समावेश होता. भिल्ल (८२%), पावरा (७७%) आणि ढोर कोळी (७३%) कुटुंबांमधून घराच्या आत वा घराबाहेर आंघोळीसाठी कोणतीच सोय नसल्याचे दिसून आले. या कुटुंबांमधील व्यक्ती नदी अथवा विहिरीवरच आंघोळ करत होते.

### ५.९ शौचालय

स्वच्छता व सार्वजनिक आरोग्याच्या

दृष्टीकोनातून शौचालये अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. १९९० च्या दशकामध्ये संपूर्ण देशभर लाभार्थ्यांना अनुदान देऊन शौचालये बांधण्यात आली. महाराष्ट्रातील आदिवासी भागातून देखील ही योजना राबविण्यात आली होती. आदिवासी भागात शौचालयांबाबत काय परिस्थिती आहे यावर पायाभूत सर्वेक्षणातील आकडेवारीवरुन चांगला प्रकाश पडतो.

आदिवासी भागातून आजही उघड्यावरच शौचाला बसणे ही अत्यंत सामान्य गोष्ट आहे. एकूण सर्वेक्षित २८६०९ कुटुंबांपैकी केवळ १४३७ (५%) घरांमधून शौचालये बांधलेली होती. झरीजामणी आणि एटापल्ली या तालुक्यातून सर्वाधिक म्हणजे (१०%) घरांमधून शौचालये बांधली असल्याचे पहायला मिळाले. अकोले, कर्जत आणि जव्हार तालुक्यातील केवळ (६%) घरांमधूनच शौचालये होती. धारणी (२%) आणि अक्कलकुवा (१%) तालुक्यात फारच थोड्या घरातून शौचालये बांधल्याचे आढळून आले.

जमातवार शौचालयांची संख्या बघता गोंड, परधान आणि कोलाम (प्रत्येकी १०%) घरांमधून, माडिया आणि कोकणा (प्रत्येकी ९%) तर ठाकर आणि महादेव कोळी (प्रत्येकी ६%) जमातींच्या कुटुंबामधून शौचालये बांधण्यात आली होती. कातकरी, ढोर कोळी, वारली, भिल्ल आणि कोरकू जमातीतील फारच थोड्या कुटुंबांनी शौचालये बांधली होती.

## ५.१० शौचालयाचा वापर

ज्या कुटुंबातून शौचालये बांधली होती, त्यांचा वापर विविध कारणांसाठी होत असल्याचे दिसून आले. ज्या १४३७ कुटुंबातून शौचालय बांधले गेले होते त्यापैकी केवळ (२८%) कुटुंबातून शौचासाठी वापर केला जात होता. (२४%) कुटुंबातून शौचालयांचा वापर आंघोळीसाठी तर (१५%) कुटुंबातून सामान साठवण्यासाठी केला जात होता. (३१%) कुटुंबातून शौचालयांचा अजिबातच वापर केला जात नव्हता.

एटापल्ली आणि धडगाव तालुक्यातील सुमारे (५७%) शौचालये अजिबातच वापरली जात नव्हती. शौचालयांचा सर्वाधिक वापर मोखाडा (५०%), जव्हार (४७%) आणि अकोले (३५%) या तालुक्यातून होत होता. झरीजामणी तालुक्यात बांधलेल्या सुमारे (५८%) शौचालयांचा वापर न्हाणीघर म्हणून आंघोळीसाठी केला जात होता. तर धारणी (३५%) आणि एटापल्ली (२९%) तालुक्यातील कुटुंबातून देखील आंघोळीसाठी शौचालयांचा वापर केला जात होता. कर्जत (२६%) आणि मोखाडा (२०%) कुटुंबे शौचालयाचा वापर साठवणुकीसाठी करत होते.

घरासाठी शौचालये बांधली असली तरी (५६%) माडिया (५२%) भिल्ल आणि (२८%) गोंड कुटुंबातून शौचालयाचा कोणत्याच कारणासाठी वापर केला जात नव्हता. शौचासाठी शौचालयाचा वापर करणाऱ्या कुटुंबांची जमातवार आकडेवारी पुढीलप्रमाणे - कोकणा (५३%), महादेव कोळी (३९%), ठाकर (३२%), कातकरी (१४%) आणि माडिया (४%). शौचालयाचा वापर आंघोळीसाठी करणाऱ्या कुटुंबांमध्ये - कोलाम (५७%), गोंड (४८%), कोरकू (३४%) आणि माडिया (३०%) या विदर्भामध्ये रहाणाऱ्या जमातीतील कुटुंबांचा प्रामुख्याने समावेश होता. तर ३६(६३%) कातकरी, (२१%) भिल्ल आणि (१६%) महादेव कोळी

कुटुंबांमधून शौचालयांचा वापर घरातील सामान अथवा लाकूडफाटा साठवण्यासाठी केला जात होता.

## ५.११ स्वयंपाकघरातील सांडपाणी

नऊ तालुक्यातील २८६०८ कुटुंबांपैकी (२०%) कुटुंबांनी आपल्या स्वयंपाकघरातून सांडपाणी येत नसल्याचे सांगितले. (७१%) कुटुंबांनी सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी कोणतीही व्यवस्था केली नव्हती. केवळ (६%) घरातून सांडपाणी शोष खड्ड्यात तर (४%) घरातील सांडपाणी परसबागेसाठी सोडले जात होते.

धडगाव आणि अक्कलकुवा तालुक्यातील सुमारे (४७%) कुटुंबांनी स्वयंपाकघरातून सांडपाणीच निघत नसल्याचे सांगितले. झरीजामणी वगळता इतर सर्व तालुक्यातून सांडपाणी घराबाहेर सोडले जात होते. झरीजामणी तालुक्यात (४१%) कुटुंबांनी स्वयंपाकघरातील सांडपाणी शोष खड्ड्यात सोडले जात असल्याचे सांगितले. एटापल्ली तालुक्यातील (१३%) घरातून सांडपाणी परसबागेत सोडले जात असल्याचे आढळून आले.

सुमारे निम्म्या भिल्ल आणि पावरा कुटुंबांनी आपल्या स्वयंपाकघरातून सांडपाणी निघत नसल्याचे सांगितले. विदर्भातील परधान (४५%), कोलाम (३६%) आणि गोंड (३३%) जमातीमधील कुटुंबातून सांडपाण्याचा निचरा शोष खड्ड्यांमध्ये केला जात होता. तर (१५%) माडिया कुटुंबे सांडपाण्याचा वापर घराच्या परिसरातील परसबागेसाठी करत होते.

## ५.१२ परसबाग

कार्यक्षेत्रातील सुमारे (७५%) कुटुंबे पावसाळ्यामध्ये परसबाग करत होते. केवळ (१%) कुटुंबांनी वर्षभर परसबागेत भाजीपाला लागवड करत असल्याचे सांगितले (२४%) कुटुंबातून अजिबातच परसबाग केली जात नव्हती.

धडगाव, अक्कलकुवा, झरीजामणी आणि एटापल्ली तालुक्यातील बहुतांश (९६-९९%) कुटुंबातून पावसाळ्यात परसबागेमध्ये भाजीपाला लागवड केली जाते. तर जव्हार, मोखाडा आणि अकोले तालुक्यांमधून (६५-७७%) कुटुंबातून पावसाळ्यात परसबाग केली जाते.

कर्जत तालुक्यामध्ये, जिथे भूमिहीनांचे प्रमाण सर्वाधिक आहे, तेथे केवळ (४८%) कुटुंबातच परसबाग केली जाते. धारणी तालुक्यात पावसाळ्यात परसबाग करणाऱ्याचे कुटुंबांचे प्रमाण केवळ (३८%) होते.

जमातवार आकडेवारीतून असे दिसून येते की कोरकू (३८%) वगळता इतर सर्व जमातीच्या कुटुंबातून पावसाळ्यात परसबाग केली जाते-माडिया आणि कोलाम (प्रत्येकी ९७%), परधान (९६%), गोंड (९३%). सातपुड्यातील भिल्ल आणि पावरा जमातीत देखील अनुक्रमे (९८%) आणि (९५%) म्हणजे जवळजवळ सर्व कुटुंबांनी पावसाळ्यात परसबाग करत असल्याचे सांगितले. कातकरी जमातीत मात्र फक्त (४१%) कुटुंबांनीच पावसाळ्यात परसबाग केली होती.

# ६. घरातील साधने

घरात असलेल्या विविध साधनांवरुन देखील एखाद्या भूभागातील लोकसंख्येची अथवा जाती-जमातीची आर्थिक परिस्थिती कशी आहे याची कल्पना येते. दिवसेंदिवस वाढतच चाललेल्या नागर समाजाच्या तुलनेत आदिवासी कुठे आहे याची कल्पना घरातील साधनांच्या उपलब्धतेवरुन आपल्याला येऊ शकते. आदिवासी घरात आढळणाऱ्या साधन उपकरणांची पायाभूत सर्वेक्षणातून आलेली माहिती पुढीलप्रमाणे-

**६.१ सायकल** - अत्यंत कमी देखभाल खर्च असलेले सायकल हे सर्वसामान्यांचे वाहन म्हणून ओळखले जाते. सर्वेक्षित २८६०८ कुटुंबांपैकी ३५५४ (१२%) कुटुंबांमधून सायकली होत्या. एटापल्ली तालुक्यामध्ये सर्वाधिक कुटुंबांकडे (७७%) सायकली असल्याचे दिसून आले तर झरीजामणी तालुक्यात (१८%) कुटुंबांमधून सायकलींचा वापर होत होता. इतर तालुक्यातील भौगोलिक परिस्थिती व भूभाग रचनेमुळे सायकल बाळगणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण केवळ (२-७%) होते.

सायकलीचा वापर करणाऱ्या जमातवार कुटुंबांची संख्या पुढीलप्रमाणे - माडिया (७६%), गोंड (३३%) आणि कोरकू (१८%) अन्य जमातीतील सायकल असणाऱ्या कुटुंबांची संख्या अत्यल्प (२-७%) होती.

**६.२ स्कूटर/मोटारसायकल** - एकूण कुटुंबांपैकी केवळ ३३८ (१.२%) कुटुंबांकडे स्वयंचलित दुचाकी होती. जव्हार तालुक्यात ७२ (२.१%) कुटुंबातून आणि अकोले तालुक्यातील ६० (१.७%) कुटुंबांकडे स्कूटर / मोटारसायकल होती. तर अक्कलकुवा तालुक्यात केवळ ७ कुटुंबांकडे दुचाकी वाहन होते. आदिवासींमध्ये प्रगत असलेल्या महादेव कोळी ९२ (२%) आणि कोकणा ७१ (३%) जमातीतील कुटुंबाकडे सर्वाधिक दुचाक्या होत्या तर इतर जमातींमध्ये हे प्रमाण एक टक्क्यापेक्षा कमी होते.

**६.३ इतर वाहने (तिचाकी/चार चाकी)** - केवळ ८८ (०.३%) कुटुंबांनी आपल्याकडे सायकल वा स्वयंचलित दुचाकी सोडून इतर वाहन असल्याचे सांगितले. यामध्ये जव्हार (१७%) आणि मोखाडा (१५%) तालुक्यातील कुटुंबांची संख्या सर्वाधिक होती. तर जमातींमध्ये इतर प्रकारची वाहने कोकणा आणि भिल्ल (प्रत्येकी १८) आणि महादेव कोळी (१६) कुटुंबातून सर्वात जास्त संख्येने होती.

**६.४ बैलगाडी** - बैलगाडी हे वाहन शेतमाल वाहून नेण्यासाठी, प्रवासासाठी वापरले जाते. सर्वेक्षित २८६०८ आदिवासी कुटुंबांपैकी २८५१ (१०%) कुटुंबांकडे बैलगाडी होती. एटापल्ली ८२० (३९%) आणि धारणी १०५१ (३७%) तालुक्यांमध्ये सर्वाधिक कुटुंबांकडे बैलगाड्या होत्या. तर झरीजामणी तालुक्यात (४६२) घरातून बैलगाडी वापरली जात होती. इतर डोंगराळ भागातील तालुक्यांमधून केवळ (५%) किंवा त्यापेक्षा कमी कुटुंबातून बैलगाडी होती. धडगाव आणि अक्कलकुवा तालुक्यात तर अनुक्रमे ५२ आणि १२ कुटुंबांकडे बैलगाडी असल्याचे दिसले.

विदर्भ विभागातील जमातीतील कुटुंबांकडे सर्वाधिक बैलगाड्या असल्याचे दिसून आले. माडिया

(३८%), कोरकू (३७%), गोंड (२५%) आणि कोलाम (१८%). सातपुडा आणि सह्याद्री विभागातील जमातींमधील कुटुंबातून केवळ (५%) बैलगाड्या असल्याचे सर्वेक्षणात आढळले.

**६.५ रेडिओ** - एकूण २८६०८ कुटुंबांपैकी २२५२ (८%) घरांमधून रेडिओ हेच करमणुकीचे साधन होते. अक्कलकुवा तालुक्यात (११%) तर झरीजामणीमध्ये (१०%) घरातून रेडिओ असल्याचे पहाणीत आढळले. मुंबई महानगराला जवळ असलेल्या कर्जत तालुक्यात (६%) जणांकडे रेडिओ आढळले. घरामध्ये रेडिओ असलेल्या जमातनिहाय कुटुंबांची संख्या पुढीलप्रमाणे - पावरा (१२%), कोलाम (११%) कोकणा (१०%), माडिया, गोंड आणि भिल्ल (प्रत्येकी ९%) आणि कातकरी (५%).

**६.६ टेप रेकॉर्डर** - ७६० कुटुंबातून म्हणजेच फक्त (३%) घरातून टेपरेकॉर्डर होता. कर्जत तालुक्यात सर्वाधिक १८६ (६%) घरातून टेपरेकॉर्डर होते. इतर तालुक्यांमध्ये केवळ (२%) कुटुंबांनी आपल्या घरी टेपरेकॉर्डर असल्याचे सांगितले. जमातनिहाय टेपरेकॉर्डर असलेल्या कुटुंबांची संख्या बघता कातकरी १०४ (५%), कोकणा ९३ (४%) गोंड आणि महादेव कोळी (प्रत्येकी ३%) असा क्रम लावता येईल.

**६.७ दूरचित्रवाणी संच** - कार्यक्षेत्रातील सर्व नऊ तालुक्यातील गावात मिळून १०५३ (४%) कुटुंबांकडे दूरचित्रवाणी संच होते. कर्जत तालुक्यात सर्वात जास्त म्हणजे २९८ (९%) कुटुंबातून तर जव्हार, अकोले आणि धारणी (प्रत्येकी ४%) कुटुंबातून दूरचित्रवाणी संच होते. अक्कलकुवा तालुक्यात केवळ २३ (१%) कुटुंबांच्या घरातच दूरचित्रवाणीसारखे करमणुकीचे साधन होते. दूरचित्रवाणी संच घरामध्ये असणाऱ्या कुटुंबांमध्ये कोकणा १६९ (८%), कातकरी १६१ (८%), परधान (७%) महादेव कोळी २२९ (५%) या जमाती पुढे होत्या.

**६.८ सीडी प्लेअर** - गेल्या काही वर्षात सीडी प्लेअर सारख्या साधनाचा बाजारपेठेत प्रवेश झाला आणि आता हे साधन आदिवासी भागातही पहायला मिळत आहे. सुमारे ५०६ (२%) आदिवासी कुटुंबातून सीडी प्लेअर होते. मुंबईला जवळ असलेल्या कर्जत तालुक्यात १८८ (६%) तर मोखाडा ६८७ (२%) आणि धारणी तालुक्यातील ५९ (२%) कुटुंबांमधून सीडी प्लेअर होता. तर एटापल्ली आणि अक्कलकुवा तालुक्यात अनुक्रमे केवळ १२ आणि ११ घरातूनच सीडी प्लेअर असल्याचे दिसून आले. मुंबई जवळ राहणाऱ्या कातकरी जमातीत सर्वाधिक म्हणजे ११९ (६%) घरातून सीडी प्लेअर होते तर कोकणा ७६ (३%), ठाकर ७४ (३%), कोरकू ५६ (२%) आणि गोंड ३२ (२%) घरातून सीडी प्लेअर असल्याचे सर्वेक्षण पहाणीत आढळून आले.

**६.९ दूरचित्रवाणी संचासाठी केबल जोड** - केवळ २१४ (०.७%) घरातूनच दूरचित्रवाणी संचासाठी केबल जोड घेतलेले होते. मोखाडा तालुक्यात ६५ घरांमधून तर धारणी ३९, जव्हार ३४ आणि अकोले तालुक्यात २९ घरांमध्ये केबल जोड घेण्यात आल्याचे दिसून आले. एटापल्ली ११, धडगाव १० तर अक्कलकुवा तालुक्यात केवळ ५ आदिवासी कुटुंबांकडेच केबल जोड होते. केबल जोड घेणाऱ्या जमातीत कोकणा ५४ (३%) महादेव कोळी ५०

(१%) आणि कोरकू ३५ (१%) कुटुंबे पुढे असल्याचे दिसून आले तर इतर जमातीत २० पेक्षा कमी कुटुंबांनी केबल जोड घेतला होता.

**६.१० फ्रीज** - सर्वेक्षित कुटुंबांपैकी केवळ १०४ आदिवासी घरांमधून फ्रीज सारखे उपकरण वापरण्यात येत होते. त्यापैकी ३८ कुटुंबे जव्हार तर ३६ कुटुंबे मोखाडा तालुक्यातील होती. कर्जत तालुक्यातील केवळ ११ घरात फ्रीज होता तर अन्य तालुक्यात घरामध्ये फ्रीज असणाऱ्या कुटुंबांची संख्या नगण्यच . सर्वात जास्त फ्रीज असणाऱ्या जमाती दोनच - कोकणा ४३ (२%) आणि महादेव कोळी २६ (०.६%).

**६.११ मिक्सर** - फ्रीजप्रमाणेच मिक्सरचा वापरदेखील नगण्यच असल्याचे दिसून आले. केवळ १८६ (०.७%) कुटुंबांकडेच मिक्सर होता. मोखाडा तालुक्यात ६१, जव्हार ३२, कर्जत २२ आणि अकोले २१ कुटुंबांकडेच मिक्सरचा वापर होत होता. महादेव कोळी ६६ (२%) आणि कोकणा ४९ (२%) जमातीतील कुटुंबांकडेच घरात मिक्सर होता.

**६.१२ घरगुती आटा चक्की** - सर्वेक्षित २८६०८ कुटुंबांपैकी १६३ घरांमधून घरगुती आटा चक्की (घरघंटी) होती. धडगाव ४३, मोखाडा ३५, जव्हार २५ तालुक्यांमध्ये सर्वाधिक घरगुती चक्क्या होत्या. जमातनिहाय घरघंटी वापरणाऱ्या कुटुंबांची संख्या पुढीलप्रमाणे - भिल्ल ३४, कोकणा ३०, महादेव कोळी २५, ठाकर आणि पावरा (प्रत्येकी १७) विदर्भात राहणाऱ्या जमातींमध्ये घरगुती आटा चक्कीचा वापर फारसा दिसून आला नाही.

**६.१३ पंखा** - केवळ ६७२ (२%) घरांमधून पंखे असल्याचे आढळून आले. त्यापैकी १८७ (६%) कुटुंबे कर्जत तालुक्यातील होती. जव्हार तालुक्यात ११९ (४%) मोखाडा (१०५), धारणी (९६) आणि झरीजामणी तालुक्यात ६६ घरांमधून पंखा होता. पंखा असणाऱ्या जमातनिहाय कुटुंबांची संख्या पुढीलप्रमाणे - कोकणा १३६ (६%), ठाकर १०१ (४%) महादेव कोळी १०१ (२%) कोरकू ८९ (३%) आणि गोंड ५१ (३%) इतर जमातीतील घरांमधून पंख्याचा वापर अतिशय नगण्य होता.

# ७. शासकीय योजनांचा लाभ

## (अ) शासकीय योजनांमध्ये काम

**७.१ कामाचे स्वरुप** - शासनाच्या विविध विभागांकडून निरनिराळ्या प्रकारचे काम हाती घेण्यात आले होते. प्रत्येक तालुक्यामध्ये या कामाचे स्वरुप वेगळे होते. त्यामध्ये शेतकी खात्यातर्फे खाचरांचे काम, पाणलोट क्षेत्र विकास, रस्त्याचे काम, वनखात्याची कामे, रोजगार हमी योजनेची काम वगैरे कामांचा समावेश होता. या कामातून आदिवासी कुटुंबातून रोख तसेच धान्य स्वरुपात मजुरी मिळण्यास मदत झाली.

एकूण कुटुंबांपैकी १०५०२ कुटुंबांमधून सांगण्यात आले की घरामदून एक वा अधिक सदस्याला गेल्या तीन वर्षात शासनाच्या कोणत्या ना कोणत्या तरी योजनेच्या कामाचा फायदा मिळाला. निव्वळ संख्यात्मक आकडेवारीनुसार शासकीय

कामांवर मजूर म्हणून काम करण्यांमध्ये मोखाडा (२७५१), जव्हार (२४५०), अकोले (१५८६) आणि धडगाव (११५७) तालुक्यातील कुटुंबांचा समावेश होता. विदर्भातील तालुक्यांमधून आदिवासी कुटुंबांना फारसा लाभ मिळाला असल्याचे दिसून आले नाही. एटापल्ली (८६८), धारणी (५७४) आणि झरीजामणी तालुक्यातील (२३५) कुटुंबांनी शासकीय योजनेतून काम मिळाल्याचे सांगितले.

जमातनिहाय विश्लेषणातून असे दिसून आले की शासकीय योजनेत मजुरी मिळालेल्यांमध्ये सर्वाधिक महादेव कोळी (२१२७) जमातीतील कुटुंबे होती. त्याखालोखाल भिल्ल (१६४७), कोकणा १४४०) आणि ठाकर (१३८५) कुटुंबांचा समावेश होता. तीन अतिमागास जमातींपैकी माडिया (५६५) कातकरी (२७३) आणि कोलाम (१४६) कुटुंबांनी आपल्याला काम मिळाल्याचे सांगितले.

**७.२ शासकीय कामावर काम करणाऱ्या कुटुंबातील सदस्यांची संख्या** - शासकीय योजनेमध्ये एकाच कुटुंबातून एक ते चार सदस्यांनी काम केल्याचे दिसून आले. शासकीय योजनांमधून काम मिळाल्याचे सांगणाऱ्या कुटुंबांपैकी (३८%) कुटुंबातील एका सदस्याने तर सुमारे (४५%) कुटुंबातील दोन सदस्यांनी काम केल्याचे पहायला मिळाले. (१४%) कुटुंबांमधून दोनपेक्षा अधिक सदस्यांनी काम केले.

कर्जत तालुक्यामध्ये (७५%) कुटुंबांमधून एकाच सदस्याला काम मिळाल्याचे सांगण्यात आले. तर कुटुंबांमध्ये एका सदस्याला काम मिळाल्याचे प्रमाण जव्हार (५२%), अक्कलकुवा आणि धारणी (५०% प्रत्येकी) तालुक्यातील एवढे होते. कुटुंबातील दोन सदस्यांना काम मिळण्याचे सर्वाधिक प्रमाण मोखाडा (६२%) आणि अकोले (५३%) या तालुक्यांमध्ये दिसून आले.

जमातनिहाय वर्गीकरणानुसार कोरकू आणि ठाकर जमातीतील अनुक्रमे (४९%) आणि (४७%) कुटुंबातून एका व्यक्तीला काम मिळू शकले तर वारली (५७%), महादेव कोळी (५४%), कातकरी (५१%) कुटुंबांमधून दोन व्यक्तींना शासकीय योजनेत काम मिळू शकले.

**७.३ कामाचे स्वरुप** - शासकीय योजनांमधील कामाचे स्वरुप तालुक्या-तालुक्यानुसार वेगळे होते. कर्जत तालुक्यामध्ये (३३%) लोकांनी रस्त्याचे काम तर (२४%) जणांनी पाणलोट क्षेत्र विकासाच्या कामात मजुरी केली. मोखाडा (८२%) आणि जव्हार (६३%) या दोन तालुक्यांमध्ये सर्वाधिक लोकांनी शेतकी खात्याच्या जमीन सपाटीकरण करुन खाचरे तयार करण्याच्या कामावर मजूर म्हणून काम केले. अकोले तालुक्यात (५०%) व्यक्तींनी पाणलोट क्षेत्र विकास तर (२९%) लोकांनी खाचरांच्या कामावर काम करुन मजुरी मिळवली. धडगाव (५८%), अक्कलकुवा (६८%) आणि धारणी (५७%) तालुक्यांमधून रस्ते तयार करण्याच्या कामातून सर्वाधिक लोकांना मजुरी मिळाली तर झरीजामणी तालुक्यात हेच प्रमाण (३०%) होते. एटापल्ली तालुक्यात निरनिराळ्या कामातून - खाचरे तयार करणे (३३%), पाणलोट क्षेत्र विकास (२६%), रस्त्याची कामे (१८%) यामधून लोकांना मजुरी मिळाली.

जमातनिहाय विश्लेषणातून देखील हेच चित्र दिसते. त्या त्या भागातील भौगोलिक परिस्थितीनुसार लोकांना काम मिळाले. उदाहरणार्थ सह्याद्री विभागात

प्रामुख्याने भात पिकतो. तेथील शेतकी खात्यामार्फत जमीन सपाटीकरण करुन खाचरे तयार करण्याची कामे मोठ्या प्रमाणावर केली गेली. त्यामुळेच वारली जमातीतील (७८%) लोकांनी तर कोकणा (७२%), कातकरी (६७%), ठाकर आणि ढोर कोळी (प्रत्येकी ६४%) लोकांनी खाचरांच्या कामावर मजुरी केली. महादेव कोळी जमातीतील (४२%) लोकांनी खाचरांचे तर (३८%) लोकांनी पाणलोट क्षेत्र विकासाच्या कामावर मजुरी केली. सातपुड्यातील भिल्ल आणि पावरा जमातीतील अनुक्रमे (६३%) आणि (५७%) लोकांनी तर मेळघाटातील कोरकू (५७%) लोकांनी रस्त्याच्या कामावर मजुरी केली. कोलाम, गोंड, परधान आणि माडिया या विदर्भातील जमातीतील लोकांनी निरनिराळ्या प्रकारच्या योजनांमधून काम केले.

**७.४ कामाचा कालावधी** - शासकीय योजनांचा कालावधी ३ दिवसांपासून ते १ महिन्यापर्यंत भिन्न असल्याचे दिसून आले. सुमारे (४३%) कुटुंबांमधून १-७ दिवसांपर्यंत मजुरी केल्याचे सांगण्यात आले तर ८-१५ दिवसांपर्यंत काम करणाऱ्यांची संख्या (४५%) होती. केवळ (८%) कुटुंबातून १५-३० दिवस काम मिळाल्याचे सांगण्यात आले.

बहुतांश तालुक्यांमधून एटापल्ली (६७%), धडगाव (६६%), अक्कलकुवा (६५%) आणि कर्जत (५५%) लोकांनी १ ते ७ दिवसांपर्यंत शासकीय योजनेतून काम मिळाल्याचे सांगितले. अकोले (६९%) आणि धारणी (५०%) तालुक्यामध्ये निम्म्यापेक्षा जास्त लोकांना ८ - १५ दिवसापर्यंत काम मिळाले.

जमातवार विश्लेषणातून भिल्ल आणि माडिया (प्रत्येकी ६६%) पावरा (६०%) जमातीमधील लोकांना एक आठवड्यापर्यंतच काम मिळाल्याचे पहायला मिळाले. कोलाम (६९%) आणि महादेव कोळी (६३%) जमातीतील सर्वाधिक लोकांना ८-१५ दिवसांसाठी शासकीय योजनांतून मजुरीचे काम मिळाले.

**७.५ धान्यस्वरुपात मजुरी** - एकूण १०५०२ कुटुंबांनी शासकीय योजनेत काम केले त्यापैकी ७०४० (६७%) कुटुंबांनी धान्य स्वरुपात मजुरी मिळाली नसल्याचे सांगितले तर (१८%) कुटुंबांनी ५० किलोपर्यंत आणि (९%) कुटुंबानी ५० ते १०० किलो दरम्यान गहू व तांदूळ यासरखे धान्य मजुरी म्हणून मिळाल्याचे सांगितले.

धारणी तालुक्यातील (५२%) तर झरीजामणी (५१%) अकोले (४७%) आणि कर्जत तालुक्यातील (४३%) कुटुंबांना ५० किलोपर्यंत धान्य मजुरी म्हणून मिळाले. अकोले तालुक्यातील शासकीय योजनेत काम केलेल्या ४४७ (२८%) कुटुंबांना ५० ते १०० किलोदरम्यान धान्यरुपी मजुरी मिळाली.

शासकीय योजनेमध्ये काम केलेल्या १०५०२ कुटुंबांपैकी ३४६२ कुटुंबांना धान्यरुपी मजुरी मिळाली. धान्य मजुरीची सरासरी काढली असता या प्रत्येक कुटुंबाला मजुरी म्हणून सरासरी १२१ किलो धान्य मिळाले. एटापल्ली आणि झरीजामणी तालुक्यामध्ये सरासरी १५१ किलो धान्य रुपाने मजुरी मिळाली तर जव्हार तालुक्यात हेच प्रमाण १४७ किलो एवढे होते. अकोले आणि धारणी तालुक्यात धान्य रुपाने सर्वात कमी मजुरी म्हणजे अनुक्रमे ९० आणि ५७ किलो धान्य मिळाले.

जमातनिहाय विश्लेषणातून असे दिसून आले की विदर्भातील कोरकू (५२%), कोलाम (४९%), गोंड (३९%) या जमातीतील कुटुंबांना तसेच महादेव

कोळी जमातीतील (३६%) कुटुंबांना ५० किलोपर्यंत धान्य मजुरी रुपाने मिळाले. ५० ते १०० किलो दरम्यान धान्य मजुरी म्हणून मिळालेल्या कुटुंबांमध्ये कोलाम (२५%) आणि महादेव कोळी (२०%) या जमातीतील कुटुंबांचा समावेश होता.

धान्यरुपाने सर्वाधिक सरासरी मजुरी मिळवणाऱ्या कुटुंबांमध्ये कोलाम (१९८ किलो), वारली (१८१ किलो), ढोर कोळी १६३ किलो), माडिया (१५५ किलो) आणि ठाकर (१३६ किलो) या जमातीतील कुटुंबांचा समावेश होता. तर सर्वात कमी धान्यरूपी मजुरी मिळालेल्या जमातीत पावरा आणि कातकरी कुटुंबांचा समावेश होता. सरासरी धान्य अनुक्रमे (८३ किलो) आणि (४६ किलो).

**७.६ रोख स्वरुपात मजुरी** - शासकीय योजनेत काम केलेल्या कुटुंबांपैकी सुमारे (४२%) कुटुंबांना १०० ते ५००/- रुपयांपर्यंत, (२६%) कुटुंबांना ५०० ते १०००/- रुपयांपर्यंत मजुरी मिळाली. १००० ते २०००/- रुपयांपर्यंत मजुरी मिळवणारी (१५%) कुटुंबे होती.

अकोले तालुक्यातील (७०%) तर कर्जत (५४%), अक्कलकुवा (४९%) आणि धारणी तालुक्यातील (४८%) कुटुंबांना १०० ते ५०० रुपयांदरम्यान रोख मजुरी मिळाली. मोखाडा तालुक्यातील (३६%) तर जव्हारमधील (३०%) कुटुंबांनी शासकीय कामातून ५०० ते १०००/- रुपयांपर्यंत मजुरी मिळाली.

शासकीय योजनातील कामांवर मजूर म्हणून काम करुन प्रत्येक कुटुंबाला सरासरी ८५५/- रुपये मजुरी म्हणून मिळाले. मजुरीची तालुकानिहाय सरासरी बघितली असता झरीजामणी तालुक्यातील कुटुंबांना सर्वाधिक म्हणजे सरासरी १२१३/- रुपये मजुरी म्हणून मिळाले. त्याखालोखाल मोखाडा तालुक्यातील कुटुंबांना सरासरी ११९१/- रुपये मिळाले. शासकीय कामातून सर्वात कमी सरासरी उत्पन्न एटापल्ली आणि कर्जत तालुक्यातील कुटुंबांना मिळाल्याचे दिसून आले. या तालुक्यातून अनुक्रमे ६७५/- रुपये आणि ६६३/- रुपये सरासरी मजुरी मिळाली.

जमातवार विश्लेषणातून असे दिसते की १०० ते ५०० रुपयांपर्यंत मजुरी मिळणाऱ्या कुटुंबांमध्ये महादेव कोळी (५८%), कोरकू (४९%), माडिया (४५%), भिल्ल आणि पावरा (४१ प्रत्येकी), ठाकर (४०%) जमातीतील कुटुंबांचा समावेश होता. तर कोकणा, वारली, ढोर कोळी (प्रत्येकी ३५%), कातकरी (३३%) कुटुंबांना ५०० ते १०००/- रुपये उत्पन्न शासकीय कामाच्या मजुरीतून मिळाले. १००० ते २०००/- रुपयांपर्यंत उत्पन्न प्राप्त झालेल्या कुटुंबांमध्ये कोलाम समाजातील (३२%), कातकरी (२५%), वारली (२२%), ढोर कोळी (२१%) आणि ठाकर जमातीतील (२०%) कुटुंबांचा समावेश होता.

शासकीय योजनेतील कामातून सर्वाधिक सरासरी उत्पन्न मिळवणाऱ्या जमातींमध्ये कातकरी (१३१९/- रुपये), कोलाम (१२८१/- रुपये), वारली (११२६/- रुपये) आणि कोकणा (१०५३/- रुपये) जमातींचा समावेश होता. तर भिल्ल (७०७/- रुपये) माडिया (६८५ रुपये) महादेव कोळी (५८०/- रुपये) या जमातीतील कुटुंबांना सर्वात कमी सरासरी उत्पन्न शासकीय योजनांतील कामातून मजुरीरुपाने मिळाले.

# (ब) शासकीय योजनांचा गेल्या तीन वर्षातील लाभ

**७.७ शासकीय योजनांचा लाभ** - गेल्या तीन वर्षात आपल्या कुटुंबाला अथवा कुटुंबातील कोणा सदस्याला शासनाच्या योजनेचा (अथवा योजनांचा) लाभ झाला होता का ? असा प्रश्न सर्वेक्षणातून विचारण्यात आला होता. एकूण २८६०८ कुटुंबांपैकी (६१%) कुटुंबांनी आपल्याला गेल्या तीन वर्षात किमान एक तरी शासकीय योजनेचा लाभ मिळाला असे सांगितले. झरीजामणी आणि धारणी तालुक्यातील सर्वाधिक म्हणजे प्रत्येकी (७७%) कुटुंबांनी योजनांचा लाभ झाल्याचे सांगितले. तर अक्कलकुवा आणि अकोले तालुक्यात हेच प्रमाण अनुक्रमे (४५%) आणि (३२%) एवढे होते.

खावटी कर्ज ही योजना सर्वाधिक आदिवासी कुटुंबांपर्यंत पोहोचल्याचे दिसून आले. तीन वर्षाच्या कालावधीत सुमारे (३४%) आदिवासी कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळाला होता तर अंत्योदय योजनेच्या शिधापत्रिकेचा लाभ सुमारे (२९%) कुटुंबांना झाल्याचे दिसून आले.

तीन वर्षामध्ये किमान एका तरी शासकीय योजनेचा लाभ मिळालेल्या कुटुंबांची जमातनिहाय टक्केवारी पुढील प्रमाणे - कोलाम (८६%), कोरकू (७७%), कातकरी (७६%), वारली (७३%), ठाकर (७०%), भिल्ल (४८%) आणि महादेव कोळी (४१%)

**७.८ घरकुल योजना** - शासनाच्या इंदिरा आवास योजना अर्थात घरकुल योजनेचा फायदा २८६०८ कुटुंबापैकी २९२४ (१०%) कुटुंबांना ३ वर्षात मिळाल्याचे सर्वेक्षण पाहणीतून आढळले. जव्हार तालुक्यातील सर्वाधिक म्हणजे ६१२ (१८%) कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळाला. तर त्याखालोखाल एटापल्ली तालुक्यात ३६४ (१७%) घरकुले बांधली गेली. धडगाव तालुक्यात केवळ २७० (६%) कुटुंबांनाच या योजनेतून फायदा मिळाला तर अकोले तालुक्यात फक्त १०८ (३%) घरे या योजनेतून बांधण्यात आल्याचे दिसून आले.

घरकुल योजनेचा सर्वाधिक लाभ कातकरी जमातीतील ४२ (२०%) कुटुंबांना मिळाला. त्याखालोखाल माडिया २८५ (१८%), वारली २६८ (१६%), ढोर कोळी १२७ (१६%) आणि कोलाम १८२ (१३%) जमातीतील कुटुंबांना घरकुल योजनेतून घरे बांधून मिळाली तर महादेव कोळी जमातीतील २२१ (५%) कुटुंबानीच या योजनेचा फायदा मिळाल्याचे सांगितले.

**७.९ जनश्री विमा योजना** - शासनाने कातकरी, कोलाम, माडिया या तीन अतिमागास जमातीतील कुटुंबांना संरक्षण मिळावे म्हणून जनश्री विमा योजना सुरु केली. मात्र संपूर्ण कार्यक्षेत्रातील केवळ ५८ कुटुंबांनाच या योजनेअंतर्गत लाभ मिळाल्याचे दिसून आले. यामध्ये कर्जत तालुक्यातील २१ कातकरी कुटुंबांचा समावेश होता.

**७.१० धान्यकोष योजना** - आदिवासी भागामध्ये अन्न सुरक्षिततेचा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. अन्नसुरक्षितेअभावी कुपोषण व बालमृत्यूच्या मोठ्या प्रमाणावर घटना घडक असतात. आदिवासी कुटुंबांच्या अन्नसुरक्षिततेचा प्रश्न सोडवण्यासाठी आदिवासी विकास विभागाने धान्यकोष योजना सुरु

केली. धान्यकोष योजनेचा लाभ कार्यक्षेत्रातील केवळ १८५ कुटुंबांनाच मिळाला. या कुटुंबांपैकी बहुतांश कुटुंबे विदर्भातीलच होती. धारणी ५८ (२%) एटापल्ली ४१ (२%) आणि झरीजामणी १६ (१%). अकोले आणि कर्जत तालुक्यात फक्त १७ आणि १६ कुटुंबांनीच धान्यकोष योजनेचा फायदा मिळाल्याचे सांगितले. ठाणे आणि नंदुरबार जिल्ह्यात या योजनेचे अस्तित्व नगण्यच होते.

विदर्भातील कोरकू ५४ (२%), कोलाम ३३ (२%), माडिया २९ (२%) आणि गोंड १८ (१%) या जमातीतील कुटुंबांना धान्यकोष योजनेचा मुख्यत्वे फायदा झाला तर महादेव कोळी जमातीतील १९ कुटुंबे या योजनेचे लाभार्थी होते. इतर जमातींपर्यंत या योजनेचा लाभ पोहाचलाच नव्हता.

**७.११ मातृत्व अनुदान योजना** - आदिवासी गरोदर मातेला गरोदरपणात तसेच बाळंतपणानंतर काळजी घेता यावी या हेतूने मामृत्व अनुदान योजना सुरु करण्यात आली. या योजनेअतंर्गत पहिल्या दोन बाळंतपणापर्यंत एकूण आठशे रुपयांचे अनुदान दिले जाते त्यापैकी चारशे रुपयांची औषधे तर चारशे रुपये रोख देण्यात येतात. गरोदरपणाच्या चौथ्या, सातव्या आणि नवव्या महिन्यात आणि बाळंतपणानंतर असे एकूण चार हप्त्यांमध्ये मातृत्व अनुदान दिले जाते. कार्यक्षेत्रातील एकूण २८६०८ कुटुंबांपैकी २५९२ (९%) कुटुंबांनी गेल्या तीन वर्षांमध्ये आपल्या घरातील महिलेला मातृत्व अनुदान योजना या आरोग्य खात्याच्या योजनेचा लाभ मिळाल्याचे सांगितले. या अनुदान योजनेचा सर्वाधिक फायदा मोखाडा ६९१ (१८%), धारणी ४८९ (१७%) आणि जव्हार तालुक्यातील ५६७ (१७%) कुटुंबातील मातांना झाला. तर धडगाव १०० (२%), कर्जत ४८ (१.४%) आणि झरीजामणी तालुक्यातील केवळ २५ (१%) मातांनाच या अनुदानाचे फायदे मिळू शकले.

जमातनिहाय आकडेवारी बघता मातृत्व अनुदान योजनेचा सर्वात जास्त लाभ ढोर कोळी जमातीमधील १५१ (१९%), वारली ३१२ (१८%), कोरकू, ४७४ (१७%) आणि कोकणा जमातीतील ३६१ (१६%) कुटुंबामधील मातांना झाला. कातकरी ८४ (४%), पावरा २९ (४%), कोलाम १५ (१%) या जमातीतील महिलांना म्हणावा तेवढा फायदा या योजनेतून मिळू शकला नाही.

**७.१२ डिझेल इंजिन** - कार्यक्षेत्रातील केवळ ३७० (१.३%) आदिवासी शेतकरी कुटुंबांना आदिवासी विकास विभागामार्फत देण्यात येणाऱ्या डिझेल इंजिनाचा लाभ झाला. एटापल्ली तालुक्यात या योजनेचे सर्वाधिक १६८ (८%) लाभार्थी होते तर अक्कलकुवा तालुक्यात ४० (१.६%) कुटुंबांना या योजनेत डिझेल इंजिन मिळाले. इतर तालुक्यातील लाभार्थ्यांची संख्या १६-२५ दरम्यान होती.

सर्वेक्षणपूर्व तीन वर्षाच्या काळात डिझेल इंजिन मिळालेल्या कुटुंबांची जमातनिहाय संख्या पुढीलप्रमाणे - माडिया १३७ (९%), भिल्ल ५३ (१%), महादेव कोळी ४१ (१%) आणि कोकणा ३२ (२%). इतर जमातीतील केवळ २ ते २४ कुटुंबांना डिझेल इंजिन शासकीय योजनेतून पुरवण्यात आले होते.

**७.१३ विहिर** - शासनाच्या विहिर बांधण्याच्या योजनेतून केवळ ४०३ (१.४%) कुटुंबांना तीन

वर्षामध्ये लाभ मिळू शकला. या योजनेचा सर्वाधिक फायदा विदर्भातील एटापल्ली १०९ (५%) आणि धारणी १०२ (४%) तालुक्यातील कुटुंबांना मिळाला तर झरीजामणी तालुक्यात केवळ २० (०.७%) कुटुंबांना शेतीच्या सिंचनासाठी शासकीय योजनेतून विहिर खोदून मिळाली. मोखाडा आणि धडगाव तालुक्यात केवळ (१%) कुटुंबांना या योजनेचा फायदा मिळाल्याचे सर्वेक्षणातून दिसून आले.

जमातींमध्ये विहिर बांधण्याच्या योजनेचा सर्वाधिक फायदा माडिया ९१ (६%) आणि कोरकू ९९ (४%) जमातीतील कुटुंबांना मिळाला. इतर जमातींमध्ये हेच प्रमाण कोकणा ३८ (२%), भिल्ल ६२ (१%), महादेव कोळी ४३ (१%) एवढे होते.

**७.१४ शेततळे** - सर्व कार्यक्षेत्रात मिळून केवळ ९३ (०.३%) आदिवासी शेतकऱ्यांना शासकीय योजनेतून शेततळे खोदून मिळाले त्यामध्ये एटापल्ली तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक ४९ (२.३%) होते. जमातनिहाय आकडेवारी बघता माडिया शेतकऱ्यांना ४४ (१.३%) या योजनेतून सर्वाधिक फायदा झाला.

**७.१५ फळबाग योजना** - सर्वेक्षण करण्यात आलेल्या एकूण २८६०८ कुटुंबांपैकी ७१२ (३%) कुटुंबांनी आपल्याला शेतकी खात्याच्या फळबाग योजनेचा मिळाला असल्याचे सांगितले. या योजनेचे प्रामुख्याने ठाणे जिल्ह्यातील जव्हार आणि मोखाडा तालुक्यातच लाभार्थी होते. या दोन तालुक्यांमध्ये अनुक्रमे २५६ (८%) आणि २५४ (६%) शेतकरी कुटुंबांना फळबाग योजनेअंतर्गत आंबा, काजू यासारखी फळझाडे मिळाली तर अकोले तालुक्यात केवळ ८६ (३%) कुटुंबांनाच योजनेतून फायदा झाला. विदर्भातील तालुक्यांमधून या योजनेचे अस्तित्व दिसून आले नाही.

जमातनिहाय फळबाग लागवड योजनेतून लाभ मिळालेल्या कुटुंबांची संख्या पुढीलप्रमाणे - कोकणा १९३ (९%), ठाकर १५८ (६%), महादेव कोळी १३९ (३%), वारली ७६ (४%) आणि ढोर कोळी ४३ (५%)

**७.१६ जमीन विकास (खाचर) योजना** - शेतकी खात्याच्या जमीन विकास (खाचरे तयार करण्याच्या) योजनेचा ४५९ (१.६%) कुटुंबांना लाभ मिळाला. या योजनेचा लाभ भाताचे उत्पादन करणाऱ्या जव्हार १७४ (५%), मोखाडा १८२ (५%) आणि एटापल्ली तालुक्यातील ७२ (३%) शेतकरी कुटुंबांना झाला.

जमातनिहाय आकडेवारीनुसार या योजनेचा फायदा झालेल्यांमध्ये कोकणा १४८ (७%), ठाकर ८७ (३%), वारली ५३ (३%), ढोर कोळी ३५ (४%), महादेव कोळी ४८ (१%) तसेच माडिया ५९ (४%) कुटुंबांचा समावेश होता. विदर्भ आणि सातपुड्यामध्ये शेतकी खात्यातर्फे जमीन विकासाचा कार्यक्रम घेतल्याचे दिसून आले नाही.

**७.१७ शेळी पालन** - तीन वर्षाच्या कालावधीमध्ये शेळीपालन योजनेचा केवळ ११५ आदिवासी कुटुंबांना लाभ झाला. यामध्ये धडगाव तालुक्यातील ३४, धारणी २८ आणि कर्जत तालुक्यातील २० कुटुंबांचा समावेश होता. इतर तालुक्यातून १० पेक्षा कमी कुटुंबांना लाभ मिळाल्याचे सर्वेक्षणातून दिसून आले.

जमातवार लाभार्थी कुटुंबांमध्ये भिल्ल ३१, कोरकू २८, ठाकर १२ आणि पावरा जमातीतील ११

कुटुंबांचा समावेश होता. तीन अप्रगत जमातींपैकी कातकरी जमातीतील ९ आणि माडिया जमातीतील केवळ ७ कुटुंबांना शासनाच्या शेळीपालन योजनेचा लाभ मिळाला तर कोलाम जमातीमध्ये या योजनेचा एकही लाभार्थी असल्याचे सर्वेक्षणातून दिसून आले नाही.

**७.१८ दुभती जनावरे** - कार्यक्षेत्रातील एकूण कुटुंबांपैकी फक्त ७० कुटुंबांना दुभती जनावरे मिळाली त्यामध्ये धडगाव तालुक्यातील २८, अक्कलकुवा आणि अकोले तालुक्यातील अनुक्रमे १७ आणि १४ कुटुंबे होती. भिल्ल जमातीत ३८ तर महादेव कोळी जमातीतील १४ कुटुंबांना शासकीय योजनेतून दुभती जनावरे मिळाली.

**७.१९ व्यवसाय प्रशिक्षण** - कार्यक्षेत्रातील गावांमधून केवळ २६ कुटुंबांनी आपल्या घरातील सदस्याला व्यवसाय प्रशिक्षण मिळाले असल्याचे सांगितले. यामध्ये धडगाव तालुक्यातील ८, एटापल्ली ६, मोखाडा ५, जव्हार ४, अकोले २ आणि धारणी तालुक्यातील एका कुटुंबाचा समावेश होता.

पावरा जमातीतील ५, महादेव कोळी, कोकण, माडिया जमातीतील प्रत्येकी ४ व्यक्तींना व्यवसाय प्रशिक्षण मिळाले तर कातकरी आणि कोलाम समाजातील एकाही कुटुंबातून व्यवसाय प्रशिक्षण मिळाल्याचे दिसून आले नाही.

**७.२० किरकोळ व्यवसायासाठी कर्ज** - किरकोळ व्यवसायासाठी कर्ज मिळाल्याचे फक्त १९ कुटुंबातून सांगण्यात आले. प्रत्येक तालुक्यात लाभार्थींची संख्या एक ते पाचच्या दरम्यान होती. कातकरी आणि कोलाम समाजातील एकाही व्यक्तीला कर्ज मिळाल्याचे दिसून आले नाही.

## निवेदन

**(फॉर्म ४, नियम ८ नुसार)**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : | ६४, आनंद पार्क, पुणे ४११ ००७. |
| २. | प्रकाशन काळ | : | त्रैमासिक |
| ३. | मुद्रक, प्रकाशक, संपादक | : | रामचंद्र केशव मुटाटकर |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | ६४, आनंद पार्क, पुणे ४११ ००७. |
| ४. | स्वामीत्व | : | महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद |

मी. रा. के. मुटाटकर जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीनुसार खरा आहे.

रा. के. मुटाटकर
प्रकाशक

३१ जानेवारी २००७

# ८.विश्लेषण

दऱ्याखोऱ्यातून, रानावनातून, पर्वतराजीतून रहाणारा आदिवासी समाज हा इतर समाजांपेक्षा वेगळा असून त्याची काही वैशिष्ट्ये अजूनही टिकून आहेत. महाराष्ट्रातील एकूण ४७ आदिवासी जमातींचा अनुसूचित जमातींच्या यादीत समावेश आहे. मात्र त्यापैकी केवळ १४ ते १५ जमातीच बहुसंख्येने आढळतात. इतर जमातींची लोकसंख्या एक हजारापेक्षाही कमी आहे. बहुसंख्येने आढळणाऱ्या आदिवासी जमातीदेखील विशिष्ट भूभागात वसलेल्या असून त्यांच्यामध्येदेखील आर्थिक, सामाजिक भिन्नता दिसून येते. महादेव कोळी, कोकणा, गोंड या जमाती इतर आदिवासी जमातींपेक्षा प्रगत असल्याचे दिसते तर कातकरी, कोलाम यासारख्या जमाती अत्यंत मागास असल्याचे दिसून येते. आदिवासी उत्थान कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या सर्वेक्षणातून देखील हीच बाब प्रकर्षाने पुढे येते.

आदिवासींमध्ये विभक्त कुटुंब पध्दती प्रचलित आहे. सर्वेक्षित लोकसंख्येत सर्वसाधारणपणे आदिवासी कुटुंबाचा आकार सरासरी ५ व्यक्ती एवढा होता. मात्र सातपुड्यामध्ये राहणाऱ्या भिल्ल व पावरा जमातींमध्ये एका कुटुंबामध्ये सरासरी ६ व्यक्ती होत्या. या भागामध्ये दळणवळणाच्या फारशा सोयी उपलब्ध नाहीत तसेच आरोग्य सुविधांचा प्रसार अत्यंत मर्यादित आहे. यामुळेच कुपोषण व बालमृत्यूंचे प्रमाण देखील जास्त आहे. मूल जगले का नाही याची खात्री नसल्याने कुटुंब नियोजन केले जात नाही आणि केलेच तर चार-पाच मुलांनंतर. या सर्व कारणांमुळेच या दोन जमातींमध्ये कुटुंबाचा आकार सर्वाधिक असल्याचे दिसून येते. याउलट कातकरी आणि कोलाम या अति मागास जमातींमध्ये कुटुंबाचा आकार केवळ चार एवढाच होता. या दोन जमातींमध्ये निम्म्यापेक्षा जास्त कुटुंबे भूमीहीन आहेत. बहुतांश कुटुंबांना मोलमजुरी करुनच जगावे लागते. लहान मुलांमध्ये कुपोषण, आजार व बालमृत्युंचे प्रमाणही मोठे आहे. या सर्व कारणांचा परिपाक म्हणूनच या दोन जमातींमध्ये कुटुंबाचा आकार लहान असावा. मात्र नक्की कारणे शोधून काढण्यासाठी कातकरी आणि कोलाम जमातींचा लोकसंख्याशास्त्राच्या दृष्टीकोनातून अधिक अभ्यास होणे गरजेचे आहे.

वर्ष २००१ च्या जनगणनेनुसार भारतामध्ये दर हजार पुरुषांमागे ९३३ स्त्रिया तर महाराष्ट्रात हेच प्रमाण त्यापेक्षा कमी म्हणजे ९२२ स्त्रिया एवढे आहे. सर्वेक्षित आदिवासी लोकसंख्येमध्ये दर हजार पुरुषांमागे ९५७ स्त्रिया असल्याचे दिसून आले. अनुसूचित जमातीसाठीच्या राष्ट्रीय व राज्यस्तरीय आकडेवारीपेक्षा हे प्रमाण थोडेसे कमीच आहे. राष्ट्रीय व राज्य पातळीवर दर हजार पुरुषांमागे अनुक्रमे ९७७ व ९७३ स्त्रिया असल्याचे २००१ च्या जनगणनेची आकडेवारी सांगते.

अन्य समाजाच्या तुलनेत आदिवासी समाजामध्ये स्त्रीला मानाचे स्थान असते, स्त्री भ्रुण हत्या केली जात नाही, मुलीच्या जन्माचे स्वागतच केले जाते. आदिवासी स्त्री स्वत:च्या विवाहाचा, घटस्फोटाचा, पुनर्विवाहाचा निर्णय स्वत:च घेऊ

शकते. आदिवासी समाजात विधवांचे विवाह देखील सर्वमान्य असतात. आदिवासी स्त्री अर्थार्जनात देखील सहभागी होते. एकंदरितच आदिवासी समाजामध्ये स्त्रीचे स्थान पुरुषाच्या बरोबरीनेच असते आणि म्हणून बहुतांश आदिवासी जमातींमधून स्त्री-पुरुषांचे प्रमाण जवळजवळ बरोबरीनेच असल्याचे दिसून येते. सर्वेक्षणातून या सर्वसाधारणपणे दिसणाऱ्या चित्राला अपवाद फक्त धारणी तालुक्यातील कोरकू जमातीचा. कोरकू जमातीतील दर हजार पुरुषांमागे ९११ स्त्रिया असल्याचे पहायला मिळाले. ही आकडेवारी महाराष्ट्राच्या आकडेवारीपेक्षा देखील कमी आहे. धारणी तालुका मध्य प्रदेशच्या सीमेलगतच असून तेथे मध्यप्रदेशच्या सामाजिक व सांस्कृतिक प्रभावामुळे स्त्रियांची संख्या कमी असावी असे वाटते.

सर्वेक्षित लोकसंख्येमध्ये वयोगटानुसार वर्गीकरण बघितले असता सुमारे १५% व्यक्ती ० ते ६ वर्ष वयोगटात तर ० ते १५ वर्ष अशा वयोगटात एकूण ४०% लोकसंख्या असल्याचे दिसते. ६० वर्षापुढे केवळ ५% व्यक्ती असल्याचे दिसून आले यावरुन असा निष्कर्ष काढता येतो की आदिवासी समाजात जन्मणाऱ्या मुलांची संख्या (जन्म दर) जास्त असून त्यामानाने मृत्यू दर मात्र कमी झाला आहे. आयुर्मान कमी असल्याने वयस्क अथवा ज्येष्ठ नागरिकांची संख्या अत्यंत कमी आहे.

आदिवासी जंगल, दऱ्याखोऱ्यातून, पर्वतराजीतून रहातात. येथील शेती निसर्गाच्या लहरीवरच अवलंबून असते. वयाच्या आठव्या दहाव्या वर्षापासून शारीरिक कष्टांना सुरुवात होते. भौगोलिक परिस्थितीमुळे अधिक अंगमेहनत घ्यावी लागते. शेतीमधील अपुऱ्या उत्पादनामुळे अन्न सुरक्षिततेचा अभाव असतो.

जंगलांचा ऱ्हास होत चालल्याने फळे, कंदमुळे, भाज्या वगैरे मिळण्याचे प्रमाणदेखील कमी होत चालले आहे. यामुळे प्रौढांमध्ये देखील कुपोषण दिसून येते. शुध्द पाण्याचा अभाव, वारंवार उद्‌भवणारे सांसर्गिक आजार, अपुऱ्या आरोग्य सोयी सुविधा या सर्व बाबींचा आदिवासींच्या आरोग्यावर परिणाम होतो. वरील गोष्टींचा परिपाक म्हणूनच आदिवासींच्या शरीराची झीज होते आणि चाळिशी-पन्नाशीतच मरण ओढवते. म्हणूनच वयाची साठी पार केलेले वृध्द अत्यंत कमी संख्येने बघायला मिळतात.

सर्वेक्षित लोकसंख्येमध्ये एका बाजूला धडगाव अक्कलकुवा तालुक्यातील भिल्ल जमातीत सुमारे ४८% म्हणजे जवळजवळ निम्मी लोकसंख्या ०-१५ वर्ष या वयोगटात होती तर झरीजामणीमध्ये या वयोगटात केवळ ३२% लोकसंख्या होती. याचाच अर्थ असा की सातपुड्यातील तालुक्यांमधून लोकसंख्या अत्यंत तरुण आहे तर झरीजामणीमधील लोकसंख्या त्यामानाने स्थिरावलेली आहे. कुटुंबाच्या आकारावरुनही हेच चित्र असल्याचे आपण यापूर्वीच पाहिले आहे. लोकसंख्येच्या वयोगटानुसार वर्गीकरणातून या निरीक्षणाला पुष्टीच मिळते.

सर्वेक्षित आदिवासी लोकसंख्येमध्ये विवाहित व्यक्तींच्या तुलनेत विभक्त अथवा घटस्फोटित स्त्री पुरुषांची संख्या अत्यंत कमी प्रमाणात असल्याचे दिसते आणि हे निरीक्षण सर्व तालुके तसेच जमातींना देखील लागू होते. इतर जातीजमातींपेक्षा विवाह निर्णयाच्या बाबतीत आदिवासी खूपच पुढारलेले आहेत. प्रत्येक स्त्री-पुरुषाला आपला आयुष्याचा

जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य असते. एखादे वेळेस वैवाहिक जोडीदार पसंत पडला नाही तर त्यापासून विभक्त होण्याचे तसेच घटस्फोट घेण्याचे देखील स्वातंत्र्य असते आणि अशा वेळेस आदिवासी समाजदेखील नातेसंबंध टिकवून ठेवण्यासाठी दबाव टकत नाही, तर घटस्फोटासाठी संमती देतो. पुनर्विवाह तसेच विधवा विवाहालादेखील आदिवासी समाजात मान्यता असते.

विवाह निर्णयाच्या बाबतीत आदिवासी व्यक्तींना स्वातंत्र्य असेल तरी भारतातील इतर भागात जसे आढळून येते त्याप्रमाणेच आदिवासी स्त्री-पुरुषांचे विवाहाचे वय मात्र कमीच असते. सुमारे ७५ ते ८० टक्के विवाह कायद्याने नेमून दिलेल्या वयापेक्षा कमी वयातच होताना दिसतात. मुलींच्या बाबतीत घरातील सर्व कामे करता येणे आणि मुलांच्या बाबतीत घरच्या शेतीची कामे स्वतंत्रपणे करता येणे हेच लग्न करण्याचे निकष असतात. घरातील कामे, लहान भावंडांचा सांभाळ, माध्यमिक विद्यालय दूर असणे यामुळे बहुतांश मुलींची प्राथमिक शिक्षणानंतर म्हणजे सातवीनंतर गळती होते आणि एक दोन वर्षातच लग्न केले जाते. मुलांनी जरी माध्यमिक शाळेत शिक्षण घेतले तरी नववी, दहावीत एक-दोन प्रयत्न करुनही उत्तीर्ण होता आले नाही तर सरळ शेतीतून उपजीविकेचा मार्ग पत्करला जातो त्याचबरोबर संसाराचा मार्गदेखील. बहुतांश आदिवासी जमातीतून हेच चित्र दिसते, अगदी आदिवासी जमातींमध्ये पुढे असलेल्या कोकणा आणि महादेवकोळी जमातीत सुध्दा याला अपवाद फक्त गोंड, कोलाम आणि परधान व माडिया या दक्षिण विदर्भातील जमातींचा. यापैकी कोलाम वगळता अन्य जमातींमध्ये शिक्षणाचे प्रमाण बऱ्यापैकी आहे त्यामुळेच विवाह वय वाढले असावे.

प्रत्येक आदिवासी जमात ही विशिष्ट भूभागातच रहात असते आणि भिल्ल, गोंड, महादेव कोळी, कोकणा, ठाकर यासारख्या काही मोजक्या जमाती सोडल्या तर इतर जमाती एका जिल्ह्यातच निवास करुन रहात असल्याचे दिसते. विवाह ठरवताना स्वत:च्या गावात शेजारच्या गावातून अथवा फार फार तर पायी चालण्याच्या टप्प्यातल्या अंतरावरच विवाह ठरवला जातो. तसेच प्रत्येक जमातीचे समाज वर्तुळ लहान असल्याने बहुतांश विवाह हे २० किलोमीटरच्या परिघातच होतात. याला कोणत्याही जमातीचा अपवाद नाही.

शिक्षण हा समाज विकासाचा पाया असतो. आदिवासी भागामध्ये गेल्या २०-२५ वर्षात शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले. गावागावातून जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा, आश्रमशाळा उघडल्या गेल्या. शाळेच्या इमारती उभ्या राहिल्या, भौतिक विकास झाला मात्र मनुष्यबळाअभावी आदिवासी शिक्षणापासून दूरच राहिल्याचे दिसते. एक शिक्षकी शाळा, घरामध्ये वापरली जाणारी बोली भाषा आणि शाळेत शिकवली जाणारी मराठी भाषा यात असलेला जमीन-अस्मानाचा फरक, शिक्षकांचा आदिवासींकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टीकोन, दूर असलेल्या गावपाड्यांमधून शिक्षकांची गैरहजेरी या व इतर अनेक कारणांमुळे आदिवासींच्या प्राथमिक शिक्षणाचा पाया आजही कच्चाच असल्याचे दिसून येते. आश्रमशाळांमुळे विद्यार्थ्यांची दोन वेळच्या जेवणाची सोय झाली. गणवेष, पुस्तके व इतर साहित्य मोफत मिळू लागले मात्र त्यामुळे माध्यमिक शिक्षणाचा दर्जा

सुधारला असे म्हणता येणार नाही. आठवी, नववी, दहावी या वर्गामध्ये शिक्षण घेणाऱ्या आणि उत्तीर्ण होणाऱ्या मुला-मुलींच्या आकडेवारीवरुन आदिवासींच्या शिक्षणाची सद्यस्थिती लक्षात येते. आठवी अथवा दहावी उत्तीर्ण ही अनेक नोकऱ्यांसाठी किमान पात्रता असल्याने आदिवासी विद्यार्थी आरक्षण असून देखील नोकऱ्यांमध्ये कमी प्रमाणात आढळतात. अशा जागांवर आदिवासींमध्ये पुढारलेल्या जमातींचे उमेदवारच बहुतांश वेळा आढळून येतात.

वरील सर्व गोष्टींमुळेच सर्वेक्षित लोकसंख्येमध्ये केवळ ४३% एवढीच साक्षरता दिसून येते. हे प्रमाण भारतीय एकूण लोकसंख्येच्या-साक्षरतेच्या प्रमाणापेक्षा (६४%) खूपच कमी आहे.

सातपुड्यातील धडगाव तालुका आणि भिल्ल जमातीमध्ये शिक्षणाच्या बाबतीत वेगळेच चित्र पहायला मिळते. या भागातील भिल्लांमध्ये एका बाजूला सर्वाधिक निरक्षरता असल्याचे दिसून येते तर दुसऱ्या बाजूला पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्यांची संख्यादेखील अन्य तालुक्यांपेक्षा तसेच अन्य जमातींपेक्षा सर्वात जास्त असल्याचे दिसून येते. याचाच अर्थ असा की या भागातील भिल्लांमध्ये मोठी शैक्षणिक दरी असल्याचे दिसून येते. या भागामध्ये जे शिकले ते इतरांपेक्षा पार पुढे निघून गेले आणि बाकीचे मागे ते मागेच राहिले.

महादेव कोळी आणि कोकणा या आदिवासींमध्ये पुढे असलेल्या जमाती देखील शैक्षणिकदृष्टया पुढारलेल्या होत्या. या दोन जमातींमध्ये निरक्षर व्यक्तींचे प्रमाण इतर जमातींच्या तुलनेत कमी होते. त्याचबरोबर महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या / घेतलेल्या व्यक्तींची संख्या देखील मोठी होती. मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण सुध्दा लक्षणीय होते.

कातकरी जमातींमध्ये शिक्षणाचा प्रश्न फार मोठा आहे. या जमातीतील बहुतांश कुटुंबाकडे जमीन नाही, मोलमजुरी करुनच पोट भरले जाते. पावसाळ्याच्या चार महिन्यातच कातकरी आपल्या गावामध्ये असतात. वर्षातील उरलेले आठ महिने सहकुटुंब स्थलांतर केले जाते. बहुतेक कातकरी कुटुंबे वीटभट्ट्यांवर मजूर म्हणून काम करतात. ६-८ वर्षांची मुले देखील आपल्या आईवडिलांना मदत करतात. शाळा शिकून काय मिळणार ? हा कातकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न. म्हणूनच कुटुंबातील सर्वजण अर्थार्जनातच गुंतलेले असतात. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणूनच कातकऱ्यांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ८४% होते. एकूण शिक्षितांपैकी दहावीचा टप्पा ओलांडलेल्या केवळ ४% व्यक्ती, त्यापैकी फक्त तीन जण पदवीधर.

शिक्षण हा मुलांचा मुलभूत अधिकार मानला आहे. ६-१४ वर्ष वयोगटातील मुलांचे शिक्षण हा समाजाच्या सामाजिक प्रगतीचा आरसाच असतो. केंद्र शासनाच्या सर्व शिक्षा अभियानांतर्गत ६-१४ वर्ष वयोगटातील मुलांच्या शिक्षणावर भर देण्यात आला असून या वयोगटातील सर्व मुलामुलांनी शाळेत येऊन शिक्षण घ्यावे म्हणून दरवर्षी कोट्यावधी रुपये खर्च केले जातात. मात्र महाराष्ट्रातील आदिवासी भागात सर्व शिक्षण अभियानाचा प्रयत्न अपुराच ठरत असल्याचे आकडेवारी सांगते. ६-१४ वर्ष

वयोगटातील केवळ ६०% मुलेमुली शाळेत जात होती तर उर्वरित ४०% जण शाळेपासून दूर होते.

कातकरी आणि भिल्ल जमातीतील मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न फारच गंभीर असल्याचे दिसून येते. या दोन जमातींमधील ६-१४ वर्ष वयोगटातील केवळ ४०% मुलेच शाळेत जात होती. महादेव कोळी, गोंड, कोरकू आणि कोकणा या जमाती शिक्षणात पुढे असल्याचे दिसून आले.

आदिवासी जमातींमधील साक्षरतेचे, पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्यांचे प्रमाण पहाता इतर समाजाच्या बरोबरीने स्पर्धा करण्यासाठी अजून बराच लांबचा पल्ला गाठायचा आहे हे स्पष्टपणे दिसून येते. त्यातही सह्याद्री विभागातील कातकरी आणि सातपुड्यातील भिल्ल समाजाला शैक्षणिक विकास साधण्यासाठी खूप झगडावे लागणार आहे.

घराची बांधणी कशी आहे यावरून एखाद्या समाजाच्या रहाणीमानाची तसेच आर्थिक परिस्थितीची कल्पना येते. बहुतांश आदिवासींची घरे स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या बांबू, कारवी, ज्वारी अथवा तुराट्याच्या काडांचा वापर करुन बांधलेली असतात. तर छपरावर पारंपारिक कौले अथवा गवताने शाकारलेली असतात. जमीन मुरुम टाकून, चोपून घेऊन शेणाने सारवलेली असते.

आदिवासींना रहायला पक्के घर मिळावे यासाठी इंदिरा आवास योजनेतून २८,५०० रुपयांचे अनुदान दिले जाते व लाभार्थ्यांने १५०० रुपये योगदान देणे अपेक्षित असते. मात्र एवढ्या तुटपुंज्या अनुदानातून एक छोटीशीच खोली बाधून होऊ शकते. आणि हे अनुदान गेली कित्येक वर्ष तेवढेच ठेवले गेल्याने व महागाई वाढत गेल्याने घरासाठी वापरल्या जाणाऱ्या साहित्याच्या दर्जामध्ये तडजोड करावी लागत आहे.

घरकुल योजनेचा लाभ विशेष करून जव्हार, मोखाडा, कर्जत या तालुक्यात रहाणाऱ्या कुटुंबांनाच झाल्याचे दिसून येते तर धडगाव, अक्कलकुवा तालुक्यातून फार थोड्या प्रमाणात लाभार्थी आढळून आले. शासकीय यंत्रणेने योजनेचा लाभ राज्यातील सर्व भागातून समानपणे देणे अपेक्षित असताना काही आदिवासी भागात योजनेला झुकते माप दिले जात असल्याचे दिसते. अथवा असे म्हणता येईल की या योजनेची अंमलबजावणी काही भघागातूनच अत्यंत प्रभावीपणे होत आहे तर इतर भागात फारशा गांभीर्याने योजनेची अंमलबाजवणी होत नाही. विकास योजनांचे नियोजन करताना ही बाब विचारात घेतली गेली पाहिजे.

घरकुल योजनेचा सर्वाधिक कातकरी कुटुंबांना मिळाल्याचे दिसून आले आणि ते सहाजिकच आहे. अति मागास म्हणून गणल्या गेलेल्या या जमातीत सर्वाधिक भूमीहीन कुटुंबे आहेत.एका बाजुला असे चित्र असताना दुसऱ्या बाजूला असूनही २८% कातकरी कुटुंबाच्या घरावर गवताचेच छप्पर असल्याचे दिसून येते. कातकरी जमातीपर्यंत शासनाच्या योजनांचे लाभ अधिक प्रभाविपणे पोहोचवण्याची गरज आहे.

आदिवासी भातील केवळ ३२% घरांच्या भिंती विटा अथवा दगडांनी बांधलेल्या होत्या. सह्याद्री भागात घरांच्या भिंती विटांनी बांधल्या जातात मात्र तेथे बरेचदा भिंती बांधताना सिमेंटऐवजी मातीचाच वापर केला जातो. अशा बांधकामाला पक्के बांधकाम म्हणता येणार नाही.

सातपुड्यातील धडगाव, अक्कलकुवा या तालुक्यात बहुतांश घरांच्या भिंती बांबूच्याच असतात. या भिंती माती अथवा शेणाने लिंपलेल्या नसतात. त्यामुळे घरामध्ये ऊन, वारा, कधीकधी पाऊस देखील घरात येतो. डोक्यावर केवळ पारंपारिक कौलांचे छप्पर असते एवढेच काय ते सुख. भिल्ल समाजापेक्षा पावरा समाजाची घरे त्यातल्या त्यात बरी, विटांनी बांधलेली.

आदिवासी गावपाड्यात वीज पोहोचली असली तरी ती नावालाच आदिवासींच्या घरात आजही अंधाराचेच साम्राज्य पहायला मिळते. याची कारणे अनेक. घरात मीटर जोड सहित वीज घेतली मात्र वीज वापर कमी असला तरी भरमसाठ वीज देयके आली. तक्रार करुन काहीच फायदा नाही, अनेक आदिवासी कुटुंबे थकबाकीदार बनली. वीज मंडळाने वीज तोडली मीटर काढून नेले. आणि घरामध्ये वीज असली तरी तसा फारसा काही उपयोग नाही कारण दिवसातला निम्मा वेळ भारनियमनच असते. त्यामुळे वीज असून नसल्यासारखीच. म्हणूनच केवळ १६% घरातून विजेचा वापर होत होता. त्यापैकी निम्म्यापेक्षा कमी कुटुंबातूनच अधिकृत वीज जोड होते. वीज मंडळाचा लहरी कारभार, आर्थिक कुवत नसणे यामुळे आदिवासी अंधारातच जीवन कंठत आहे.

घरामधून वीज नसल्याने टेपरेकॉर्डर, दूरचित्रवाणी संच, केबल जोड, सीडी प्लेअर, फ्रीज, मिक्सर, पंखा यासारख्या वीजेवर चालणाऱ्या उपकरणांची संख्या अत्यंत कमी. महादेव कोळी आणि कोकणा जमातींमध्ये इतरांच्या तुलनेत जास्त कुटुंबातून ही उपकरणे वापरली जात होती.

सर्वेक्षणातून आदिवासी भागामध्ये खावटी कर्ज योजना, घरकुल योजना (काही तालुक्यातूनच) आणि मातृत्व अनुदान योजना या तीन योजनांचाच लाभ सर्वेक्षणपूर्व तीन वर्षाच्या कालावधीत लोकांना मिळाला असल्याचे दिसून आले. शेतीला सहाय्यभूत ठरून उत्पन्न वाढीला मदत करणाऱ्या विहिर, डिझेल इंजिन, शेततळे तसेच शेळीपालन, दुभती जनावरे यासारख्या योजनांचा लाभ अत्यल्प प्रमाणातच आदिवासींपर्यंत पोहोचू शकला. खाचरे तयार करणे आणि फळबाग लागवड योजना या दोनच योजना जव्हार व मोखाडा तालुक्यातून आदिवासी कुटुंबापर्यंत पोहोचण्यात यशस्वी झाल्याचे दिसते. व्यवसाय प्रशिक्षण किरकोळ व्यवसायासाठी कर्ज या योजनांचा लाभ आदिवासी युवकांपर्यंत पोहोचू शकलेला नाही.

आदिवासी उपयोजनेसाठी आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद केली जाते. आदिवासींच्या विकासासाठी साडेतीनशे पेक्षा जास्त योजना शासनाच्या निरनिराळ्या विभागांमार्फत राबविल्या जात असल्याचे सांगण्यात येते मात्र त्यापैकी किती योजना प्रत्यक्षात अंमलात आणल्या जातात आणि किती कागदावरच आहेत हा संशोधनाचा विषय ठरावा. आदिवासींसाठीच्या योजनांची अत्यंत प्रभाविपणे अंमलबजावणी करुन त्याचा लाभ जास्तीत जास्त लोकसंख्येपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे.

# तालुका निहाय तक्ते

१. लोकसंख्येची तालुकानिहाय वैशिष्ट्ये
२. वयोगट आणि तालुकानिहाय लोकसंख्येचे वर्गीकरण
३. एकूण लोकसंख्या : लिंग आणि तालुकानिहाय वर्गीकरण
४. ०-६ वर्ष वयोगटातील मुले : लिंग आणि तालुकानिहाय वर्गीकरण
५. विवाहाचे सरासरी वय : लिंग आणि तालुकानिहाय वर्गीकरण
६. विवाहाचे वय : लिंग आणि तालुकानिहाय वर्गीकरण
७. विवाहाचे अंतर : तालुकावार वर्गीकरण
८. साक्षरतेचे प्रमाण : लिंग आणि तालुकानिहाय वर्गीकरण
९. पुरुषांचे शिक्षण (६ वर्षावरील) : तालुकानिहाय वर्गीकरण
१०. स्त्रियांचे शिक्षण ० (६ वर्षावरील) : तालुकावार वर्गीकरण
११. ६ ते १४ वर्ष वयोगटातील मुलांचे शिक्षण : तालुकानिहाय वर्गीकरण
१२. ६-१४ वर्ष वयोगटातील मुलांची शिक्षणाची स्थिती - तालुकानिहाय वर्गीकरण
१३. मुख्य व्यवसाय ( १० वर्षावरील व्यक्ती) : तालुकानिहाय वर्गीकरण
१४. दुय्यम व्यवसाय (१० वर्षावरील व्यक्ती) : तालुकानिहाय वर्गीकरण
१५. घर बांधणी : तालुकानिहाय वर्गीकरण
१६. घरातील साधने : तालुकानिहाय वर्गीकरण
१७. शासकीय योजनेमध्ये काम : कुटुबातील काम करणाऱ्या सदस्यांची संख्या - तालुकानिहाय वर्गीकरण
१८. शासकीय योजनेमध्ये काम : कामाचे स्वरुप - तालुकानिहाय वर्गीकरण
१९. शासकीय योजनेमध्ये काम : कामाचा कालावधी - तालुकानिहाय वर्गीकरण
२०. शासकीय योजनेमध्ये काम : धान्यस्वरुपात मजुरी - तालुकानिहाय वर्गीकरण
२१. शसाकीय योजनेमध्ये काम : रोख मजुरी - तालुकानिहाय वर्गीकरण
२२. गेल्या ३ वर्षात शासकीय योजनेचा लाभ - तालुकानिहाय वर्गीकरण
२३. शासकीय योजनेचा लाभ : तालुकानिहाय वर्गीकरण
२४. शासकीय योजनेचा लाभ : तालुकानिहाय वर्गीकरण

## तक्ता क्र. १

### लोकसंख्येची तालुकानिहाय वैशिष्ट्ये

| तपशील | तालुका | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कर्जत | जव्हार | मोखाडा | अकोले | धडगाव | अक्कलकुवा | धारणी | इटापल्ली | झरीजामणी | |
| एकूण लोकसंख्या | १५५५३ | १७६११ | १९३६६ | १८३५७ | २५२६१ | १४७५२ | १५३६३ | ११२९० | १०८७४ | १४८४२७ |
| एकूण पुरुष | ७९५५ | ८९८८ | ९८४५ | ९४२४ | १२८६४ | ७५०८ | ८०२४ | ५७८२ | ५४४८ | ७५८३८ |
| एकूण स्त्रिया | ७५९८ | ८६२३ | ९५२१ | ८९३३ | १२३९७ | ७२४४ | ७३३९ | ५५०८ | ५४२६ | ७२५८९ |
| | | | | | | | | | | |
| एकूण कुटुंबे | ३३११ | ३४१९ | ३९४० | ३४३७ | ४३११ | २५२६ | २८५४ | २०९८ | २७०४ | २८६०८ |
| कुटुंबाचा आकार | ४.७ | ५.२ | ४.९ | ५.३ | ५.९ | ५.८ | ५.४ | ५.४ | ४.० | ५.२ |
| दर हजारी स्त्रियांचे प्रमाण | ९५५.१ | ९५९.४ | ९६७.१ | ९४७.९ | ९६३.७ | ९६४.८ | ९१४.६ | ९५२.६ | ९९६.० | ९५७.२ |
| ०-६ वर्ष वयोगटातील मुले | २१८५ | २६८६ | २८४५ | २०४४ | ४२१६ | २६८० | २२५१ | १५५९ | ११११ | २१५८५ |
| लोकसंख्येतील टक्केवारी | १४.० | १५.३ | १४.७ | ११.१ | १६.७ | १८.२ | १४.७ | १३.८ | १०.३ | १४.५ |
| | | | | | | | | | | |
| एकूण मृत्यू | १३९ | ७६ | १०१ | १०७ | १४२ | ९४ | ८५ | ४७ | ३९ | ८३० |
| एकूण पुरुष मृत्यू | ८८ | ४८ | ५३ | ५९ | ७१ | ४५ | ५६ | ३० | २५ | ४७५ |
| एकूण स्त्रिया मृत्यू | ५१ | २८ | ४८ | ४८ | ७१ | ४९ | २९ | १७ | १४ | ३५५ |
| | | | | | | | | | | |
| एकूण लोकसंख्येचा मृत्युदर | ८.९ | ४.३ | ५.२ | ५.८ | ५.६ | ६.४ | ५.५ | ४.२ | ३.६ | ५.६ |
| पुरुष मृत्यू दर | ११.१ | ५.३ | ५.४ | ६.३ | ५.५ | ६.० | ७.० | ५.२ | ४.६ | ६.३ |
| स्त्रिया मृत्यू दर | ६.७ | ३.२ | ५.० | ५.४ | ५.७ | ६.८ | ४.० | ३.१ | २.६ | ४.९ |

## तक्ता क्र. २

| वयोगट वर्ष | | वयोगट आणि तालुकानिहाय लोकसंख्येचे वर्गीकरण | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्जत | जव्हार | मोखाडा | अकोले | धडगाव | अक्कलकुवा | धारणी | इटापल्ली | झरीजामणी | |
| ० - ५ | संख्या | १६८८ | २०३० | २२१५ | १६०९ | ३२८८ | २०५८ | १७४४ | १२१५ | ८४८ | १६६९५ |
| | % | १०.९% | ११.५% | ११.४% | ८.८% | १३.०% | १४.०% | ११.४% | १०.८% | ७.८% | ११.२% |
| ५ - १० | संख्या | २२८२ | २५४५ | २७४० | २२५२ | ४७६० | २८२० | २४३८ | १६१२ | १३३४ | २२७८३ |
| | % | १४.७% | १४.५% | १४.१% | १२.३% | १८.८% | १९.१% | १५.९% | १४.३% | १२.३% | १५.३% |
| १० - १५ | संख्या | १७८२ | १९७३ | २१७० | २३७९ | ३९२१ | २२२० | २१६१ | १३६९ | १४३४ | १९४०९ |
| | % | ११.५% | ११.२% | ११.२% | १३.०% | १५.५% | १५.०% | १४.१% | १२.१% | १३.२% | १३.१% |
| १५ - २० | संख्या | १४१४ | १८०१ | १८५६ | २३२१ | ३०१० | १६८० | १६३० | ११४८ | ११६४ | १६०२४ |
| | % | ९.१% | १०.२% | ९.६% | १२.६% | ११.९% | ११.४% | १०.६% | १०.२% | १०.७% | १०.८% |
| २० - २५ | संख्या | १५१४ | १६१४ | १६८१ | १६२५ | २१५९ | १२२० | १३४२ | १०४० | ९०८ | १३१०३ |
| | % | ९.७% | ९.२% | ८.७% | ८.९% | ८.५% | ८.३% | ८.७% | ९.२% | ८.४% | ८.८% |
| २५ - ३० | संख्या | १४५७ | १५१० | १६७९ | १४३१ | २०१६ | १०७६ | १२३६ | ९४६ | ८९४ | १२२४५ |
| | % | ९.४% | ८.६% | ८.७% | ७.८% | ८.०% | ७.३% | ८.०% | ८.४% | ८.२% | ८.२% |
| ३० - ३५ | संख्या | ११२६ | ११३६ | १३७१ | १०६८ | १६०५ | ९३४ | ११९५ | ८८९ | ९२१ | १०२३५ |
| | % | ७.२% | ६.५% | ७.१% | ५.८% | ६.४% | ६.३% | ७.८% | ७.९% | ८.५% | ६.९% |
| ३५ - ४० | संख्या | १०६६ | १२६२ | १४०३ | ११३१ | १३८३ | ८४२ | १०९७ | ८४१ | ८९६ | ९९२१ |
| | % | ६.९% | ७.२% | ७.२% | ६.२% | ५.५% | ५.७% | ७.१% | ७.४% | ८.२% | ६.७% |
| ४० - ४५ | संख्या | ८४५ | १०६६ | १०९५ | ९३२ | ९८२ | ५२२ | ८६८ | ६६३ | ७५३ | ७६४६ |
| | % | ५.४% | ६.१% | ५.२% | ५.१% | ३.९% | ३.५% | ५.६% | ५.९% | ६.९% | ५.२% |
| ४५ - ५० | संख्या | ७९३ | ९०३ | ८९८ | ८९७ | ६८६ | ४१२ | ५६७ | ५४३ | ५१८ | ६२१७ |
| | % | ५.१% | ५.१% | ४.६% | ४.९% | २.७% | २.८% | ३.७% | ४.८% | ४.८% | ४.२% |
| ५० - ५५ | संख्या | ४७९ | ५६८ | ६३३ | ७०८ | ४४५ | २४९ | ३२७ | ३८७ | ३२३ | ४११९ |
| | % | ३.१% | ३.२% | ३.३% | ३.९% | १.८% | १.७% | २.१% | ३.४% | ३.०% | २.८% |
| ५५ - ६० | संख्या | ३६८ | ३६४ | ४४५ | ५९६ | ३०७ | २३८ | २३४ | २२९ | २५६ | ३०३७ |
| | % | २.४% | २.१% | २.३% | ३.२% | १.२% | १.६% | १.५% | २.०% | २.४% | २.०% |
| ६० वर्षाहून अधिक | संख्या | ७४९ | ८३९ | १२६० | १४०८ | ६९९ | ४८१ | ५२४ | ४०८ | ६२५ | ६९९३ |
| | % | ४.८% | ४.८% | ६.५% | ७.७% | २.८% | ३.३% | ३.४% | ३.६% | ५.७% | ४.७% |
| एकूण | संख्या | १५५५३ | १७६११ | १९३६६ | १८३५७ | २५२६१ | १४७५२ | १५३६३ | ११२९० | १०८७४ | १४८४२७ |
| | % | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% |

### तक्ता क्र. ३

| लिंग | | एकूण लोकसंख्या : लिंग आणि तालुकानिहाय वर्गीकरण | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्जत | जव्हार | मोखाडा | अकोले | धडगाव | अक्कलकुवा | धारणी | इटापल्ली | झरीजामणी | |
| पुरुष | संख्या | ७९५५ | ८९८८ | ९८४५ | ९४२४ | १२८६४ | ७५०८ | ८०२४ | ५७८२ | ५४४८ | ७५८३८ |
| | % | ५१.१% | ५१.०% | ५०.८% | ५१.३% | ५०.९% | ५०.९% | ५२.२% | ५१.२% | ५०.१% | ५१.१% |
| स्त्रिया | संख्या | ७५९८ | ८६२३ | ९५२१ | ८९३३ | १२३९७ | ७२४४ | ७३३९ | ५५०८ | ५४२६ | ७२५८९ |
| | % | ४८.९% | ४९.०% | ४९.२% | ४८.७% | ४९.१% | ४९.१% | ४७.८% | ४८.८% | ४९.९% | ४८.९% |
| एकूण | संख्या | १५५५३ | १७६११ | १९३६६ | १८३५७ | २५२६१ | १४७५२ | १५३६३ | ११२९० | १०८७४ | १४८४२७ |
| | % | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% |

### तक्ता क्र. ४

| वयोगट | | | ०-६ वर्ष वयोगटातील मुले : लिंग आणि तालुकानिहाय वर्गीकरण | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| लिंग | | | कर्जत | जव्हार | मोखाडा | अकोले | धडगाव | अक्कलकुवा | धारणी | इटापल्ली | झरीजामणी | |
| मुले | ० - ३ वर्ष | संख्या | ६३१ | ७७९ | ८६७ | ६२५ | १२८४ | ८२७ | ६७८ | ४२४ | ३२२ | ६४३७ |
| | | % | ४६.२% | ४८.३% | ५०.४% | ४८.६% | ४८.९% | ४८.९% | ४८.६% | ४७.१% | ४८.२% | ४८.५% |
| | ३ - ६ वर्ष | संख्या | ७३४ | ८३५ | ८५२ | ६६० | १३४२ | ८६३ | ७१६ | ४७७ | ३४६ | ६८२५ |
| | | % | ५३.८% | ५१.७% | ४९.६% | ५१.४% | ५१.१% | ५१.१% | ५१.४% | ५२.९% | ५१.८% | ५१.५% |
| | एकूण | संख्या | १३६५ | १६१४ | १७१९ | १२८५ | २६२६ | १६९० | १३९४ | ९०१ | ६६८ | १३२६२ |
| | | % | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% |
| मुली | ० - ३ वर्ष | संख्या | ५८४ | ७७८ | ७८३ | ५५७ | १२६५ | ७४८ | ५८९ | ४६७ | २९७ | ६०६८ |
| | | % | ४४.३% | ४९.५% | ४८.१% | ४५.५% | ४८.२% | ४८.०% | ४५.९% | ४९.४% | ४३.०% | ४७.२% |
| | ३ - ६ वर्ष | संख्या | ७३४ | ७९५ | ८४६ | ६६७ | १३६० | ८१० | ६९३ | ४७८ | ३९३ | ६७७६ |
| | | % | ५५.७% | ५०.५% | ५१.९% | ५४.५% | ५१.८% | ५२.०% | ५४.१% | ५०.६% | ५७.०% | ५२.८% |
| | एकूण | संख्या | १३१८ | १५७३ | १६२९ | १२२४ | २६२५ | १५५८ | १२८२ | ९४५ | ६९० | १२८४४ |
| | | % | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% |

तक्ता क्र. ५

| विवाहाचे सरासरी वय : लिंग आणि तालुकानिहाय आकडेवारी | | | | |
|---|---|---|---|---|
| तालुका | पुरुषांचे सरासरी विवाह वय | एकूण पुरुष | स्त्रियांचे सरासरी विवाह वय | एकूण स्त्रिया |
| कर्जत | १८.८ | ३६५७ | १६.८ | ३७३३ |
| जव्हार | १८.८ | ४०२७ | १६.६ | ४०७७ |
| मोखाडा | १९.१ | ४६३२ | १७.० | ४७४० |
| अकोले | १७.६ | ४१७६ | १५.५ | ४३११ |
| धडगाव | १७.५ | ४६३६ | १६.० | ४७१५ |
| अक्कलकुवा | १८.० | २६९७ | १६.५ | २७३५ |
| धारणी | १९.६ | ३१५७ | १७.० | ३१९२ |
| एटापल्ली | २०.६ | २४०७ | १८.६ | २४५७ |
| झरीजामणी | २०.७ | २५२१ | १७.७ | २५४९ |
| एकूण | १८.८ | ३१९१० | १६.७ | ३२५०९ |

## तक्ता क्र. ६

## विवाहाचे वय : लिंग आणि तालुकानिहाय वर्गीकरण

| विवाह वय | | | तालुका | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कर्जत | जव्हार | मोखाडा | अकोले | धडगाव | अक्कलकुवा | धारणी | इटापल्ली | झरीजामणी | |
| पुरुष | १० - १५ वर्ष | संख्या | १०१ | १७५ | १३१ | ४५९ | २९६ | ५२ | ३८ | ४८ | ४३ | १३४३ |
| | | % | २.६% | ४.४% | २.८% | ११.३% | ६.५% | २.०% | १.१% | १.८% | १.७% | ४.१% |
| | १५ - १८ वर्ष | संख्या | ८९७ | ९७६ | १००९ | १३४० | १९७१ | ८५१ | ४२८ | २६१ | ११२ | ७८४५ |
| | | % | २३.२% | २४.३% | २१.६% | ३२.९% | ४३.१% | ३२.३% | १२.९% | ९.९% | ४.३% | २४.२% |
| | १८ - २१ वर्ष | संख्या | २४४९ | १८९६ | २६४७ | १६७२ | १७८५ | १४४३ | २४१६ | ११८३ | १३६८ | १६८५९ |
| | | % | ६३.४% | ४७.२% | ५६.६% | ४१.०% | ३९.०% | ५४.८% | ७२.७% | ४४.८% | ५२.७% | ५२.०% |
| | २१ - २५ वर्ष | संख्या | ३७९ | ८५८ | ८०६ | ५४४ | ४८१ | २४१ | ४१६ | ९२० | ९९६ | ५६४१ |
| | | % | ९.८% | २१.४% | १७.२% | १३.३% | १०.५% | ९.१% | १२.५% | ३४.९% | ३८.४% | १७.४% |
| | २५ पेक्षा जास्त | संख्या | ३९ | १०९ | ८० | ६२ | ४३ | ४७ | २५ | २२७ | ७५ | ७०७ |
| | | % | १.०% | २.७% | १.७% | १.५% | .९% | १.८% | .८% | ८.६% | २.९% | २.२% |
| | एकूण | संख्या | ३८६५ | ४०१४ | ४६७३ | ४०७७ | ४५७६ | २६३४ | ३३२३ | २६३९ | २५९४ | ३२३९५ |
| | | % | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% |
| स्त्रिया | १० - १५ वर्ष | संख्या | ५०३ | ५२४ | ६२६ | १३९८ | १११५ | २७३ | २२३ | ११४ | २५३ | ५०२९ |
| | | % | १२.०% | १२.३% | १२.२% | ३०.८% | २३.४% | ९.९% | ६.४% | ४.३% | ८.८% | १४.५% |
| | १५ - १८ वर्ष | संख्या | २८३६ | २४७७ | ३०७१ | २४१७ | २५२९ | १७१२ | २७७९ | ११४० | १४५२ | २०४१३ |
| | | % | ६७.४% | ५७.९% | ५९.९% | ५३.३% | ५३.२% | ६१.९% | ७९.७% | ४३.४% | ५०.६% | ५८.९% |
| | १८ - २१ वर्ष | संख्या | ७६६ | १०१७ | १२४४ | ६३८ | ९५६ | ६६० | ४५२ | ९६३ | १००१ | ७६९७ |
| | | % | १८.२% | २३.८% | २४.३% | १४.१% | २०.१% | २३.९% | १३.०% | ३६.७% | ३४.९% | २२.२% |
| | २१ - २५ वर्ष | संख्या | ९० | २२० | १५७ | ६६ | १३६ | ९७ | २८ | ३३२ | १४४ | १२७० |
| | | % | २.१% | ५.१% | ३.१% | १.५% | २.९% | ३.५% | .८% | १२.७% | ५.०% | ३.७% |
| | २५ वर्षापेक्षा जास्त | संख्या | १३ | ३९ | २७ | १४ | २० | २३ | ६ | ७५ | १८ | २३५ |
| | | % | .३% | .९% | .५% | .३% | .४% | .८% | .२% | २.९% | .६% | .७% |
| | एकूण | संख्या | ४२०८ | ४२७७ | ५१२५ | ४५३३ | ४७५६ | २७६५ | ३४८८ | २६२४ | २८६८ | ३४६४४ |
| | | % | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% |

## तक्ता क्र. ७

| विवाहाचे अंतर | | विवाहाचे अंतर : तालुकावार वर्गीकरण | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्जत | जव्हार | मोखाडा | अकोले | धडगाव | अक्कलकुवा | धारणी | इटापल्ली | झरीजामणी | |
| ५ किमी पेक्षा अंतर | संख्या | ७२५ | ८५३ | १०७७ | ७७३ | १७३० | ६१८ | ४०१ | ३१७ | ३९३ | ६८८७ |
| | % | २४.८% | ३३.०% | २६.५% | २०.३% | ४३.१% | २९.४% | १७.९% | १९.७% | १८.८% | २७.१% |
| ५ – १० किमी | संख्या | ५४० | ६२३ | ९१९ | ८६३ | ९३५ | ४०९ | ४२७ | ३३४ | ३७७ | ५४२७ |
| | % | १८.४% | २४.१% | २२.६% | २२.७% | २३.३% | १९.४% | १९.०% | २०.८% | १८.०% | २१.३% |
| १० – २० किमी | संख्या | ८४५ | ६३६ | ९६० | १०५६ | ९२० | ५६६ | ६६७ | ४२९ | ५८८ | ६६६७ |
| | % | २८.८% | २४.६% | २३.७% | २७.७% | २२.९% | २६.९% | २९.७% | २६.७% | २८.१% | २६.२% |
| २० – ५० कमी | संख्या | ७११ | ४०३ | ९५४ | ९६१ | ३७५ | ४६९ | ६४५ | ४१० | ६२३ | ५५६७ |
| | % | २४.५% | १५.६% | २३.५% | २५.४% | ९.३% | २२.३% | २८.८% | २५.५% | २९.८% | २१.९% |
| ५० – १०० किमी | संख्या | ९१ | ५९ | १३४ | १३२ | ५१ | ४३ | १०३ | १०२ | ८८ | ८०३ |
| | % | ३.१% | २.३% | ३.३% | ३.५% | १.३% | २.०% | ४.६% | ६.३% | ४.२% | ३.२% |
| १०० किमी पेक्षा जास्त | संख्या | ९ | १० | १४ | १७ | ४ | | | १५ | २० | ८९ |
| | % | .३% | .४% | .३% | .४% | .१% | | | .९% | १.०% | .३% |
| एकूण | संख्या | २९२९ | २५८४ | ४०५८ | ३८१० | ४०१५ | २१०५ | २२४३ | १६०७ | २०८९ | २५४४० |
| | % | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% |

## तक्ता क्र. ८ साक्षरतेचे प्रमाण : लिंग आणि तालुकानिहाय वर्गीकरण

| लिंग | | तालुका | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्जत | जव्हार | मोखाडा | अकोले | धडगाव | अक्कलकुवा | धारणी | इटापल्ली | झरीजामणी | |
| पुरुष | संख्या | ३५४६ | ३७४५ | ४८४९ | ६०५५ | ३७२८ | २२६५ | ५६९१ | २०३२ | ३५६० | ३५४७१ |
| | % | ४४.६% | ४१.७% | ४९.३% | ६४.३% | २९.०% | ३०.२% | ७०.९% | ३५.१% | ६५.३% | ४६.८% |
| स्त्रिया | संख्या | २२७४.० | २४७४ | ३६०४ | ४०२२ | २३४८ | १४६६ | ४११२ | १२८६ | २७३३ | २४३१९ |
| | % | २९.९% | २८.७% | ३७.९% | ४५.०% | १८.९% | २०.२% | ५६.०% | २३.३% | ५०.४% | ३३.५% |
| एकूण | संख्या | ५८२० | ६२१९ | ८४५३ | १००७७ | ६०७६ | ३७३१ | ९८०३ | ३३१८ | ६२९३ | ५९७९० |
| | % | ३७.४% | ३५.३% | ४३.६% | ५४.९% | २४.१% | २५.३% | ६३.८% | २९.४% | ५७.९% | ४०.३% |

## तक्ता क्र. ९

### पुरुषांचे शिक्षण (६ वर्षावरील) : तालुकावार वर्गीकरण

| शिक्षण | | कर्जत | जव्हार | मोखाडा | अकोले | धडगाव | अक्कलकुवा | धारणी | इटापल्ली | झरीजामणी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| निरक्षर | संख्या | ३६४० | ३९२९ | ४३४९ | २४५४ | ७१४८ | ३९४८ | २०३१ | ३०६७ | १६४२ | ३२२०८ |
| | % | ५३.५% | ५१.४% | ५२.८% | २९.४% | ६६.८% | ६४.९% | २९.९% | ६१.१% | ३४.०% | ५०.०% |
| १ ली ते ३ री | संख्या | ९२३ | ८२८ | १००१ | १०९८ | ९२३ | ६९९ | १४१३ | ६८३ | ९०६ | ८४७४ |
| | % | १३.६% | १०.८% | १२.१% | १३.२% | ८.६% | ११.५% | २०.८% | १३.६% | १८.७% | १३.१% |
| ४ थी ते ६ वी | संख्या | १०९२ | ९५९ | १००२ | १५३४ | ८०५ | ५७५ | १४०२ | ५१६ | १०८४ | ८९६९ |
| | % | १६.०% | १२.५% | १२.२% | १८.४% | ७.५% | ९.५% | २०.७% | १०.३% | २२.४% | १३.९% |
| ७ वी ते ९ वी | संख्या | ९१२ | १२६८ | १०२६ | १५४० | ६९८ | ४०६ | १०९४ | ४६६ | ७६४ | ८१७४ |
| | % | १३.४% | १६.६% | १२.५% | १८.४% | ६.५% | ६.७% | १६.१% | ९.३% | १५.८% | १२.७% |
| १० वी ते ११ वी | संख्या | १७६ | ३९० | ५६२ | १०९४ | ४६२ | २२१ | ५४५ | २०० | २८८ | ३९३८ |
| | % | २.६% | ५.१% | ६.८% | १३.१% | ४.३% | ३.६% | ८.०% | ४.०% | ६.०% | ६.१% |
| महाविद्यालयीन | संख्या | ५५ | १९० | २२४ | ४८९ | ५१७ | १७८ | २६९ | ७९ | १२८ | २१२९ |
| | % | .८% | २.५% | २.७% | ५.९% | ४.८% | २.९% | ४.०% | १.६% | २.६% | ३.३% |
| पदवीधर | संख्या | ८ | ७३ | ६४ | ८६ | ९० | ४० | ३१ | ९ | १९ | ४२० |
| | % | .१% | १.०% | .८% | १.०% | .८% | .७% | .५% | .२% | .४% | .७% |
| पदव्युत्तर | संख्या | ३ | ३ | १० | ३९ | ४० | १६ | ३ | २ | ३ | ११९ |
| | % | .०% | .०% | .१% | .५% | .४% | .३% | .०% | .०% | .१% | .२% |
| इतर | संख्या | | ३ | १ | १५ | १८ | १ | | | | ३८ |
| | % | | .०% | .०% | .२% | .२% | .०% | | | | .१% |
| एकूण | संख्या | ६८०९ | ७६४३ | ८२३९ | ८३४९ | १०७०१ | ६०८४ | ६७८८ | ५०२२ | ४८३४ | ६४४६९ |
| | % | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% |

## तक्ता क्र. १०

### स्त्रियांचे शिक्षण - (६ वर्षावरील) : तालुकावार वर्गीकरण

| | | कर्जत | जव्हार | मोखाडा | अक्कोले | धडगाव | अक्कलकुवा | धारणी | इटापल्ली | झरीजामणी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| निरक्षण | संख्या | ४५८९ | ४८३२ | ५३०० | ४०५० | ८१२२ | ४५८० | २९०५ | ३४९४ | २४४४ | ४०३१६ |
| | % | ७०.६% | ६६.४% | ६५.८% | ५१.०% | ७८.८% | ७७.१% | ४६.७% | ७४.३% | ५०.८% | ६५.३% |
| १ ली ते ३ री | संख्या | ७७१ | ६४९ | ९७० | १०४६ | ८०४ | ५७८ | १३११ | ४८८ | ७७५ | ७३९२ |
| | % | ११.९% | ८.९% | १२.०% | १३.२% | ७.८% | ९.७% | २१.१% | १०.४% | १६.१% | १२.०% |
| ४ थी ते ६ वी | संख्या | ६८८ | ७७६ | ८३८ | ११५४ | ५७२ | ४१६ | १०६९ | ३३७ | ७९० | ६६४० |
| | % | १०.६% | १०.७% | १०.४% | १४.५% | ५.५% | ७.०% | १७.२% | ७.२% | १६.४% | १०.८% |
| ७ वी ते ९ वी | संख्या | ३८८ | ८३३ | ६६५ | १०८० | ३८२ | १९१ | ६९० | २७० | ५५१ | ५०५० |
| | % | ६.०% | ११.५% | ८.३% | १३.६% | ३.७% | ३.२% | ११.१% | ५.७% | ११.५% | ८.२% |
| १० वी ते ११ वी | संख्या | ४७ | १३० | २१७ | ४७७ | २४६ | ११९ | १७२ | ७० | १८८ | १६६६ |
| | % | .७% | १.८% | २.७% | ६.०% | २.४% | २.०% | २.८% | १.५% | ३.९% | २.७% |
| महाविद्यालयीन | संख्या | १४ | ४२ | ५४ | १२१ | १५५ | ५५ | ६८ | ४० | ५१ | ६०० |
| | % | .२% | .६% | .७% | १.५% | १.५% | .९% | १.१% | .९% | १.१% | १.०% |
| पदवीधर | संख्या | २ | ११ | ११ | १३ | १९ | ४ | ६ | १ | ९ | ७६ |
| | % | .०% | .२% | .१% | .२% | .२% | .१% | .१% | .०% | .२% | .१% |
| पदव्युत्तर | संख्या | | | २ | १ | ४ | | २ | | | ९ |
| | % | | | .०% | .०% | .०% | | .०% | | | .०% |
| इतर | संख्या | | | | | ५ | | | १ | | ६ |
| | % | | | | | .०% | | | .०% | | .०% |
| एकूण | संख्या | ६४९९ | ७२७३ | ८०५७ | ७९४२ | १०३०९ | ५९४३ | ६२२३ | ४७०१ | ४८०८ | ६१७५५ |
| | % | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% |

## तक्ता क्र. ११

| शालेय शिक्षण | | | | ६ ते १४ वर्ष वयोगटातील मुलांचे शिक्षण : तालुकावार वर्गीकरण | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| लिंग | | | | कर्जत | जव्हार | मोखाडा | अकोले | धडगाव | अक्कलकुवा | धारणी | इटापल्ली | झरीजामणी | |
| मुले | | शिक्त आहे | संख्या | ११११ | १२७३ | १५८६ | १८६७ | १६३६ | ११३० | १७६३ | ८६१ | ९९८ | १२२३३ |
| | | | % | ६०.०% | ६१.०% | ७३.०% | ८५.१% | ४१.७% | ५१.२% | ८१.६% | ६४.०% | ७८.५% | ६३.६% |
| | | नाही | संख्या | ७४६ | ८१५ | ५८७ | ३२८ | २२८६ | १०७७ | ३९८ | ४८५ | २७३ | ६९९५ |
| | | | % | ४०.०% | ३९.०% | २७.०% | १४.९% | ५८.३% | ४८.८% | १८.४% | ३६.०% | २१.५% | ३६.४% |
| | एकूण | | संख्या | १८६५ | २०८८ | २१७३ | २१९५ | ३९२२ | २२०७ | २१६१ | १३४६ | १२७१ | १९२२८ |
| | | | % | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% |
| मुली | | शिक्त आहे | संख्या | ९११ | ९७७ | १४७६ | १६०८ | १२५५ | ८६६ | १५१४ | ६६२ | ९४८ | १०२१७ |
| | | | % | ५३.५% | ५५.१% | ७०.१% | ८०.४% | ३२.८% | ३९.२% | ७८.४% | ५१.३% | ७७.३% | ५६.५% |
| | | नाही | संख्या | ७९२ | ७९७ | ६३१ | ३९३ | २५७६ | १३४५ | ४१७ | ६२९ | २७८ | ७८५८ |
| | | | % | ४६.५% | ४४.९% | २९.९% | १९.६% | ६७.२% | ६०.८% | २१.६% | ४८.७% | २२.७% | ४३.५% |
| | एकूण | | संख्या | १७०३ | १७७४ | २१०७ | २००१ | ३८३१ | २२११ | १९३१ | १२९१ | १२२६ | १८०७५ |
| | | | % | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% |

## तक्ता क्र. १२

### ६-१४ वर्ष वयोगटातील मुलांची शिक्षणाची स्थिती - तालुकानिहाय वर्गीकरण

| शिक्षण | | तालुका | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्जत | जव्हार | मोखाडा | अकोले | धडगाव | अक्कलकुवा | धारणी | इटापल्ली | झरीजामणी | |
| शिक्त आहे | संख्या | २०३० | २२५० | ३०६२ | ३४७५ | २८९१ | १९९६ | ३२७७ | १५२३ | १९४६ | २२४५० |
| | % | ५६.९% | ५८.३% | ७१.५% | ८२.८% | ३७.३% | ४५.२% | ८०.१% | ५७.८% | ७७.९% | ६०.२% |
| नाही | संख्या | १५३८ | १६१२ | १२१८ | ७२१ | ४८६२ | २४२२ | ८१५ | १११४ | ५५१ | १४८५३ |
| | % | ४३.१% | ४१.७% | २८.५% | १७.२% | ६२.७% | ५४.८% | १९.९% | ४२.२% | २२.१% | ३९.८% |
| एकूण | संख्या | ३५६८ | ३८६२ | ४२८० | ४१९६ | ७७५३ | ४४१८ | ४०९२ | २६३७ | २४९७ | ३७३०३ |
| | % | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% |

## तक्ता क्र. १३

### मुख्य व्यवसाय (१० वर्षावरील व्यक्ती) तालुकानिहाय वर्गीकरण

| व्यवसाय | | तालुका | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्जत | जव्हार | मोखाडा | अक्रोले | धडगाव | अक्कलकुवा | धारणी | इटापल्ली | झरीजामणी | |
| शेती | संख्या | ३०४८ | ५२९५ | ४३७६ | ९०११ | ९०४२ | ५३४४ | ४०४२ | ६४९९ | २५९६ | ४९२५३ |
| | % | ३८.५% | ७७.०% | ६५.६% | ९६.८% | ९८.५% | ९६.१% | ६१.९% | ९६.५% | ४५.२% | ७६.३% |
| शेत मजुरी | संख्या | ७५ | ३१६ | ३३७ | १६ | २५ | ५४ | ८६९ | ४९ | ७७४ | २५१५ |
| | % | .९% | ४.६% | ५.१% | .२% | .३% | १.०% | १३.३% | .७% | १३.५% | ३.९% |
| मजुरी | संख्या | ४७३१ | १०८२ | १७८० | ८४ | ११ | ८७ | १४८६ | १३५ | २३१७ | ११७१३ |
| | % | ५९.७% | १५.७% | २६.७% | .९% | .१% | १.६% | २२.७% | २.०% | ४०.३% | १८.२% |
| स्वयंरोजगार | संख्या | ८ | १ | | | | २ | १ | | १ | १३ |
| | % | .१% | .०% | | | | .०% | .०% | | .०% | .०% |
| कामगार | संख्या | १ | ८ | २१ | ४४ | २ | १ | | | १८ | ९५ |
| | % | .०% | .१% | .३% | .५% | .०% | .०% | | | .३% | .१% |
| शासकीय नोकरी | संख्या | २५ | २० | १६ | ३७ | ३३ | २५ | ५२ | १६ | १९ | २४३ |
| | % | .३% | .३% | .२% | .४% | .४% | .४% | .८% | .२% | .३% | .४% |
| किरकोळ व्यवसाय | संख्या | १७ | १६ | १८ | २० | ४० | ११ | ४ | १३ | ७ | १४६ |
| | % | .२% | .२% | .३% | .२% | .४% | .२% | .१% | .२% | .१% | .२% |
| इतर नोकरी | संख्या | १७ | १४१ | १२२ | ९८ | २४ | ३९ | ७९ | २१ | ११ | ५५२ |
| | % | .२% | २.०% | १.८% | १.१% | .३% | .७% | १.२% | .३% | .२% | .९% |
| एकूण | संख्या | ७९२२ | ६८७९ | ६६७० | ९३१० | ९१७७ | ५५६३ | ६५३३ | ६७३३ | ५७४३ | ६४५३० |
| | % | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% |

## तक्ता क्र. १४

### दुय्यम व्यवसाय (१० वर्षावरील व्यक्ती) तालुकानिहाय वर्गीकरण

| दुय्यम व्यवसाय | | तालुका | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्जत | जव्हार | मोखाडा | अकोले | धडगाव | अक्कलकुवा | धारणी | इटापली | झरीजामणी | |
| शेती | संख्या | २५८ | ७५ | २६९ | ५९ | ४७ | १०१ | ४० | १३८ | ४४ | १०३१ |
| | % | ६.३% | १७.६% | ३३.८% | ५.५% | २८.३% | १३.५% | १.९% | ३७.२% | ३.०% | ९.१% |
| शेत मजुरी | संख्या | २८ | १० | १२ | ८० | १३ | ६ | ८ | १ | १३ | १७१ |
| | % | .७% | २.४% | १.५% | ७.५% | ७.८% | .८% | .४% | .३% | .९% | १.५% |
| मजुरी | संख्या | ३७४२ | २४२ | ४२३ | ६३४ | १८ | ६०४ | २०७४ | २१६ | १३९३ | ९३४६ |
| | % | ९२.०% | ५६.९% | ५३.१% | ५९.१% | १०.८% | ८०.६% | ९६.३% | ५८.२% | ९४.९% | ८२.९% |
| स्वयंरोजगार | संख्या | ५ | ५ | २ | २ | ३ | ३ | २ | १ | | २३ |
| | % | .१% | १.२% | .३% | .२% | १.८% | .४% | .१% | .३% | | .२% |
| शासकीय नोकरी | संख्या | | १ | ४ | ८ | ४ | | ३ | १ | २ | २३ |
| | % | | .२% | .५% | .७% | २.४% | | .१% | .३% | .१% | .२% |
| किरकोळ व्यवसाय | संख्या | ८ | २ | ३ | ८ | ३९ | ७ | ९ | १ | १ | ७८ |
| | % | .२% | .५% | .४% | .७% | २३.५% | .९% | .४% | .३% | .१% | .७% |
| किरकोळ व्यवसाय | संख्या | २० | ५२ | ५९ | २५८ | ३० | १९ | ११ | ३ | ११ | ४६३ |
| | % | .५% | १२.२% | ७.४% | २४.१% | १८.१% | २.५% | .५% | .८% | .७% | ४.१% |
| इतर नोकरी | संख्या | ८ | ३८ | २५ | २३ | १२ | ९ | ६ | १० | ४ | १३५ |
| | % | .२% | ८.९% | ३.१% | २.१% | ७.२% | १.२% | .३% | २.७% | .३% | १.२% |
| एकूण | संख्या | ४०६९ | ४२५ | ७९७ | १०७२ | १६६ | ७४९ | २१५३ | ३७१ | १४६८ | ११२७० |
| | % | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% |

## तक्ता क्र. १५

| घर | | घर बांधणी : तालुकानिहाय वर्गीकरण | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्जत | जव्हार | मोखाडा | अकोले | धडगाव | अक्कलकुवा | धारणी | इटापल्ली | कर्जत | |
| स्वत: बांधलेले | संख्या | २७३१ | २६९८ | ३३५८ | ३३१५ | ४०३५ | २४२० | २६३४ | १७३२ | २२८९ | २५२१२ |
| | % | ८२.३% | ७८.९% | ८५.२% | ९६.५% | ९३.६% | ९५.८% | ९२.३% | ८२.६% | ८४.७% | ८८.१% |
| शासकीय योजनेतून बांधलेले | संख्या | ५३१ | ६४४ | ५०१ | ८९ | २६९ | ९३ | १९९ | ३५५ | ३३८ | ३०१९ |
| | % | १६.०% | १८.८% | १२.७% | २.६% | ६.२% | ३.७% | ७.०% | १६.९% | १२.५% | १०.६% |
| इतर | संख्या | ५७ | ७७ | ८१ | ३३ | ७ | १३ | २१ | ११ | ७७ | ३७७ |
| | % | १.७% | २.३% | २.१% | १.०% | .२% | .५% | .७% | .५% | २.८% | १.३% |
| एकूण | संख्या | ३३१९ | ३४१९ | ३९४० | ३४३७ | ४३११ | २५२६ | २८५४ | २०९८ | २७०४ | २८६०८ |
| | % | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% |

## तक्ता क्र. १६

| साधने | | घरातील साधने : तालुकानिहाय वर्गीकरण | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्जत | जव्हार | मोखाडा | अकोले | धडगाव | अक्कलकुवा | धारणी | इटापल्ली | झरीजामणी | |
| फ्रीज | संख्या | ११ | ३८ | ३६ | ८ | ४ | | २ | ३ | २ | १०४ |
| | % | .३% | १.१% | .९% | .२% | .१% | | .१% | .१% | .१% | .४% |
| पंखा | संख्या | १८७ | १११ | १०५ | १४ | ४५ | १८ | ९६ | २२ | ६६ | ६७२ |
| | % | ५.६% | ३.५% | २.७% | .४% | १.०% | .७% | ३.४% | १.०% | २.४% | २.३% |
| मिक्सर | संख्या | २२ | ३२ | ६१ | २१ | १४ | ५ | ११ | ३ | १७ | १८६ |
| | % | .७% | .९% | १.५% | .६% | .३% | .२% | .४% | .१% | .६% | .७% |
| आटा चक्की | संख्या | १० | २५ | ३५ | १४ | ४३ | ८ | १२ | ४ | १२ | १६३ |
| | % | .३% | .७% | .९% | .४% | १.०% | .३% | .४% | .२% | .४% | .६% |

## तक्ता क्र. १७

### शासकीय योजनेमध्ये काम : कुटुबातील काम करणाऱ्या सदस्यांची संख्या – तालुकानिहाय वर्गीकरण

| कुटुंबातील सदस्य संख्या | | तालुका | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्जत | जव्हार | मोखाडा | अकोले | धडगाव | अक्कलकुवा | धारणी | इटापल्ली | झरीजामणी | |
| उपलब्ध नाही | संख्या | ८ | ९७ | ४४ | ४२ | ३४ | १६ | १२ | १५ | ४ | २७२ |
| | % | ४.३% | ४.०% | १.६% | २.६% | २.९% | २.३% | २.१% | १.७% | १.७% | २.६% |
| १ | संख्या | १४१ | १२६१ | ५२३ | ६३४ | २७२ | ३४७ | २८५ | ३७५ | १५२ | ३९९० |
| | % | ७५.०% | ५१.५% | १९.०% | ४०.०% | २३.५% | ५०.१% | ४९.७% | ४३.२% | ६४.७% | ३८.०% |
| २ | संख्या | ३४ | ९२१ | १६९३ | ८३८ | ५१० | १९९ | २३८ | २६० | ७२ | ४७६५ |
| | % | १८.१% | ३७.६% | ६१.५% | ५२.८% | ४४.१% | २८.७% | ४१.५% | ३०.०% | ३०.६% | ४५.४% |
| ३ | संख्या | २ | ९८ | २५८ | ४९ | १५७ | ८८ | २३ | ९७ | ३ | ७७५ |
| | % | १.१% | ४.०% | ९.४% | ३.१% | १३.६% | १२.७% | ४.०% | ११.२% | १.३% | ७.४% |
| ४ | संख्या | १ | ५३ | १७६ | १२ | ११४ | ३० | ९ | ८० | १ | ४७६ |
| | % | .५% | २.२% | ६.४% | .८% | ९.९% | ४.३% | १.६% | ९.२% | .४% | ४.५% |
| ४ पेक्षा जास्त | संख्या | २ | २० | ५७ | ११ | ७० | १३ | ७ | ४१ | ३ | २२४ |
| | % | १.१% | .८% | २.१% | .७% | ६.१% | १.९% | १.२% | ४.७% | १.३% | २.१% |
| एकूण | संख्या | १८८ | २४५० | २७५१ | १५८६ | ११५७ | ६९३ | ५७४ | ८६८ | २३५ | १०५०२ |
| | % | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% |

# तक्ता क्र. १८

## शासकीय योजनेमध्ये काम : कामाचे स्वरुप - तालुकानिहाय वर्गीकरण

| कामाचे स्वरुप | | तालुका | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्जत | जव्हार | मोखाडा | अकोले | धडगाव | अक्कलकुवा | धारणी | इटापल्ली | इरीजामणी | |
| सांगितले नाही | संख्या | ३९ | १०२ | ४६ | ८१ | ५३ | ३५ | ४४ | ३६ | २८ | ४६४ |
| | % | २०.७% | ४.२% | १.७% | ५.१% | ४.६% | ५.१% | ७.७% | ४.१% | ११.९% | ४.४% |
| पाणलोट क्षेत्र विकास | संख्या | ४५ | १९० | १७६ | ७८५ | ३३३ | ४६ | ६५ | २२३ | ३२ | १८९५ |
| | % | २३.९% | ७.८% | ६.४% | ४९.५% | २८.८% | ६.६% | ११.३% | २५.७% | १३.६% | १८.०% |
| जमीन सपाटीकरण (खाचरे) | संख्या | ५ | १५५४ | २२६४ | ४६७ | १९ | ३६ | १७ | २९० | ३९ | ४६९१ |
| | % | २.७% | ६३.४% | ८२.३% | २९.४% | १.६% | ५.२% | ३.०% | ३३.४% | १६.६% | ४४.७% |
| रस्त्याचे काम | संख्या | ६२ | १७५ | १३५ | ७५ | ६७० | ४७४ | ३२६ | १५४ | ७० | २१४१ |
| | %ऱ | ३३.०% | ७.१% | ४.९% | ४.७% | ५७.९% | ६८.४% | ५६.८% | १७.७% | २९.८% | २०.४% |
| वन खात्याचे काम | संख्या | ७ | १५७ | २४ | १२ | ५५ | २६ | ६४ | ८३ | ३६ | ४६४ |
| | % | ३.७% | ६.४% | .९% | .८% | ४.८% | ३.८% | ११.१% | ९.६% | १५.३% | ४.४% |
| रोजगार हमी योजना | संख्या | १२ | २५० | ९६ | १२९ | १३ | ६६ | १६ | ८ | २५ | ६१५ |
| | % | ६.४% | १०.२% | ३.५% | ८.१% | १.१% | ९.५% | २.८% | .९% | १०.६% | ५.९% |
| इतर | संख्या | १८ | २२ | १० | ३७ | १४ | १० | ४२ | ७४ | ५ | २३२ |
| | % | ९.६% | .९% | .४% | २.३% | १.२% | १.४% | ७.३% | ८.५% | २.१% | २.२% |
| एकूण | संख्या | १८८ | २४५० | २७५१ | १५८६ | ११५७ | ६९३ | ५७४ | ८६८ | २३५ | १०५०२ |
| | % | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% |

## तक्ता क्र. १९

### शासकीय योजनेमध्ये काम : कामाचा कालावधी -तालुकानिहाय वर्गीकरण

| कामाचा कालावधी | | तालुका | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्जत | जव्हार | मोखाडा | अकोले | धडगाव | अक्कलकुवा | धारणी | इटापल्ली | झरीजामणी | |
| सांगितला नाही | संख्या | ९ | ५८ | ३० | ३१ | १९ | ९ | ९ | ११ | ४ | १८० |
| | % | ४.८% | २.४% | १.१% | २.०% | १.६% | १.३% | १.६% | १.३% | १.७% | १.७% |
| १ - ७ दिवस | संख्या | १०४ | ९३६ | १३५३ | २०१ | ७६१ | ४४९ | १२७ | ५७७ | १७ | ४५२५ |
| | % | ५५.३% | ३८.२% | ४९.२% | १२.७% | ६५.८% | ६४.८% | २२.१% | ६६.५% | ७.२% | ४३.१% |
| ७ - १५ दिवस | संख्या | ५७ | १२१२ | १२३० | १०९४ | ३०१ | १६३ | २८८ | २१७ | १६३ | ४७२५ |
| | % | ३०.३% | ४९.५% | ४४.७% | ६९.०% | २६.०% | २३.५% | ५०.२% | २५.०% | ६९.४% | ४५.०% |
| १५ - ३० दिवस | संख्या | १३ | १९८ | १०८ | २१० | ५७ | ४७ | १३२ | ४७ | ३६ | ८४८ |
| | % | ६.९% | ८.१% | ३.९% | १३.२% | ४.९% | ६.८% | २३.०% | ५.४% | १५.३% | ८.१% |
| १ महिन्यापेक्षा जास्त | संख्या | ५ | ४६ | ३० | ५० | १९ | २५ | १८ | १६ | १५ | २२४ |
| | % | २.७% | १.९% | १.१% | ३.२% | १.६% | ३.६% | ३.१% | १.८% | ६.४% | २.१% |
| एकूण | संख्या | १८८ | २४५० | २७५१ | १५८६ | ११५७ | ६९३ | ५७४ | ८६८ | २३५ | १०५०२ |
| | % | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% |

तक्ता क्र. २०

## शासकीय योजनेमध्ये काम : धान्यस्वरुपात मजुरी - तालुकानिहाय वर्गीकरण

| धान्यस्वरुपात मजुरी | | तालुका | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्जत | जव्हार | मोखाडा | अकोले | धडगाव | अक्कलकुवा | धारणी | इटापल्ली | झरीजामणी | |
| सांगितले नाही | संख्या | ९० | २१८६ | २७०३ | ८० | ८५१ | ४८१ | १७५ | ४१६ | ५८ | ७०४० |
| | % | ४७.९% | ८९.२% | ९८.३% | ५.०% | ७३.६% | ६९.४% | ३०.५% | ४७.९% | २४.७% | ६७.०% |
| १ - ५० किलो | संख्या | ८० | ८५ | २६ | ७५२ | १६७ | १३९ | २९८ | २१४ | १२० | १८८१ |
| | % | ४२.६% | ३.५% | .९% | ४७.४% | १४.४% | २०.१% | ५१.९% | २४.७% | ५१.१% | १७.९% |
| ५० - १०० किलो | संख्या | १३ | १४२ | ६ | ४४७ | ८१ | ५० | ८१ | १०५ | ४८ | ९७३ |
| | % | ६.९% | ५.८% | .२% | २८.२% | ७.०% | ७.२% | १४.१% | १२.१% | २०.४% | ९.३% |
| १०० - २०० किलो | संख्या | ३ | ६ | २ | २३३ | २६ | १३ | ११ | ६४ | ३ | ३६१ |
| | % | १.६% | .२% | .१% | १४.७% | २.२% | १.९% | १.९% | ७.४% | १.३% | ३.४% |
| २०० - ५०० किलो | संख्या | १ | १४ | ४ | ५९ | १७ | ३ | ४ | ५९ | १ | १६२ |
| | % | .५% | .६% | .१% | ३.७% | १.५% | .४% | .७% | ६.८% | .४% | १.५% |
| ५०० किलो पेक्षा जास्त | संख्या | १ | १७ | १० | १५ | १५ | ७ | ५ | १० | ५ | ८५ |
| | % | .५% | .७% | .४% | .९% | १.३% | १.०% | .९% | १.२% | २.१% | .८% |
| एकूण | संख्या | १८८ | २४५० | २७५१ | १५८६ | ११५७ | ६९३ | ५७४ | ८६८ | २३५ | १०५०२ |
| | % | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% | १००.०% |

### तक्ता क्र. २१

## शासकीय योजनेमध्ये काम : रोख मजुरी - तालुकानिहाय वर्गीकरण

| रोख मजुरी | | तालुका | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्जत | जव्हार | मोखाडा | अकोले | धडगाव | अक्कलकुवा | धारणी | इटापल्ली | झरीजामणी | |
| सांगितले नाही | संख्या | १८ | १२१ | ४५ | ६८ | १०५ | ६२ | ५० | २३ | ६ | ४९८ |
| | % | ९.६% | ४.९% | १.६% | ४.३% | ९.१% | ८.९% | ८.७% | २.६% | २.६% | ४.७% |
| १ - १०० रुपये | संख्या | २५ | ४६ | ४२ | २८५ | १५० | ९९ | २० | १२९ | ४ | ८०० |
| | % | १३.३% | १.९% | १.५% | १८.०% | १३.०% | १४.३% | ३.५% | १४.९% | १.७% | ७.६% |
| १०० - ५०० रुपये | संख्या | १०१ | ९२१ | ७६१ | १११२ | ४१८ | ३४२ | २७७ | ३७७ | ८२ | ४३९१ |
| | % | ५३.७% | ३७.६% | २७.७% | ७०.१% | ३६.१% | ४९.४% | ४८.३% | ४३.४% | ३४.९% | ४१.८% |
| ५०० - १००० रुपये | संख्या | २४ | ७३३ | ९८९ | १०७ | २७२ | ११८ | १४३ | २१२ | ५२ | २६५० |
| | % | १२.८% | २९.९% | ३६.०% | ६.७% | २३.५% | १७.०% | २४.९% | २४.४% | २२.१% | २५.२% |
| १०००-२००० रुपये | संख्या | ११ | ४७४ | ६६१ | ७ | १६५ | ५२ | ४९ | ९६ | ६५ | १५८० |
| | % | ५.९% | १९.३% | २४.०% | .४% | १४.३% | ७.५% | ८.५% | ११.१% | २७.७% | १५.०% |
| २००० रुपयांपेक्षा जास्त | संख्या | ९ | १५५ | २५३ | ७ | ४७ | २० | ३५ | ३१ | २६ | ५८३ |
